ई/२१४

रशियन
राज्यक्रांतीचा इतिहास.

No 44 of 192829 Recd on 19-10-28
ई/298

रशियन राज्यक्रांतीचा इतिहास.

लेखक.
त्र्यंबक रघुनाथ देवगिरीकर.

किंमत ६ आणे.

— मुद्रक व प्रकाशक—
शंकर नरहर जोशी. चित्रशाळा प्रेस. १०२६ सदाशिव पेठ. पुणें.

रशियन राज्यक्रांतीचा इतिहास.

पहिला निकोलस.

रशियांत सध्यां चालू असलेल्या **बोल्शेविझमचीं** पाळेंमुळें किती खोल रुजलीं होतीं, रशियांत सांप्रत सुरू असलेल्या कामकऱ्यांच्या व शेतकऱ्यांच्या राज्याला काय कारणें झालीं, याची कल्पना गेल्या १०० वर्षांचा इतिहास अवलोकन केल्याशिवाय होणार नाहीं. हा इतिहास सारा रक्तमय आहे. ह्या १०० वर्षांत हजारों लोक फांसावर लटकावले गेले, हजारों लोकांना **सैबिरियांत** हद्दपार करण्यांत आले, हजारों लोकांच्या घरादारांचें पूर्णपणें वाटोळें झालें. जगाच्या इतिहासांत रशियांत झालेल्या अमानुष प्रकाराइतके प्रकार अन्यत्र पहावयास सांपडतील असें वाटत नाहीं. हा अंगावर शहारे येणारा इतिहास वाचला म्हणजेच आपल्याला सांप्रतच्या स्थितीची कल्पना करता येणार आहे. तेव्हां प्रस्तावनेंत अधिक काळ न घालवितां आपण रशियाच्या इतिहासाकडेच वळूं.

क्रांतीचा उगम.

रशियाच्या झारना अमर्याद सत्ता देण्याचा उपक्रम **तार्तर** राजांनीं केला. रशियांतील गुलामगिरीचा पाया याच **तार्तर** खानांनीं घातला. परंतु पुष्कळ शतकेंपर्यंत रशियन लोकांना जुने पाश तोडतां येईनात किंवा गुलामगिरीचें जोखड तितकेंसें असह्य आहे असें वाटेना. त्यांच्या मूक असंतोषाला वाचा फुटण्याचा प्रसंग **फ्रेंच** राज्यक्रांतीनंतर आला. **फ्रान्सच्या** युद्धांत लढाईवर गेलेले शिपाई येतांना आपल्याबरोबर राज्यक्रांतीच्या कल्पना घेऊन आले. **फ्रान्समध्यें** रशियाइतकीच अरेरावी असतां तेथील लोक राजाविरुद्ध बंड पुकारूं शकतात, मग आपल्यालाच असें बंड कां पुकारतां येऊं नये व स्वतःची स्थिति कां सुधारता येऊं नये, असा विचार ते करूं लागले. सारा रशिया गुलामगिरींत होता व जमीनदारांचे गुलाम बनलेले हे रशियन लोक त्या जमीनदाराकरितां, झारराजाकरितां व नोकरशाहीकरितां रणांगणावर जाऊन आपले प्राण खर्च करीत. हा वर्ग, या गरीब बिचाऱ्या प्रजेच्या जिवावर वाटेल ती चैन करी व वाटेल तसे जुल्म करी. आणि **झार** तर इतका सुलतान बनला होता कीं विचारूंच नका. या अरेरावांची सत्ता नष्ट करून टाकण्याची कल्पना हे रशियन सैन्य **फ्रान्सच्या** रणभूमींवर दीर्घकाल पडून राहिले असतां त्यांना आली. त्यांनीं रशिया स्वतंत्र करण्याचा मनाशीं संकल्प केला व त्या दिशेनें घरीं आल्यावर त्यांनीं प्रयत्न सुरू केले. लोक सुधारणा, प्रातिनिधिक संस्था, सनदशीर राज्यपद्धति वगैरेबद्दल चर्चा

करूं लागले. घरोघर राजाच्याविरुद्ध बंड करण्याबद्दल कुजबुज होऊं लागली. क्रांतिकारकांनीं ठिकाठिकाणीं गुप्तमंडळें स्थापन केलीं. ही पहिली चळवळ सैन्यांतील शिपायांनीं व सैन्यांतील अधिकाऱ्यांनींच केली. **पोलंडमध्येंहि** रशियाचा अंमल झुगारून देण्याबद्दल गुप्तमंडळें स्थापन झालीं होतीं. या दोन्ही मंडळाचें एकीकरण झालें. त्यांच्या संगनमतानें रशियाचा बादशहा पहिला **ॲलेक्झांडर** याला कैद करावी, व **पोलंडचा** व्हाइसरॉय असलेला त्याचा भाऊ **ग्रँड ड्युक कान्स्टंटाईन** याला पकडावें असा बेत होता. बादशहाची स्वारी जेव्हां दक्षिणेंतील सैन्याची पहाणी करावयास येईल तेव्हां ही पकडापकड करावी असें त्यांनीं ठरविलें पण पहिल्याच प्रसंगीं त्यांना अपशकून झाला. **ॲलेक्झांडर** हा एकाएकी मरण पावल्यामुळें त्यांचे बेत जागचेजागीं राहिले. राज्यक्रांतीसंबंधीं त्यांनीं विस्तृत योजना तयार केली नसल्यामुळें राजाच्या मृत्युबरोबर त्यांना बंडाचें निशाण फडकवतां आलें नाहीं व हा पहिला सुमुहूर्त असा वाया गेला. तथापि बंडाकरितां जमविलेलें साहित्य वाया दवडूं नये म्हणून त्यांनीं नवा **झार** जेव्हां गादीवर येईल, तेव्हां त्याला घेरून त्याच्याकडून सनदशीर राज्यपद्धतीचें उदक सोडून घ्यावें असा निश्चय केला. यावेळीं गादीवर येण्याला **ॲलेक्झांडर** राजाचे दोघे भाऊ लायक होते.

पहिली चकमक.

पण थोरल्या भावानें म्हणजे पोलंडचा व्हाईसरॉय असलेल्यानें गादीचा वारसा सोडून दिला व **निकोलस**, राजा होणार असें ठरले. ता. २७ डिसेंबर १८२५ ला राजनिष्ठेच्या शपथा घेण्याचा समारंभ होणार होता. त्यावेळीं साऱ्या क्रांतीकारकांनीं आपल्या कटाची द्वाही फिरवली. २७ डिसेंबरला सकाळीं सर सेनापतीला या कटाची वार्ता समजली; पण सैनिकांनीं त्याचें ऐकलें नाहीं. ते आपल्या क्रांतिकारक अधिकाऱ्यांच्या हुकमतीखालीं **पिटर धी ग्रेटचा** अश्वारूढ पुतळा जेथें होता, तेथील विस्तीर्ण चौकांत जमा झाले. राजाच्या बाजूंच्या सैनिकाबरोबर वेळ पडली तर लढाई-खेळण्याचीहि त्यांनीं तयारी केली. जमलेले सैनिक " स्वातंत्र्य, सनदशीर राज्यपद्धति " अशा आरोळ्या मारूं लागले. " कान्स्टीट्युसिआ " या शब्दाचा अर्थहि पुष्कळांना समजत नव्हता, पण ते या शब्दाची एकसारखी गर्जना करीत होते. राजानें बंडखोरांचें मन वळवण्याचा प्रयत्न केला, पण तो व्यर्थ गेला. नंतर गव्हर्नर जनरल **मिलोरॅडोविच** हा घोड्यावर चढून बंडखोरांना निघून जा असें दरडावून सांगूं लागला. त्याबरोबर त्याला एकदम गोळी घालण्यांत आली व त्याचें प्रेत धाडदिशीं जमिनीवर पडलें. पुढें राजेसाहेबांनीं आपल्या घोडदळाला बंदुका झाडण्याचा हुकूम सोडला. पण तीनहि वेळां या सैन्याची पिछेहाट झाली. नंतर तोफखान्याला राजेसाहेबांनीं " फायर " असा हुकूम सोडला. पण गोलंदाजांनीं तोफा डागल्या नाहींत. राजानें विचारलें, " काय तुम्हाला माझा हुकूम ऐकूं आला नाहीं काय ? " गोलंदाज म्हणाले " होय महाराज, पण...पण...ते आमचेच लोक आहेत. " राजाचा चेहरा खर्कन उतरला. पण वेळ दवडून उपयोग नव्हता. त्यांनीं नव्या लोकांकडून अग्निवर्षाव केला आणि

घटकाभराच्या आंत हजारों लोकांच्या मुडद्यांनीं तो चौक भरून गेला. दहा वाजा-यच्या सुमारास दंगा मोडला व **निकोलस** राजे विजयी झाले !

इतर ठिकाणीं त्याचवेळीं वरींच बंडें झाली पण त्यांचाहि असाच मोड होऊन क्रांतिकारक नामोहरम झाले. पहिला **निकोलस** अशा प्रकारें आपली अरेरावी बेगुमानपणें चालविण्यास मोकळा सुटला. क्रांतिकारकांचे पुढारी **पेस्टल, रायलेफ, जुमिन** इत्यादि फांसावर लटकावले गेले. जुलमी कायदे पसार करण्यांत आले, त्यावेळीं फाशीं देण्याची माहितीहि कोणाला नव्हती. त्यामुळें फांसावर लटकलेले अप-राधी तसेंच खालीं पडले. पण पुनः त्यांच्या मानेभोंवतीं दोऱ्या आवळून त्यांचे प्राण घेण्यांत आले. मोठमोठ्या १२० अधिकाऱ्यांना **सैबिरियांत** हद्दपार करण्यांत आले व सामान्य शिपायांची जी लांडगेतोड केली गेली ती तर वर्णन करवत नाहीं. एकेकाच्या पाठीवर भर चौकांत हजारहजार फटके ओढण्यांत आले. पण यामुळें क्रांतिकारक चिरडले गेले नाहींत. त्यांच्या प्राणत्यागामुळें लोकांमध्यें या चळवळीचा फैलाव झाला व बुद्धिमान-वर्गाकडून चलवळीला सहानुभूति मिळूं लागली.

अशा प्रकारें रक्तमय मार्गांतून निकोलस गादीवर चढला. त्याच्या क्रौर्याला मर्यादा उरली नाहीं. बंडखोरांच्या दूरदूरच्या नातेवाईकांनाहि कांहीं संबंध नसतां शिक्षा फर्मावण्यांत आल्या. कांहीं काळ सर्व जण किंकर्तव्यमूढ होऊन स्तब्ध झाले. सैन्यांत करडी शिस्त गाजविण्यांत आली. दयामाया, प्रागतिक विचार, वगैरे सर्व नष्ट झाले. मी देवाचा प्रतिनिधि अतएव, देव आहे अशा समजुतीनें राजा राज्य करूं लागला. " नाविष्णुः पृथ्वीपतिः " व " राजा कधींहि चूक करीत नसतो " ह्या समजुतीनें त्यानें धुमाकूळ माजवला. १८२६ मध्यें सर्व वृत्तपत्रें एकदम बंद करण्यांत आलीं. धार्मिक वाङ्मय प्रसिद्ध करणाऱ्यावरहि तीन सेन्सार बसविले गेले. शास्त्रीय व नाट्यविषयक वाङ्मयाचीहि कसून छाननी होऊं लागली. परदेशीय पत्रें व पुस्तकें यांना मज्जाव झाला. लेखक व वाङ्मयोपासकांवर खडे पहारे ठेवण्यांत आले. कॉले-जांतील राजकारण, अर्थशास्त्र, व इतर राजकीय विषय शिकविणाऱ्या प्रोफेसरांना रजा देण्यांत आली. विद्यार्थी एकदम कमी झाले आणि सारा पैसा लष्करावर खर्च होऊं लागला. परदेशीं जाण्याची बंदी करण्यांत येऊन परदेशांतून येणाऱ्या प्रवाशावर पोलिसांचा पहारा बसला. पोलीस व गुप्त पोलीस खातें एवढें वाढलें कीं सांगण्याची सोय नाहीं. दर घरागणिक पोलीस बसला व सरकारी कामगारांच्यावर देखरेख करण्या-करितां गुप्त पोलीस नेमण्यांत आले. राजाच्याविरुद्ध थट्टा केली तर त्याला हद्दपारी होऊं लागली. अशा प्रकारें सारा रशिया म्हणजे एक पोलीस व शिपाई यांचें राज्य बनला. साऱ्या रशियाच्या तोंडाला खीळ पडली. पण घरांतून व शाळांतून लोक मेलेल्या हुतात्म्यांबद्दल चोरुनमारून प्रशंसेचे उद्गार काढीतच होते. या हुतात्म्यांबद्दल आदर वाढूं लागला.

राजसत्तेचीं जीं पक्षपाती राष्ट्रें होतीं, तीं **झारचे** पोवाडे गाऊं लागलीं व

त्याच्यावर आपले भावी मनोरे उभारूं लागलीं. या दडपशाहीचा घोर परिणाम देशावर झाल्याशिवाय राहिला नाहीं. राष्ट्रांत प्रगति होईनाशी झाली. पण रशियाचें सैन्य हें साऱ्या **युरपला** भारी आहे, असा मात्र चहूंकडे गवगवा होऊं लागला. ही स्थिति अर्थातच रशियाला असह्य झाली. नव्या रक्ताचे तरुण, सरकारचें एवढें दडपण होतें तरी वेळींअवेळीं शाळाकॉलेजांतून आपल्या दैन्यावस्थेचीं कारणें शोधूं लागले व राज्यपद्धतीवर सवडीनुसार टीका करूं लागले. तथापि एखाद्यानें ही नापसंती पत्र-द्वारें आपल्या मित्राला कळवली तर तें पत्र पोलिसाच्या हातीं लागून सर्वांवरच हद्दपारीची पाळी येई. प्रत्येक खात्यांत लाचलुचपतीचा इतका कहर झाला कीं, सांगण्याची सोय नाहीं.

यावेळीं वर ज्या तरुणवर्गाचा उल्लेख केला तो क्रांतीच्या आखाड्यांत उतरूं लागला. त्या वर्गांत **ॲलेक्झांडर हर्झेन, तुर्गेनिव्ह** हा सुप्रसिद्ध कवी, **बिलिनस्की** हा सुप्रसिद्ध टीकाकार, **बाकुनीन** हा मोठा क्रांतिकारक हे समाविष्ट झाले. यांच्यावर लवकरच वक्रदृष्टि झाली व यांना लहानमोठ्या शिक्षाहि झाल्या. हा प्रकार पाहून **तुर्गेनिव्हनें** रशिया सोडला व बाहेरदेशीं जाऊन तो आपल्या कादंबऱ्या प्रसिद्ध करूं लागला. त्यांच्या " डायरी ऑफ हंटर " या कादंबरींत वर्णिलेल्या हृदयद्रावक कादंबरीनें सुशिक्षित वर्गाचे डोळे उघडले व त्यांना स्वातंत्र्याची महति पटूं लागली. ह्याच्या कादंबरीनें जी जागृति केली ती अत्यंत अलौकिक अशी होती. लेखक वक्रोक्ति, व्याजोक्ति वगैरे प्रकार वाङ्मयांत आणून रशियाचे डोळे उघडूं लागले. **बाकुनीन** हा **तुर्गेनिव्हप्रमाणें** रशिया बाहेर गेला. त्यानें **युरपमध्यें** रशियाबद्दल खळबळ उत्पन्न केली व क्रांतीची अवश्यकता प्रतिपादली. **झार** राजानें **फ्रेंच** सत्तेकडून त्याला हद्दपार केलें. शेवटीं तो **लंडन** व **लंडनहून स्वित्झर्लंडला** येऊन राहिला. त्याच्या इतका मोठा क्रांतिकारक त्यावेळीं दुसरा नव्हता. त्याचें वाङ्मय अजूनहि स्फूर्ति उत्पन्न करील इतकें तेजस्वी आहे. तो १८७८ मध्यें **बर्नमध्यें** मरण पावला. ॲलेक्झांडर **हर्झेन** हा पासपोर्ट घेऊन **लंडनला** राहिला. तेथें त्यानें क्रांतीचा उपदेश केला. तो तेथें **कोलोकोल** (घंटा) या नांवाचें मासिक काढीत असे. **निकोलसनें** हें मासिक रशियांत येऊं नये म्हणून पुष्कळ खबरदारी घेतली. पण त्याचा उपयोग झाला नाहीं. रशियांत **कोलोकोलच्या** हजारों प्रती येऊं लागल्या. **कोलोकोल** हें लाखो लोकांच्या वाचनांत येऊं लागलें. त्याला रशियांतील कानाकोपऱ्यांतील माहिती मिळत असल्यामुळें तो या माहितीचा उपयोग करून **झारशाही** नष्ट करण्याचा उपदेश करी. हें पत्र **झारचे** मोठमोठे अधिकारी व खुद्द **झार** यांच्याहि वाचनांत येऊं लागले. ह्या थराला जेव्हां गोष्टी आल्या, तेव्हां **झारच्या** अधिकाऱ्यांनीं आपलीं कृष्णकृत्यें **झारच्या** वाचनांत येऊं नयेत म्हणून, **कोलोकोलची** एक अगदीं हुबेहूब दुसरी आवृत्ति—अनिष्ठ भाग वगळून—काढण्याचा विचार केला. पण **हर्झेननें** **झारला** एक पत्र पाठवून हा त्यांचा डाव उघडकीस आणला. अशा प्रकारें **बाकुनीन,**

तुर्गेनिव्ह व हर्झेन यांच्या प्रयत्नामुळें रशियन लोकांची मनोभूमिका तयार झाली. पण त्याबरोबरच पुनः दडपशाहीला अधिकच जोर चढला.

हर्झेन, तुर्गेनिव्ह वगैरे चळवळ्यांच्या प्रयत्नाला यश येण्यास कांहीं तरी अकल्पित कारण घडून येणें अवश्य होतें. सुदैवानें ही संधि **क्रिमियन** युद्धामुळें आली. या युद्धापूर्वी सर्वसाधारण अशी समजूत होती कीं, रशियाचें सैन्य अत्यंत सामर्थ्यवान व अत्यंत भारी असें आहे; त्याचप्रमाणें रशियाचा खजिनाहि पैशांनीं भरलेला आहे. पण या दोन्ही समजुती **क्रिमियन** युद्धांत खोट्या ठरल्या. **डयनुब नदीवर तुर्कांनीं** रशियाचा बीमोड केला व दोस्त राष्ट्रांनीं रशियाची कंबर मोडून टाकली. रशियाला आपलीं जहाजें शत्रूंच्या हातीं लागूं नयेत म्हणून तीं **सेबस्टीपूल** येथें जाळून टाकावीं लागलीं. रशियाचा लष्करी कारभारहि इतर कारभारामुळें लाचलुचपतीनें बुजबुजला असल्यामुळें त्यांच्या सैन्याची अशी दाणादाण उडाली. सैन्याजवळ दारूगोळा नाहीं, सैनिकांना कपडे नाहींत, अन्न नाहीं अशी स्थिति नजरेस आली. खजिन्यांतील पैशाला ओहोटी लागल्यामुळें चलनी नाण्याचा सुळसुळाट झाला. अशा प्रकारें राज्यांतील बिंगें बाहेर फुटून **निकोलस** राजाची पूर्णपणें छिः थूः झाली.

त्यामुळें क्रांतीकारकांचें राज्यव्यवस्थेबद्दलचें म्हणणें खरें ठरलें. आतां राजाविरुद्ध उघड टीका करावयाला लोक भीतनासें झाले व आपली बेअब्रू झाल्यामुळें राजालाहि दडपशाही करतां येईना. राजा, लष्करी अधिकारी, नोकरशाही, यांच्याविरुद्ध गद्यपद्यांत टीका करून लोक त्याच्या प्रति वाटूं लागले. पोलीस, किंवा सेन्सॉर यांना त्याविरुद्ध कांहीं करतां येईना. त्यावेळीं जें वाङ्मय प्रसिद्ध होई, त्यांपैकीं एक उतारा खालीं दिला आहे.

" हे **झार** राजा, तूं ईश्वराच्या व इतिहासाच्या न्यायासनापुढें उभा रहा. तूं निष्ठुरपणें सत्याला आपल्या पायाखालीं तुडविलेंस, तूं स्वातंत्र्याचा अमानुषपणें छळ केलास, व तूं आपल्या विषयवासनेचा गुलाम बनलास. तूं आपल्या अरेरावीमुळें व लहरीमुळें रशियाचें सामर्थ्य इरेस घातलेंस व जगाला रशियाविरुद्ध शस्त्रग्रहण करण्यास भाग पाडलेंस. आतां तुझें तें शिर तुझ्या बांधवांपुढें नमव व तूं स्वतः नम्र होऊन मातींत मिळून जा. क्षमेची याचना कर व सदुपदेश ग्रहण कर. लोकांना शरण ये. याशिवाय तुला दुसरें गत्यंतर नाहीं. "

आणि खरोखर निकोलस राजा मातीस मिळाला. कारण १८५५ मध्यें तो मरणच पावला. त्याच्या मृत्यूमुळें क्रांतिकारकांच्या चळवळीला अधिकच जोर चढला व नवे राजे आपलें म्हणणें ऐकतील अशी आशा वाटूं लागली.

दुसरा अलेक्झांडर व नव्या सुधारणा.

पण दुर्दैवानें नवे राजे जुन्यापेक्षांहि शिरजोर ठरले व त्यांच्या कारकीर्दीत

रशियांत रक्ताच्या नद्या वाहूं लागल्या व मांसाचा चिखल झाला **निकोलस राजाच्या** राजवटीचे इतके तुकडे उडण्यास तो जितका कारणीभूत होता, त्यापेक्षां त्यानें चढवून ठेवलेली नोकरशाही अधिक कारणीभूत झाली. या साऱ्या आपत्तींतून सुटण्यास लोकांच्या संमतीनें राज्यकारभार चालवावयास पाहिजे होता; पण राजानें ऐकलें नाहीं व सारी अनर्थपरंपरा ओढवून आणली.

लोकांना राजांच्या मृत्युमुळें दुःख होण्याचें दूरच पण परमावधीचा आनंद झाला. तेथील सर्फ्स ऊर्फ गुलाम बंड करण्यास तयार झाले होते. त्यांची गुलामगिरी जर नष्ट केली नाहीं तर ते खरोखरच बंड पुकारतील, इतकी भीति नव्या राजाला वाटूं लागली. त्यांचीं दुःखें तितकींच असह्य होतीं. एकेका जमिनदाराजवळ असे गुलामांचे तांडेचे तांडे असत. कामांत चुकार केली तर त्यांना तो फटके मारूं शके, त्यांना हद्द पार करूं शके व त्यांचा प्राणहि घेऊं शके. त्यावेळच्या एका जमीनदाराजवळ १॥ लाख गुलाम होते व त्यांची चैन त्यांच्या श्रमावर चालू होती. ह्या गुलामांची संख्या १॥–२ कोटी होती.

दुसऱ्या ॲलेक्झांडरला लोकांचें पाठबळ आपल्याला असावें असें वाटलें व त्याकरितां त्यानें कांहीं हक्क देण्याचे आणि गुलामगिरी नष्ट करण्याचे देखावेहि केले. यांतही त्यानें नाना अडचणी उभ्या केल्या; पण शेवटीं त्याला सुबुद्धि सुचली व त्यानें गुलामगिरी नष्ट केल्याचा हुकुमहि जाहीर केला. तपशिलासंबंधीं **झारनें** नोकरशाहीला व सरदारांना कमिट्या नेमण्यास सांगितलें. या नोकरशाहीला व सरदारांना नव्या मनूमुळें आपला दर्जा व आपले हक्क नाहींसे होतील अशी भीति वाटली व त्यांनीं या गंगेंत स्वतःचे हात जितके धुवून घेतां येतील, तितके घेण्याचा निश्चय केला. गुलामगिरीच्या उद्भवाची व वाढीची छाननी करण्याकरितां ऐतिहासिक तज्ञ आपल्या लेखण्या घेऊन पुढें सरसावले. जमिनीवर काम करणारे गुलाम असें म्हणूं लागले कीं, आमच्या दारिद्र्यामुळें व कर्जामुळें आम्ही गुलाम बनलों असलों तरी ज्या जमिनी आम्ही कसीत आहोंत त्या आमच्याच आहेत व त्या जमिनी आम्हांला मालकी हक्कानें परत मिळाव्यात. सरदार व जमीनदार या गुलामांना मोकळे सोडण्यास तयार झाले खरे; पण त्याच्या मोबदला त्यांना पैसे पाहिजे होते; आणि याच मुद्यां-वर उभयतांत तंटे माजले. त्यावेळच्या **झारनें** अर्थातच सरदारांचा पक्ष घेतला. ही चूक जर त्यावेळीं **झार** राजानें केली नसती तर आजचे लढे उद्भवले नसते व **बोल्शे-विझमचा** अवतारहि झाला नसता. असंतोषाचें मूळ अशा प्रकारें राहिलेंच. १८६१ च्या १९ फेब्रुआरीला गुलामगिरी नष्ट झाल्याचा जाहीरनामा निघाला. त्यांत कांहीं गुलामांवर पूर्वीच्या मालकांना पैसे देण्याची शर्त घातली व त्या जमिनी पूर्णपणें शेतकऱ्यांच्या न ठरतां त्या त्या गांवच्या मालकीच्या ठरविण्यांत आल्या. या गांवांना **पिर** असें म्हणतात व त्यांची मालकी सबंध गांवाकडे आल्यामुळें त्यांना **कम्युन** असें म्हणतात. यावरूनच आजचा **कम्युनिस्ट पंथ** निघाला. या नव्या योजनेचा सरकारकडून उदोउदो करण्यांत आला व गुलामांनाहि बरेंच स्वातंत्र्य

मिळालें म्हणून तेहि आनंदित झाले. पण हा आनंद फार वेळ टिकला नाहीं. कारण त्या दास्यमुक्त गुलामांवर पूर्वीच्या मालकांना दक्षणा देण्याची पाळी आलीच. जमिनदारांना त्यांची जमीन झारकडून फुकट मिळालेली होती. ही जमीन मूळची लोकांची असल्यामुळें त्यांची त्यांना तशीच परत द्यावयास पाहिजे होती. पण झारनें जमिनदारांना पैसे द्यावेत असें ठरविलेंच, आणि त्याबरोबरच खंडणीचा नवा बोजाहि या शेतकऱ्यांवर बसवला. त्यामुळें पहिल्याप्रथम जे शेतकरी आनंदित झाले होते, ते या नव्या वडग्यानें पुनः अस्वस्थ झाले. ज्या जमिनदारांना आपल्या गुलामांना मुक्त करावें असें वाटत नसेल त्यांनीं त्यांना पाहिजे तर मुक्तहि करूं नये, असाहि विचित्र हुकूम सोडण्यांत आला. सरकारनीं या दास्यविमोचनाचें पैसे देण्याचें कबूल केलें. पण त्याकरितां शेतकऱ्यांना व गांवकऱ्यांना व्याज द्यावे लागणार होतें. एतावता दास्यविमोचनाचा कायदा पसार झाला खरा; पण शेतकरी आगींतून निघून फोपाट्यांत पडले व निरनिराळे कर व व्याज देण्याच्या भीतीनें त्यांची गाळण उडाली. त्यांची स्थिति पूर्वीपेक्षांहि वाईट झाली. ती स्थिति इतकी वाईट झाली कीं, त्यांना पूर्वीची गुलामगिरी आवडूं लागली, पण नवें स्वातंत्र्य नको असें वाटलें. पैसे देण्याच्या व्यवहारांत पुष्कळांनीं आपले खिसे भरले व ही सर्व व्यवस्था पोलिसांच्या हातांत दिल्यामुळें तर त्या घोटाळ्याला सीमाच उरली नाहीं. तेव्हां या सुधारणेचे अशा प्रकारें बारा वाजले.

ॲलेक्झांडर राजानें खेड्यांची व्यवस्था करण्याकरितां **व्होलास्ट** व जिल्ह्यांची व प्रांतांची व्यवस्था करण्याकरितां **झेमस्टो** नांवाच्या संस्था निर्माण केल्या. पण त्या संस्था लवकरच नोकरशाहीच्या गळीं उतरून प्रजेला मारक झाल्या. त्याची तिसरी सुधारणा न्यायमंदिराबद्दल होती. पूर्वीच्या राजवटींत न्यायाधीश व बदमाष हे समानर्थीच होते. ज्याच्या जवळ पैसा असे, त्याच्यासारखा निकाल होई. आणि एखाद्याला हा निकाल बदलून घेण्याची इच्छा झाली तर तो नोकरशाहीकडून बदलूनहि घेत असे. नव्या राजानें आपली न्यायपद्धति **फ्रान्स** व **इंग्लंड**च्या धर्तीवर बनविण्याचें ठरविलें. पण ही पद्धत इतकी घोटाळ्याची होती कीं, अशिक्षित रशियाला तिचा उपयोग कसा करावा, हेंच कळेना. याहि पद्धतींत नोकरशाहीचा वरचष्मा होताच. कोणालाहि पैशाच्या अगर वशिल्याच्या जोरावर न्यायकोर्टाचा हुकूम लाथाडतां येई. अशाप्रकारें **झारनें** जमिनीच्या, प्रातिनिधिक संस्थांच्या व न्यायदानाच्या बाबतींत केलेल्या तीनहि सुधारणा फोल ठरल्या. तो स्वतः वाईट होताच, पण त्याच्या भोवतीं असणारे अधिकारी अधिक वाईट होते. या अधिकाऱ्यांनीं **झारच्या** कानांत जहर ओतून त्याला पुरता अरेराव बनवला.

क्रांतीच्या चळवळी.

लवकरच **झारनें** प्रतिगामी स्वरूप पतकरलें. त्याचा परिणाम असा झाला कीं, **पोलंडमध्यें** १८६६ सालीं त्याचा **काराकोसोफनें** खून करण्याचा प्रयत्न केला. **झारनें** हा लोकमताचा ओघ ओळखला नाहीं. गुप्तमंडळ्या स्थापन होऊं लागल्या

व राजाचा खून करण्याबद्दल लोक बोलूं लागले. याच सुमाराम ' **निहिलिझम** ' ची चळवळ जोरांत आली. **निहिलिझम** याचा मूळ अर्थ वैयक्तिक स्वातंत्र्या आड येणाऱ्या सामाजिक, धार्मिक, कौटुंबिक जबाबदारींचा इनकार असा होता. पण पुढें हें नांव क्रांतिकारकांना देण्यांत आलें. हे लोक स्त्रीपुरुषांची शिक्षणांत, कुटुंबांत व जगांत समता आहे असें शिकवूं लागले. स्त्रीयांनीं सार्वजनिक आयुष्यांत पडूं नये, म्हणून घरंदाज कुटुंबांनीं व सरकारनें प्रयत्न केले. कोणत्याहि राशियन शाळेंत तरुण स्त्रियांना घेत नसत व त्यांना शिक्षणाकरितां परप्रांतीं जाण्यास परवाने मिळत नसत. त्यामुळें ह्या काळीं पुष्कळ खोटीं लग्नें होऊं लागलीं. लग्न झालेल्या स्त्रियांना नवऱ्या बरोबर परदेशीं जाण्यास कायदेशीर आडकाठी नसल्यामुळें त्या अशीं खोटीं लग्नें करून शिकण्याकरितां बाहेर जाऊं लागल्या. अखेरीस त्यांच्या चळवळीस यश आलें व त्यांच्या शिक्षणाची खासगी सोय राशियांत झाली. तशीच शिक्षणाकरितां परदेशी जाण्यासहि त्यांना मोकळीक मिळाली. त्यामुळें **जर्मनी**, **फ्रान्स** व **स्वित्झरलंड** येथें स्त्री-पुरुषांची शिक्षणाकरितां गर्दी झाली. पण राशियन क्रांतिकारकांचें खरें केंद्र **स्वित्झरलंड**मधील " **झुरीच** " विश्वविद्यालय हेंच बनलें. तेथें त्यांनीं समाजसत्तावादाचें अध्ययन केलें व **मार्क्स**, **बाकुनिन** इत्यादि ग्रंथकारांच्या ग्रंथांचें परिशीलन केलें. खुद्द रशियामध्येंहि समाजसत्तावादाच्या वाङ्मयानें धुमाकूळ घातला. प्रत्येक जाणता माणूस या प्रश्नाचा विचार करू लागला. अखेरीस समाजसत्तावाद म्हणजे राज्यक्रांति ठरली व सरकारनें त्याविरुद्ध शस्त्र उपसलें. १८७१ मध्यें कम्युनिस्टांनीं बंड करण्याचा प्रयत्न केला व त्यामुळें **झार**चें पित्त खवळलें. धरपकडी, अधिकाराचा दुरुपयोग व दडपशाही याला ताळतंत्रच उरला नाहीं. **फ्रान्स**मध्येंहि याच वेळीं **कम्युनिस्टांची** चळवळ सुरू झाली. त्यामुळें राशियन क्रांतिकारक अधिक धीट बनले. **झुरीचचें** विश्वविद्यालय हें सरस्वती मंदिर बनण्याऐवजीं क्रांतिकारकांचें अधिष्ठान झालें; आणि **झुरीच**ला शेकडों स्त्रीपुरुष सर्व युरपमधून येऊं लागले. **झार**ला आपल्याविरुद्ध **झुरीच** शहरीं चाललेली ही बंडाळी सहन झाली नाहीं. त्यानें १८७३ मध्यें बादशाही फर्मान काढून **झुरीच**मधील सर्व राशियन स्त्रीपुरुषांना घरीं परतण्याचा हुकूम फर्मावला. हुकूम अमान्य करणारांचे परवाने रद्द होतील व त्यांना पळपुटें समजण्यांत येईल, अशीहि धास्ती त्यांना घातली. वास्तविक विचार करतां **झारनें** ही बाहेरची आग बाहेरच ठेवणें अधिक शहाणपणाचें होतें. उलट त्यांनीं त्यांना स्वदेशी येण्यास बंदी करावयास पाहिजे होती. पण दैवगती टळत नसते. **झुरीच**मध्यें बंडाचे धडे घेतलेले हे सुशिक्षित स्त्रीपुरुष तावडतोब राशियांत आले व त्यांनीं क्रांतीच्या आगीनें सारा राशिया जाळण्याचा निश्चय केला. ते सर्वजण क्रांतिमंडळें बनवून तिचा फैलाव करू लागले. तत्पूर्वी राशियामध्यें तरुणांनीं जी चळवळ केली होती, ती लक्षांत ठेवण्याजोगी आहे. मोठमोठे सुशिक्षित लोक अगदीं गरीबाचा पेशा पत्करून त्यांच्यांत जागृति करण्याकरितां हिंडू लागले. गरीब प्रजेचीं दुःखें त्यांच्यांत वागल्याशिवाय कळत नसतात व या वर्गाची सहानुभूतीहि त्यांच्याकरितां

दुःख सोसल्याशिवाय संपादन करतां येत नाहीं, असें पाहून हें क्रांतिकारक त्यांच्यांत राहूं लागले, त्यांच्याबरोबर खाऊंपिऊं लागले, त्यांच्याबरोबर काम करूं लागले व त्यांचीं शारीरिक व मानसिक दुःखें निवारूं लागले. प्रत्येक गांवांत ह्या चळवळ्यांनीं लहान लहान संस्था या कार्याकरितां स्थापन केल्या. हे सुशिक्षित तरुण लोक कोणी डॉक्टर, कोणी शिक्षक, कोणी कारकून, कोणी मजूर, कोणी सुतार, कोणी लोहार, असे बनले. आणि स्त्रिया सुईणी व दाया बनून खेडोपाडीं राहूं लागल्या. पहिल्या प्रथम त्यांनीं क्रांतीचा उपदेश केला नाहीं. त्यांनीं त्यांचीं गाऱ्हाणीं ऐकलीं व त्यांना ज्ञान देण्याचा प्रयत्न केला. सरकारच्या कानावर ही त्यांची कामगिरी लवकरच गेली व असे चळवळे जेथें सांपडतील तेथें त्यांचा नायनाट करण्याचे हुकूम सोडण्यांत आले. या चळवळ्यांचा उद्देश प्रथम नुसतीं सामाजिक दुःखें निवारण करण्याचा होता. पण **झारनें** आपल्या दंडुकेशाहीनें त्यांना क्रांतीकारक बनवलें. या वेळीं " **शेकोव्हस्की सर्कल** ", स्थापण्यांत आलें. या मंडळाच्या शाखा साऱ्या रशियाभर पसरल्या. या मंडळांत पुढें अस्सल क्रांतिकारक म्हणून चमकलेले **क्रापोटकीन, स्टेपनाईक, सोफिया** वगैरे मंडळी होती. त्यांना राज्यपद्धतींत सुधारणा घडवून आणण्याची दिवसें-दिवस जरूरी भासूं लागली व त्याकरतां त्यांनीं सर्व रशियांत आपला उपदेश फैलावून भूमिका तयार केली. **क्रापोटकीन** हा मजुरांत फिरून व्याख्यानें देई. **सर्जिअस** हा लांकडे कापण्याचा धंदा करीत गांवोगांव हिंडे व क्रांतीचा उपदेश करी. **ओबुचाफ** हा श्रीमंत जमीनदार क्षयाच्या तृतीयावस्थेंत असतांहि व्याख्यानें देई. **लिओनिडस** हा लष्करी अधिकारी कोष्टी बनून सेंटपिट्रबर्गमध्यें मजुरांना व्याख्यानें देई. **सोफिया** ही फार श्रीमंत स्त्री होती ती व **कॉर्निलॉफ** या श्रीमंत व्यापाऱ्यांच्या दोन मुली मजुरांत अशीच जागृती करीत. झुरीचहून आलेल्या इतर अनेक स्त्रिया गिरण्यांत मजूर बनून त्यांच्यांत चैतन्य उत्पन्न करीत. अशा प्रकारचीं अनेक उदाहरणें या वेळचीं सांपडतात. या पद्धतीनें काम करणाऱ्यांची संख्या ३००० चे वर होती. पण त्यांची ही चळवळ निर्वेधपणें चालली नव्हती. मधूनमधून धरपकडी, झडत्या, शिक्षा हे प्रकार होत होते. रात्रींच्या वेळीं अकस्मात पोलीस दत्त म्हणून घरापुढें उभा राही व झडती घेई. झडत्या दिवसा घेत नसत. रात्रीं घेत; तुरुंग भरून गेले, गुप्त पोलीसांचा बुजबुजाट झाला. या वेळीं रशियाच्या ३७ प्रांतांत क्रांतीचें वारें भरलें गेलें. झारच्या दंड-पशाहीमुळें क्रांतीकारकांना अधिकच स्फुरण चढलें. सर्व प्रमुख पुढारी तुरुंगांत पडलें. शेंकडो क्रांतीकारक एकाएकी पकडले जात, त्यामुळें त्यांचें काय झालें हें त्यांच्या नातेवाईकांना कळेना. त्यांच्या जागीं नवे नवे स्त्री-पुरुष क्रांतीकारक निर्माण होत व क्रांतीचा फैलाव करीत. या वेळीं १५०० लोक कैद झाले. नवे तुरुंग भराभर बांधण्यांत आले व **सैबेरियांत** जाणारा निर्मनुष्य रस्ता कैद्यांच्या जाण्या-येण्यानें गजबजून गेला. कोणाचेंहि जीवित सुरक्षित नव्हतें. या वेळीं क्रांतिकार-कांना आपल्या पद्धतींत बदल करण्याची जरूरी भासली. इकडे तिकडे क्रांतिकारक

घेरण्याच्या ऐवजीं त्यांनीं क्रांतिकारकाचे गट निर्माण केले व पोलिसांची नजर चुकवून गटांनीं क्रांतिचा उपदेश करण्याचे त्यांनीं ठरविलें. तथापि हाहि मार्ग यशस्वी झाला नाहीं. पोलिसांनीं या राजकीय कैद्यांचा अतोनात छळ केला. या त्रासाला कंटाळून कित्येकांनीं पहारेकऱ्यांना चोप दिला व कित्येकांनीं आत्महत्या केल्या. कांहीं जण तर वेडेच बनले. पोलीस अधिकारी त्यांच्या चवकशीकरतां त्यांना न्यायासनासमोर आणीतनाच. अशा रीतीनें पुष्कळांचा अमानुष छळ झाल्यावर १८७७ मध्यें चवकशीला सुरवात झाली. प्रथम ४० जण पुढें आलें. ही चौकशी सरकारनें उघड उघड केली. त्यांत त्यांचा उद्देश लोकांना दरारा बसवावा असा होता. पण याचा परिणाम उलट होऊन क्रांतिकारक हे साधु पुरुष आहेत असेंच लोक बोलू लागले. पुढील सालीं १९३ जणांची अशीच चवकशी झाली. तत्पूर्वी १००० लोक याच अपराधाकरितां पकडले होते. त्यांतील ७५ वेडे झाले, आत्महत्या करते झाले किंवा तुरुंगांतील निरनिराळ्या रोगांनीं मरण पावले. या १९३ जणांना १० पासून १५ वर्षेपर्यंत हद्दपार करण्यांत आले. आणि ही शिक्षा कां तर त्यांनीं हस्तपत्रकें वाटलीं होतीं किंवा एखादें भाषण केलें होतें म्हणून होती. या पुढें क्रांतिकारक बेफाम झाले. व सरकारी अधिकारीहि राक्षस बनले. अशा प्रकारें क्रांतीचें बीजारोपण होऊन पुढील हत्याकांडाला जोरानें सुरवात झाली.

खून व फाशी.

क्रांतिकारकांची इच्छा वास्तविक राजकीय उलाढालींत पडण्याची नव्हती व त्यासंबंधीं त्यांची योजनाहि कांहीं नसे. त्यांना शेतकरी, मजूर, कामगार ह्या वर्गाला झारनें सुख द्यावें, शिक्षण सगळ्यांना मोकळें असावें, एवढेंच पाहिजे होतें. राज्यपद्धती प्रतिनिधीक असावी कां राजसत्ताक असावी ह्याबद्दलची भांडणें लिबरल पक्षाला व प्रतिनिधीक सत्तावाद्यांना भांडू देण्यास त्यांची हरकत नव्हती. यावरून राशियांतील लढ्याची कल्पना येईल. राशियांतील क्रांतिकारक **सोशियालिस्ट** किंवा समाजसौख्याकरितां जे झगडत होते, त्यांना राजकारणांतील हक्काचें तितकेंसें महत्त्व वाटत नसे. झारनें जर कामकऱ्यांच्या सौख्याकरितां कायदे पसार केले असते, तर त्यांनीं झारशाहीहि चालू दिली असती. पण झारनें यत्किंचित् दयामाया दाखवली नाहीं म्हणूनच त्यांना साऱ्या राशियांत रक्तपात करावे लागले.

राशियाच्या झारचा क्रिमियन युद्धांत पराभव झाल्यामुळें त्याच्या सैन्याविषयीं व खजिन्याविषयीं लोकांचा भ्रम दूर झाला. झारची सत्ता आंतून पूर्णपणें पोखरली गेली आहे, हें त्यांना समजलें. **क्रिमियन** युद्धानंतर राशियानें **बल्गेरियाला** सनदशीर राज्यपद्धती दिली. **बल्गेरिया** इतका काळ तुर्कांच्या सत्तेखालीं होता व त्याला नवी राज्यपद्धतीची माहितीहि नव्हती. पण झार बल्गेरियाच्या लायकीचे पोवाडे गाई व राशिया मागासलेला देश आहे असें म्हणून याना सनदशीर राज्यपद्धत देऊं नये असें सांगे. या गोष्टीची राशियाला अत्यंत चीड आली. याचाच परिणाम म्हणजे पुढील रक्तपात होत.

या वेळीं पोलिसांना अमर्याद सत्ता देण्यांत आली. एखाद्या माणसाला कोर्टानें निर्दोष म्हणून सोडून दिलें तर पोलीस त्याला लागलाच पकडून चौकशीविना हद्दपार करू शकत. १८७८ मध्यें ओडेसामध्यें कांहीं चळवळ्यांना पोलिसांनीं पकडलें. पोलिसांच्या हातून आपले अनान्वित हाल होतील ही क्रांतिकारकांना कल्पना असल्यामुळें त्यांनीं पोलिसबरोबर दोन हात केले. रिव्हॉल्व्हर्सचें युद्ध झालें. व उभय पक्षांतील बरीच मंडळी जखमी झाली आणि जास्त मदत आल्यावर पोलिसांना पकडापकड करतां आली.

यानंतर लवकरच **सेंटपिटसबर्ग** येथें दुसरा प्रकार घडला. पोलिसांनीं बंडखोरांना दहशत बसावी म्हणून त्यांना बडवण्याचा नवा प्रकार सुरू केला. त्यांनीं एका प्रमुख क्रांतिकारकांना पकडून आणलें व त्याला चोपण्याचें ठरविलें. हा चोप ते Knout नांवाच्या चाबकांनीं देत. तो चाबूक साधा नसून तारांनीं गुंडाळलेला व एक फटका बसतांच मांस बाहेर काढणारा असा असे. या चाबकानें पुढें बरेंच पराक्रम गाजविले आहेत. त्या क्रांतीकारकाला पोलीस अधिकारी **ट्रेपॉफ** यांनीं चोपलें ही बातमी ऐकतांच सारा राशिया चिडून गेला. ही बातमी एका तरुण मुलीच्या कानावर गेली. तिचा क्रांतीकारकाशीं संबंध नव्हता. ती या अमानुष शिक्षेनें इतकी चिडून गेली कीं, ती **ट्रेपॉफ**च्या ऑफिसांत जाऊन तिनें त्याच्यावर रिव्हॉल्व्हर झाडलें. **ट्रेपॉफ** सुदैवी; तो मेला नाहीं, त्याला जबर जखम झाली. ती मुलगी तेथेंच उभी राहिली. तिनें पळून जाण्याचा प्रयत्न केला नाहीं. तिला पकडण्यांत आलें. या कृत्यानें सारा राशिया खडबडून जागा झाला. खुद्द झार राजे **ट्रेपॉफ**च्या भेटीला आले. **झारला** पहातांक्षणींच या राज्यश्रींनीं मृत्युपत्र लिहविलें. त्यांत त्यांनीं इतकी संपत्ती कमवल्याचें नजरेस आलें कीं झारहि चकीत झाला. साधा पोलिस अधिकारी अनेक लाखांचा मालक बनू शकतो, यावरून झारशाहींत किती लांचलुचपत चालू होती याची कल्पना वाचकांना येईल. पुढें तो अधिकारी बरा झाला; पण त्याला तेथून पळ काढणें भाग पडलें.

नंतर वीराची—त्या मुलीची—चवकशी झाली. कोर्टांत नुसता तोबा उडाला होता. वकीलानें बचावाचें अत्यंत तडफदार भाषण करून झारच्या नोकरशाहीवर तडाखे ओढले. कोर्टानीं तिला निर्दोषी म्हणून सोडून दिलें. पोलीस अधिकारी आपल्या अधिकारांत तिला पुनः कैद करण्यास तयार होतेच. पण क्रांतिकारकांनीं तिला हातोहात असें पळविलें कीं, पुढें पोलिसानीं जंगजंग पछाडलें तरी त्यांना तिचा पत्ता लागला नाहीं. नंतर आठ दिवसाच्या आंत दुसऱ्या दोघांचे खून झाले.

ओडेसाच्या दंग्यांतलि प्रमुख **कौलास्की** याची चवकशी होऊन त्याला मृत्यूची शिक्षा झाली. कोणाचा खून झाला नसतां ही शिक्षा कां फर्मावण्यांत आली हें लोकांना कळेना. त्यांनीं **मेन्स्टाफ** या अधिकाऱ्याला कळवले कीं, जर **कौलास्की** मारला गेला तर तुलाहि मृत्यूची शिक्षा होईल. **कौलास्की** १४ ऑगस्टला ठार

केला गेला आणि दोन दिवसांनंतर **मेन्स्टाफला स्टेपनाईकनें** भर दिवसा रस्त्यांत खंजीर खुपसून ठार मारलें. **स्टेपनाईक** खून करून पळाला. सरकार घाबरलें व त्यांनीं जनरल **ड्रेंटलीनची** मुख्य अधिकारी म्हणून नेमणूक केली. या राजश्रींनीं **स्टेपनाईकाला** पकडण्याकरितां २००० लोक कैद केले; पण **स्टेपनाईकाचा** त्याला पत्ताच लागला नाहीं.

२२ फेब्रुआरी १८७९ रोजीं **गॅरीकॉफचा** गव्हर्नर प्रिन्स **क्रापोटकिन** याचा त्याच्या निर्दयतेमुळें खून झाला. दोन दिवसानंतर क्रांतीकारकांची पोलीस बरोबर झटापट होऊन त्यांनीं **राईन्स्टीन** नांवाचा गुप्त पोलीस ठार मारला. लागलाच २६ तारखेला **लिओन मिरर्की** या तरुणानें **ड्रेंटलीनचा** धावत्या गाडींतच भर रस्त्यावर चढून रिव्हॉल्वरनें खून करण्याचा प्रयत्न केला. त्याच्या पिस्तुलाच्या घोड्यानें ऐनवेळीं दगा दिल्यामुळें नुसत्या जखमेवरच हें प्रकरण थांबलें. **मिरर्कीला** जन्मठेप मिळाली.

हे प्रकार होऊन १॥ महिना लोटतो न लोटतो तोंच एप्रीलच्या १४ तारखेला खुद्द झार राजाचा खून करण्याचा पहिला प्रयत्न त्याच्याच राजवाड्यांत करण्यांत आला. पण याहि वेळीं सोलोविफ नांवाच्या माणसाच्या पिस्तुलानें दगा दिला. पांच गोळ्यपैकीं एकहि गोळी झारला लागली नाही. सोलोविफ पकडला गेला.

यामुळें झारनें अधिक दडपशाही सुरू केली. त्यांनीं रशियाचे सहा विभाग करून प्रत्येक विभागावर एकेक गव्हर्नर नेमला व त्याला आपले सर्व अधिकार दिले. नोकरशाही खुद्द झारच बनली. या गव्हर्नरांत जनरल **गुर्को** हा फार दुष्ट होता. त्यानें फाशीचें सत्रच सुरू केले. प्रत्यक्ष खुनाचा संबंध नसलेल्यांनाहि तो फासावर लटकावी. **लिसोगुप** नांवाचा एक श्रीमंत मनुष्य क्रांतीकारकाशीं सहानुभूतीनें वागत असे. त्याला प्रजेचे हाल कमी व्हावेत असे वाटे. त्यालाहि या **गुर्कोनें** फासावर लटकावले. ह्या मनुष्यानें अठरा महिने क्रांतिकारकांना वाटेल तितके पैसे एकट्यानें पुरविले होते. तो अत्यंत काटकसरीनें वागे व शेवटीं जेव्हां त्याला पकडलें, तेव्हां त्याच्याजवळ पैहि उरली नव्हती. ह्या क्रांतिकारकांचें एक कार्यकारी मंडळ असे. त्या मंडळांत चर्चा होऊन कोणाला ठार मारावयाचें तें ठरत असे. या मंडळानें **झारला** मृत्यूची शिक्षा फर्मावली व ही गोष्ट त्याला कळवली. राजकारणाशीं संबंध नसणारे हे **निहिलिस्ट** आतां राज्यक्रांतिविषयीं उघड उघड बोलूं लागले. त्यांनीं **झारला**, तो जर तेथील **लिबरलपक्ष** मागत असलेले हक्क देण्यास तयार असेल तर शस्त्रें खालीं ठेवण्यास आम्ही तयार आहों, असें कळविलें. अशा प्रकारें **सोशिआलिस्ट क्रांतिकारक** राजकारणी बनले. **झारनें** अर्थातच त्यांना धुडकावून लावले. पण यामुळें क्रांतिकारकांना चहूंकडून पाठिंबा मिळाला. जे कधींहि या प्रकाराला संमति देणार नाहींत असें वाटे त्यांनींहि क्रांतिकारकांना पाठिंबा दिला.

याच कारणामुळें त्यांना कशाचाहि तुटवडा न पडतां आपली चळवळ चालवतां आली.

झारनें स्वतः भोंवतीं कडक पहारा ठेवला. त्याच्या गाडीभोंवतीं **कोसॅक्सचा** मोठा थोरला गराडा असे व ती गाडी भरधांव पळत सुटे. आगगाडींतून जेव्हां तो प्रवास करी, तेव्हां चार चार हातांवर रेल्वेच्या दोन्ही बाजूंला शिपाई उभे असत. १८७९ मध्यें तो **लिव्हाडिआला** असाच आगगाडीनें गेला. हा प्रवास फार लांबचा होता. तथापि वर सांगितल्याप्रमाणें पहारेकरी दोन्ही बाजूंला उभें असत. तो **लिव्हाडिआला** जोंपर्यंत राहिला होता, तोंपर्यंत रेल्वेलाईनीवर सक्त पहारा असे. पण त्याचा उपयोग झाला नाहीं. क्रांतिकारकांनीं आपल्या कार्यकारीमंडळांत दिलेली मृत्यूची शिक्षा अंमलांत आणण्याचा निश्चयच केला होता.

सॅंटपिटर्सबर्गमधील " **स्टोन ब्रिज** " वरून झारची स्वारी जात येत असे. त्या पुलावर सुरुंग लावण्याचें दोघां क्रांतिकारकानीं ठरविलें. पण ऐन वेळीं एकजण न आल्यामुळें तो बेत फसला. दुसरा बेत राजाची बोट उडवून देण्याचा होता. पण पोलीस आले व त्यांनीं ज्या खोलींत विजेची बॅटरी होती व जेथून सुरुंगापर्यंत विजेच्या तारा नेल्या होत्या, त्या खोलीची झडती घेतली व दोघां क्रांतिकारकांना फांसावर चढवलें. **झारच्या** आगगाडीचा चक्काचूर करण्याचा क्रांतिकारकांनीं जो तिसरा प्रयत्न केला तो आपण पाहूं.

लिव्हाडियाला गेलेला **झार** क्रांतिकारकांच्या भीतीनें तेथें बरेच महिने राहिला. तो डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यांत परत येणार होता. परत येण्याचे दोन मार्ग होते. या दोन्ही रस्त्यावर तीन ठिकाणीं सुरुंग लावण्याचें ठरलें. काम जोरानें चालू झाले. राजेसाहेब **ओडेसाच्या** रस्त्यानें परत येत नाहींत हें ऐकून एक बेत सोडून देण्यांत आला.

ॲलेझांड्रोव्हस्कजवळ सुरुंगाची तयारी केली. एक रेल्वेचा उंचवटा याकरतां मुक्रर झाला. गाडीला थोडासा धक्का बसला तरी गाडी खोल दरींत पडेल अशी त्यांची खात्री होती. पण ही योजना घाईघाईनें झाल्यामुळें स्फोट झाला नाहीं व **झार** सुरक्षितपणें पोहोंचला. ही बातमी त्याला मागाहून कळली. **झारच्या** खुनाचा पांचवा प्रयत्न असाच फसला. **सोफिआ पेरोवेस्कीआ** व **लिओ हार्टमन** ह्या दोघांनीं **मास्को**जवळ एक घर भाड्यानें घेतलें. हें घर रेल्वे लाईनजवळ होते. हे क्रांतिकारक दोन महिनेपर्यंत कोणाला संशय येऊं न देतां तेथें काम करीत होते. या घरांतून एक बोगदा खणण्यांत आला. तो बोगदा रेल्वेच्या रुळाच्या खालपर्यंत नेऊन पोहोंचवला. या बोगद्यांतून सुरुंग लावून राजाची गाडी उलथवण्याचा त्यांचा बेत होता. हे दोघे स्त्रीपुरुष मृत्यूला तयार होते. त्यांनीं स्वतःच्या मृत्यूकरितां **नायट्रोग्लीसरीनची** बाटली जय्यत ठेवली होती. त्या बाटलीचा स्फोट कर-

ण्याचें काम **सोफिआनें** आपल्यावर घेतलें होतें. त्या खोलीची पोलिसांनीं दोनवेळां झडतीहि घातली. पण त्यांना कांहीं सांपडलें नाहीं. पण हाहि त्यांचा अत्यंत कष्टाचा असा प्रयत्न फुकट गेला.

झारच्या प्रवासाच्या वेळीं नेहमीं तीन आगगाडया निघत असत. क्रांतिकारकांना आपण कोणत्या गाडींतून प्रवास करतो, याची नक्की बातमी लागूं नये हाच त्याचा उद्देश होता. **मास्कोच्या** अलीकडच्या स्टेशनवर येईपर्यंत तो मधल्या गाडींत बसला होता. पण या स्टेशनवर तो पहिल्या गाडींत बसला. क्रांतिकारकांना ही बातमी समजली नाहीं. त्यांनीं **झार** मधल्या गाडींत आहे या समजुतीनें ती गाडी जेव्हां जवळ आली तेव्हां सुरुंग उडवला. गाडीच्या चिंधडया उडाल्या. पुष्कळ लोक मेले; पण इकडे **झार मास्कोला** जाऊन सुरक्षितपणें बसले होते. अशा प्रकारें **झारसाहेब** तात्पुरते तरी बचावले.

यानंतर क्रांतिकारकांची नुसती ससेहोलपट झाली. शेंकडो लोकांना अमानुषपणें छळण्यांत आलें. **झारचे** सल्लागार त्याला दडपशाहि अधिकाधिक करण्याचा उपदेश करीतच होते. **थर्ड सेक्शन** ऊर्फ गुप्त पोलिस खातें आणि यांच्या लीला जितक्या वर्णन कराव्यात तितक्या थोडयाच आहेत. ह्या पोलिसखात्याच्या तडाख्यांतून मोठमोठे गव्हर्नरहि सुटत नसत. या खात्याला " हम करोसे कायदा " असले अधिकार देण्यांत आले. या खात्यानें आपल्या अमानुषपणानें खुद्द **झार**लाहि मागें टाकलें. पण इतकेंहि करून त्यांना क्रांतिकारकांचा मोड करतां आला नाहीं. एखाद्या क्रांतिकारकाला पकडलें तर त्या बिचाऱ्याला एक दोघांशिवाय दुसऱ्या क्रांतिकारकांची माहितीहि नसे. ही व्यवस्था क्रांतीच्या मुख्य मंडळानेंच केली होती. नाहीं तर एकादा क्रांतिकारक फुटल्याबरोबर सर्वांचीच आहुति त्यांत पडावयाची !

क्रांतिकारकांना सर्वांत मोठी अडचण म्हणजे छापखान्याची. हे छापखाने उघड चालवितां येत नसत. त्यांची सर्व चळवळ छापील पत्रकावरच चालत असल्यामुळें छापखाने नसूनहि त्यांचें भागत नसे. पण एखादा छापखाना जप्त झाला तरी दुसरा काढण्यांत येई. या क्रांतिकारकांची आपल्या कार्याविषयीं अत्यंत दृढ निष्ठा असे. छापखान्याशीं संबंध असलेला क्रांतिकारक सांपडला म्हणजे तो आटोपलाच अशी स्थिति होती. जे या धंद्यांत पडत त्यांना सर्व काळ अज्ञातावस्थेंत काढावा लागे. ते खिशांत रिव्हालव्हर घेऊन रात्रींच्या वेळीं काम करीत असत. आणि एखाद्या पोलिसाला पैसा देऊन जीव वाचविण्याकरितां जवळ पैसाहि ठेवीत. इतके दिवस क्रांतिकारक बाहेरील देशांतून हस्तपत्रकें छापून आणीत. पण या सुमारास खुद्द रशियांत त्यांनीं छापखाना काढल्याची बातमी पोलिसला लागली. अनेक दिवस शोध केल्यावर त्यांनीं त्या छापखान्यावर छापा घातला. आंतील कामगारवर्ग शस्त्रास्त्रांनीं सज्ज होताच. त्यांनीं कांहीं वेळ पोलिसांना जागचें हालू दिलें नाहीं. पण अखेरीस बिचारे पकडलेच गेले.

झारच्या खुनाचे आणखी प्रयत्न.

झारला निदान आपला राजवाडा सुरक्षित आहे असें वाटत होतें. पण बिचाऱ्याची तीहि कल्पना चुकली. क्रांतिकारकांचा एक सभासद **हालतुरीन** हा राजवाड्यांत नोकर होता. त्याला खुद्द राजवाड्यांत सुरुंग लावण्याची बुद्धि झाली. त्यानें राजवाड्याची रचना नीट लक्षांत घेतली व राजवाडा उडवून देणें फार सोपें आहे असें त्याला कळून चुकले. “ **स्टोन ब्रिज** ” उडविणारा एक क्रांतिकारक त्याला येऊन मिळाला. **हालतुरीनची** खोली राजेसाहेब जेथें जेवावयास बसत त्यांच्या खालीं पण जरा बाजूला असे. तेव्हां सुरुंग लावावयाला जरा दारू जास्तच घेतली पाहिजे असें त्याच्या लक्षांत आलें. **हालतुरीन** रोज बाहेर जाई व येतांना डायनामाईट बरोबर घेऊन येई. हें डायनामाईट तो जेथून बत्ती लावावयाची होती, तेथें कोपऱ्यांत ठेवी व त्यावर आपली अडगळ टाकी. त्याला सुरुंगाकरितां भोंक पाडणें शक्य नव्हतें. **हालतुरीनला** जर पुरेशी दारू मिळाली असती तर त्याचा बेत सिद्धीस गेला असता. पण एका क्रांतिकारकाच्या घराची झडती घेतांना पोलिसांच्या हातीं एक नकाशा सांपडला. या नकाशावर त्यांचे बेत दिसत होते. **झारच्या** राजवाड्यावर फुली मारली असल्यामुळें गुप्त पोलिसांना राजवाड्यावर गडांतर येणार असें कळलें व त्यांनीं राजवाड्याची झडती घेतली. या झडतींत त्यांनीं **हालतुरीनच्या** खासगी सामानाकडे पाहिलें नाहीं व सुरुंगाची दारू अशा रीतीनें त्यांच्या दृष्टींतून निसटली. पण दुसऱ्या दिवसापासून पहारेकरी कोणालाहि आंत किंवा बाहेर झडतीशिवाय जाऊं देईनात. त्यामुळें **हालतुरीनला** दारू आणणें शक्य झालें नाहीं. थोडीफार दारू तो त्याहि स्थितींत आणीत असे हें वेगळें. अखेरीस बार उडविण्याचा दिवस उजाडला. हा बार एका मोकळ्या चौकांत उडवावयाचें ठरलें. खरी अडचण **झार** जेवावयास केव्हां येतो तें कळण्याची. कारण **झारची** वेळ ठराविक नसे. अखेरीस एके दिवशीं **हालतुरीनें झार** आतां जेवावयास बसला असलाच पाहिजे अशा समजुतीनें वात शिलगवली. मोठा थोरला आवाज झाला. दोघा क्रांतिकारकांना चहूंकडे धांवपळ चाललेली दिसली. या स्फोटानें बरेंच नुकसान केलें. पण दुसऱ्या दिवसापर्यंत **झार** मेला कां नाहीं हें त्यांना कळलें नाहीं. दुसरे दिवशीं, जेव्हां भोजनाचा दिवाणखाना कोसळला तेव्हां **झार** त्या दिवाणखान्यांत पाऊल टाकण्याच्या बेतांत होता असें त्यांना कळलें. एका क्षणामुळें त्यांचे प्रयत्न फुकट गेले व **झार** पुनः निसटला. इमारतीचें पुरें वाटोळें झालें. सामानसुमानाच्या चिंध्या झाल्या. तीस पहारेकरी मेले व इतर बरेंच लोक जखमी झाले. अशा प्रकारें लोकांनीं पुनः झारला तुझें जीवित सुरक्षित नाहीं असें बजावून सोडलें. यावेळीं **झारनें लॉरीस मेलीकॉफ** नांवाच्या गृहस्थाला अंतर्गतकारभाराचा मुख्य अधिकारी नेमला. हा अधिकारी जरा विचारी होता. त्यानें असलेल्या **झेमस्टो**सारख्या संस्थांचा जीर्णोद्धार चालविला. लोकांच्या सहकार्याशिवाय राज्ययंत्र चालणें शक्य नाहीं, अशी त्याची खात्री झाली. राज्यांत

सुधारणा केल्याशिवाय बंडाळी मोडणें शक्य नाहीं, असें त्यानें पाहिलें. पण त्याच्याहि विरुद्ध राज्यांत दुसरा पक्ष होता. त्या पक्षानें दडपशाही अधिक जोरानें केल्याशिवाय हे माथेफिरू ताळ्यावर येणार नाहींत, असें **झारला** सांगितलें. क्रांतिकारकांचे सर्व प्रयत्न आतां अगदीं गुप्तपणें चालले होते. **झारला** ठार करण्याची अवश्यकता त्यांना अत्यंत भासूं लागली. त्यांनीं या वेळीं **झारला** मारण्याचा एक प्रयत्न न करतां एकदम दोन प्रयत्न करावेत असें ठरविलें.

त्यांनीं **मलाइया सॅडोवाईया** या रस्त्यावर सुरुंग लावण्याचें ठरविलें. त्या रस्त्याला लागून क्रांतिकारकांनीं एक दुकान भाड्यानें घेतलें. त्या दुकानांत ते लोणी, दहीं, दूध वगैरे ठेऊं लागले. त्यानें हा गवळ्याचा व्यापार अत्यंत सचोटीनें चालविला व लवकरच प्रतिष्ठित गिऱ्हाईक मिळविले. या दुकानाच्या आंतल्या बाजूला दुसरी खोली होती. या खोलींतून बोगदा खणण्याचें काम त्यांनीं सुरुं केलें. खणलेल्या भागावर रिकामे लोण्याचे डबे, पिपें वगैरे ठेवलेलीं असत. डबे वर असल्यामुळें आंत काय चाले हें कोणाला कळत नसे. पोलिसांच्या स्वाऱ्या दररोज दुकानांत येत जात, पण त्यांना चुकून सुद्धां आंत कांहीं काळेंबेरें असेल अशी कल्पना आली नाहीं. बाहेरचे लोक सचोटीनें व्यापार करीत व आंतील लोक तितक्याच सचोटीनें बोगदा पाडण्याचें काम चालवीत. अखेरीस बोगदा पुरा झाला. आंतमध्यें त्यांनीं इतकी दारु भरली कीं, ती दारू नुसता रस्ताच काय, पण रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या प्रचंड इमारती उडवूं शकली असती.

दुसरा प्रयत्न बाँबचा. त्याकरितां त्यांनीं एक खरेंखुरें प्रयोगालय काढलें. त्यांत एक अत्यंत बुद्धिमान असा **किब्रॉल्टशिट्झ** नांवाचा रसायनशास्त्रज्ञ काम करूं लागला. त्यानें अत्यंत स्फोटक अशीं द्रव्यें तयार करुन तीं हातांत सहज लपवितां येतील अशा बाँबमध्यें घालावयाचे ठरविलें. त्याच्या प्रयत्नाला यश आल्याचें लवकरच कळून चुकलें.

दरम्यान **मेलिकॉफनें** सुधारणांचा एक लांबलचक खर्डा तयार करुन त्याला **झारची** अर्धीमुर्धी संमतीहि घेतली. या सुधारणांची चर्चा बरेच दिवस लांबली व मृदंगवृत्तीचा **झार** जसा माणूस भेटेल तसें बोलूं लागला. पण अखेर **झारनें** या सुधारणा अंमलांत आणण्याचें ठरविलें. इतक्यांत क्रांतिकारकांनीं **झारला** उडविण्याची तयारीहि पूर्ण केली. त्यांना या सुधारणांचा पत्ता नव्हता. कदाचित् **झारनें** सुधारणांचा जाहीरनामा लवकरच लावला असता तर क्रांतिकारकांनीं आपले बेत सोडून दिले असते.

त्या दिवशीं **झारची** स्वारी **कोसॅक** पहारेकऱ्यांच्या गराड्यांत आपल्या गाडींतून राजवाड्यांत परत आली व **कॅथेराइन** कॅनालजवळील एका रस्त्यावर गाडींत बसून राहिली. इतक्यांत एका स्त्रीनें--**सोफिआ पेरोव्हस्किआ**—आपला रुमाल कोणाला न दिसेल अशा बेतानें हालविला. रुमालाची योग्य अशी खूण कळतांच पायरस्त्यावरील एका माणसानें एक लहानसा गोळा ह्या गाडीवर

टाकला. हा कापसांत गुंडाळलेला बाँब होता. बाँब उडाला. जवळची जमीन इतक्या जोरानें हादरली कीं, गाडीच्या तळाचे तुकडे तुकडे झाले; एवढेंच नव्हे तर **१४ कोसॅक** तत्क्षणीं प्राणाला मुकले. पण **झार**--**झार**-गाडींतून खालीं उतरला व मेलेल्या व जखमी लोकांजवळ गेला. त्याच्या चाकरानोकरांनीं " गर्दीनें गाडी दबडतो, आपण आंत बसा " अशी विनंति केली. **झारला** वाटलें संकट टळलें. तो परत जाण्यास तयार होईना. इतक्यांत एक तरुण जवळ आला. त्या तरुणाकडे या गडबडींत कोणाचें लक्ष गेलें नव्हतें. त्यानें पहिल्या जातीचाच पण दुसरा बाँब **झारवर** टाकला. या बाँबनें **झार** छिन्नविच्छिन्न झाला व तो विद्यार्थी-**ग्रीनेविटस्की**-हाहि गतप्राण झाला. अशा प्रकारें झारचा अंत झाला.

झारच्या मृत्यूनंतर रशियांत जो कसाईखाना माजला, त्याची हकीगत सांगण्यापेक्षां कल्पनाच केलेली बरी. लष्करी फौजफाटा जमा झाला. रेल्वे, पूल व प्रत्येक रस्ता लष्करी शिपायांनीं आपल्या तांडवाकरितां ताब्यांत घेतला. कोणाचा नुसता संशय आला कीं पकड, असें त्यांनीं चालविलें. वाटेल त्यानें हा **निहिलिस्ट** आहे, असें पोलिसाला सांगावें व पोलिसांनीं अधिक चवकशी न करतां त्याला पकडावें असा प्रकार सुरू झाला. एकट्या **सेंटपिटस्बर्गमध्यें** दोन दिवसांत ८०० लोक पकडले. लवकरच सर्व क्रांतिकारक पकडले गेले. क्रांतिकारक हें पोलिसच्या स्वाधीन होण्यास मागेंपुढें पाहीनात. त्यांना आपल्या पराक्रमाबद्दल कृतकृत्यता व अभिमान वाटूं लागला. फांसावर चढणे हें मानाचें आहे, अशी त्यांची समजूत होती.

त्यांच्यावर मामुली खटले झाले. घरांच्या झडत्यांना तर सुमारच नव्हता. अखेरीस **सोफिया पेरोस्किया, किबॉल्टशिटझ. स्केलिबॉफ, मिहालेकॉफ व जेसी हेफमन** यांना फांशीच्या शिक्षा फर्मावल्या. **जेसी हेफमन** ही स्त्री होती व ती गरोदर होती. इतरांना तावडतोब फांसावर लटकावले; पण बिचारीच्या पोटांतील गोळ्यानें अपराध केला नसल्यामुळें ती बाळंत होईपर्यंत तिची शिक्षा पुढें ढकलली.

अशा प्रकारें या रशियन नाटकांतील दुसऱ्या अंकाचा असा शेवट झाला.

तिसरा ॲलेक्झांडर.

नवे **झार** गादीवर येतांच त्यांना **मेलिकॉफनें** आपल्या सुधारणांचा खर्डा दाखविला. **झारनें** तो वाचून बरा आहे, असा शेरा मारला. त्यानें त्या सुधारणांसंबंधीं आपल्या प्रधानांचें काय मत आहे याची चवकशी केली. अनुकूल असणाऱ्यांचें मताधिक्य झालें. **झारसाहेब** या सुधारणांना मान्यता देणार तोंच २३ मार्च रोजीं क्रांतिकारकांच्या कार्यकारी मंडळानें एक पत्र **झारला** धाडलें. त्या पत्राचा जणूं काय आपल्याला अपशकून झाला असें **झारला** वाटलें. क्रांतिकारकांनीं पाठविलेलें पत्र फारच महत्त्वाचें व वाचनीय असें आहे. त्याचा थोडक्यांत सारांश असा होता.

" राजा, तुझ्या बापाच्या मृत्यूमुळें तुला दुःख झालें असेल. पण दुःखाच्या

पलीकडे कर्तव्य आहे. हें कर्तव्य आम्हाला आत्मत्याग करावयास सांगत आहे. राजा, लवकर शुद्धीवर ये, नाहींतर वहाणाऱ्या रक्ताच्या नद्या थांबणार नाहींत. तुझ्या बापाचा खून म्हणजे आकस्मिक गोष्ट नव्हती. त्यांनीं पापें केलीं त्यांचें तें योग्य प्रायश्चित्त होतें. गेल्या १० वर्षांत किती लोकांच्या आहुत्या पडल्या याचा विचार कर. पण या आहुत्यामुळें आमची चळवळ न थांबतां उलट वाढीसच लागली. क्रांतीची चळवळ ही व्यक्तींवर अवलंबून नसते. राजांनीं कितीहि लोक फांसावर लटकावले तरी त्याच्या विरुद्ध असलेली चळवळ मरणार नाहीं. राजा, तूं आपल्या दडपशाहीनें सारें राष्ट्र चिरडूं शकणार नाहींस; व तुझ्या दडपशाहीनें असंतोषहि नष्ट होणार नाहीं. उलट त्यामुळें क्रांतिकारक आपल्या चळवळी अधिक संघटित करतील. असा अनुभव तुझ्या वडिलांना आलाच आहे. १८७८ व ७९ च्या दडपशाहीमुळेंच दहशतीच्या युगाला आरंभ झाला. **झारनें** नाहक अनेक लोकांना फांसावर चढवले. तूं जर आपलें धोरण बदललें नाहींस तर क्रांतिकारकांची चळवळ फैलावल्याशिवाय रहाणार नाहीं हें पक्कें लक्षांत ठेव. रशियांत बंड होईल व जुनी सत्ता नष्ट होईल. हें शब्द पोकळ आहेत असें समजूं नकोस. सध्यांचें राज्य म्हणजे भामट्यांची टोळी बनली आहे (A gang of usurpers) तेव्हां राजा, लोकांना सत्ता दे; नाहींतर क्रांतीला तयार हो. राजांना ठार करणें रशियांत फार लोकप्रिय आहे. " पत्र बरेंच मोठें असून त्यांत त्यांनीं शेवटीं भाषण, लेखन, मुद्रणस्वातंत्र्य मागितलें आहे व सुधारणा कोणत्या कराव्यात याचें टिपण दिलें आहे. **झारला** मारून १०।१२ दिवस लोटतात न लोटतात व हजारों लोकांच्या प्राणाची धुळधाण उडून जाते तोंच असें पत्र **झारला** पाठविण्यांत येतें, यावरून क्रांतिकारकांची कर्तव्यनिष्ठा दिसून येते.

झारनें अर्थातच या पत्राचा विचार केला नाहीं. उलट हें पत्र आल्यामुळेंच आपण देऊं केलेल्या सुधारणा मागें घेतो असें त्यानें फर्मावलें. शेवटीं त्यानें **मोलिकॉफला** घरीं बसायला लावून तो **पॉबीडोनोस्टसेफच्या** मतानें वागूं लागला. हे राजश्री धर्मगुरू होते व ते अत्यंत दुष्ट होते. यांच्याकडून **झारनें** पुनः सुधारणा लिहून घेतल्या. त्या अत्यंत अपुऱ्या होत्या. जेव्हां **मोलिकॉफच्या** वाचनांत त्या आल्या, तेव्हां तो म्हणाला. " हा विश्वासघात आहे. " अशा प्रकारें नव्या **झारनें** लोकांच्या आपल्याविषयींच्या आशा नष्ट करून, पुनः जुन्या चकोरींतूनच कारभार हांकण्याचें ठरविलें.

झार राजा स्वतःला यावेळीं फार भिऊं लागला. तो **गाट्सचीना** राजवाड्यांत जवळ जवळ कैद्याच्या स्थितींत राही. तो बाहेर पडत नसे व पडलाच तर इतक्या गडबडीनें परत येई कीं, त्याच्या जाण्यायेण्याची क्रांतिकारकांना गंधवार्ताहि नसे. तथापि क्रांतिकारकांनीं आपल्या पुढाऱ्यांना पोलिसांनीं फांसावर लटकावल्याबद्दलचा सूड उगवून घेतला. त्यांनीं पुष्कळ अधिकाऱ्यांना मृत्यूच्या शिक्षा फर्मावून त्या अंमलांतहि आणल्या. या **झारच्या** कारकीर्दींत त्यांनीं विशेष पराक्रम न गाजवितां स्वतःच्या चळवळीचें सूक्ष्म निरीक्षण केलें. आपलें चुकलें कोठें व आपले

बेत यशस्वी होण्याकरितां काय काय सुधारणा केल्या पाहिजेत, याचा त्यांनीं शास्त्रशुद्ध पद्धतीनें विचार केला.

याच सुमारास एक नवी चळवळ निघाली. त्या चळवळीला **स्लॅवोफिलिझम** म्हणतात. चळवळ जुनीच होती, पण तिला विपरीत स्वरूप या काळीं प्राप्त झालें. ही चळवळ सुरुं करणाऱ्यांच्या मनांत प्रथम देशभक्तीची कल्पना होती. **स्लाव** राष्ट्रांचें एकीकरण करावें, त्यांचें सामर्थ्य वाढवावें, **युरपमधील** मालावर बहिष्कार घालून रशियाचाच माल घ्यावा, इत्यादि चांगलीं ध्येयें त्यांच्यापुढें होतीं. पण पुढें ज्यांच्या हातीं ही चळवळ आली, ते **युरपचा** इतका द्वेष करूं लागले कीं, तिकडून आलेल्या स्वातंत्र्याच्या कल्पनेवरहि त्यांनीं बहिष्कार पुकारला. त्यांनीं आपली एक राज्यकारभाराची योजना जाहीर केली. तींत **झारला** अमर्याद सत्ता असावी असें म्हटलें होतें. तसेंच लोकांनाहि विचारस्वातंत्र्य असावें असें प्रतिपादन केलें होतें. पण हा प्रकार अत्यंत मूर्खपणाचा होता. **झारला** अमर्याद सत्ता देणें म्हणजेच लोकांच्या स्वातंत्र्यावर घाव घालणें होतें. आणि जेव्हां झारचा खून झाला, तेव्हां या चळवळीचे पुरस्कर्ते फक्त **झारच्या** सत्तेचें समर्थन करूं लागले. या चळवळीचा सूत्रचालक **काटॉव्ह** हा होता व त्याचें Moskowskia viedomosti या नांवाचें वर्तमानपत्र होतें. हें वर्तमानपत्र फारच वजनदार असल्यामुळें त्याचा **झारच्या** पक्षपाती लोकांवर परिणाम होऊं लागला. हा **काटॉव्ह** लवकरच **झारचा** व **पॉबीडोनोस्टसेफ** याचा मित्र बनला. ही हकीगत देण्याचें कारण पुढील क्रांतीचा धागा नीटपणें समजावा हेंच होय.

या **झारचें** राज्य इतकें निरुपयोगी व प्रतिगामी स्वरूपाचें कां झालें हें समजण्यास त्याचा स्वभाव लक्षांत घेतला पाहिजे. हा **झार** एखाद्या गाढवाप्रमाणें मरेतों काम करी. सकाळच्या ६ पासून पहांटेच्या दोनपर्यंत सरकारी कागदपत्र पहाण्याचें याचें काम चालें. पण इतकेंहि करून डोक्यांत बुद्धि नसल्यामुळें त्याला कांहींच कळत नसे. एखाद्या खेड्याचा पाटील अगर तलाठी होण्याचीहि त्याची पात्रता नव्हती इतका तो मूर्ख होता आणि असा गृहस्थ राज्यावर बसला होता. हा राजा स्वभावानें फार चांगला होता असें म्हणतात. इतकेंहि असून त्याच्या अमदानींत रशिया खालावला. याला त्याची निर्बुद्धता जशी कारणीभूत आहे तशी त्याची स्वतःविषयीं भलती समजूत, संशयी वृत्ति, मनाचा कमकुवतपणा इत्यादि कारणें होत. धर्मावर त्याची विलक्षण भक्ति होती. त्यामुळें धर्मगुरु जें काय सांगेल तें प्रमाण. बापाच्या वेळेपासूनच त्या **पोबोडीनोस्टसेफला** या **झारचें** धर्मगुरू म्हणून ठेवलें होतें. त्यानें ह्या **झारचें** मन पूर्णपणें कलुषित करून स्वतःचा पगडा त्यांच्या मनावर बसवला. या धर्मगुरूप्रमाणें दुसरे अधिकारीहि **झारला** आपल्या कह्यांत ठेवीत होते. ते अधिकारी म्हणजे **काऊंट डीमिट्री टॉलस्टॉय व इग्नाटीफ** हे होत. **झारनें** यांच्या ताब्यांत सारा राज्यकारभार दिला होता. हे तिघेजणच रशियाचें राज्य त्यावेळीं

हार्कीत होतें, असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यामुळेंच ह्या **झारची** कारकीर्द इतकी वाईट व प्रतिगामी स्वरूपाची झाली.

या **झारच्या** अमदानींत नोकरशाही अत्यंत शिरजोर, अत्यंत शक्तिमान व संपन्न झाली. या राजांच्या राजवटींत नोकरशाहीनें पूर्वी लोकांना मिळालेल्या सुधारणाहि नष्ट करुन टाकण्याचा निश्चय केला व त्यांत त्यांना यश आलें. पूर्वी प्रत्येक जिल्ह्याला आपला कारभार चालविण्याकरितां **झमस्टो** नांवाचें एक प्रातिनिधिक मंडळ दिलें होतें. **झारनें** या मंडळाची सत्ता काढून घ्यावी म्हणून त्यांच्यावर जिल्हानिहाय अधिकारी नेमले. हे अधिकारी वाटेल ती सत्ता गाजवूं शकत. तो ज्या मंडळाचा सभासद असे, त्या मंडळाच्या वाटेल त्या सभासदाला तो फटके मारूं शके इतकी अमर्याद सत्ता त्याला होती. लाचलुचपतीला तर सीमाच नसे. हा जिल्हाधिकारी वाटेल तितक्या शेतकऱ्यांना आपल्या घरीं किंवा शेतावर मजूर म्हणून राबवूं शके. पुढें पुढें **झारनें** तर त्याला इतकी सत्ता दिली कीं, **झेमेस्टोच्या** निवडणुकीकरितां हा अधिकारी सांगेल त्यांनाच उभें रहातां येई. शेतकरी कदाचित् शहाणे होतील, म्हणून खेड्यापाड्यांतील कारकुनांच्या जागा ज्यांना निव्वळ अक्षरओळख असेल अशांनाच देण्यांत आल्या. या सर्व प्रकारावरून जुनी गुलामगिरी नव्या स्वरुपांत अवतीर्ण झाली, असें म्हणावयास हरकत नाहीं. हे जिल्हाधिकारी किती प्रजाहितदक्ष होते याचें एकच उदाहरण घेऊं. एका गांवांत शेतकीच्या मंडळानें शेतीकरतां सुधारलेलीं उपकरणीं, खतें, बीं वगैरे घेण्याचें ठरविलें. लोकांना या नव्या साहित्यसामुग्रीपासून बराच फायदा झाला. शेतकीमंडळानें आणविलेलीं खतें वगैरे लवकरच संपलीं; तेव्हां त्यांनीं बाकीच्या शेतकऱ्याकारितां आणखी सामान आणविण्याचें ठरविलें. इतक्यांत हे जिल्हाधिकारी मध्यें पडले. ते म्हणाले, " मला हे शेतकरी चांगल्या बिया, फॉस्फेट्स व दुसऱ्या अजब चिजा कशाकरतां आणतात हें समजत नसल्यामुळें, मी जिल्हाधिकारी म्हणून माझ्या ताब्यांतील शेतकऱ्यांना अशा प्रकारची पैशाची उधळपट्टी करण्यास मना करीत आहेत. " असें मौजेचे प्रकार ह्या **झारच्या** अमदानींत अनेक झाले. त्यांतील दुसऱ्या एका प्रकाराकडे आपण वळूं.

ज्यूंवर संक्रांत.

या **झारच्या** वेळीं **पॉबीडीनोस्टसेफ** हा धार्मिक बाबतींत कुल्मुखत्यार होता हें वर आलेंच आहे. या राजश्रींना जुन्या ग्रीक चर्चच्या आपल्या धर्माशिवाय इतर धर्म व पंथ मूर्खपणाचे वाटत. तेव्हां ह्या साऱ्या पंथाचें रशियामधून उच्चाटन करण्याचा यांनीं चंग कसला. पहिली पाळी **ज्यूवर** आली. **ज्यू** लोक व्यापारांत पुढे असत व त्यांचें नांव हा जगभर एक निंदेचाच विषय झाला होता. हे **ज्यू** पुष्कळ वर्षेपर्यंत **पोलंडमध्यें** व **जर्मनी, हंगेरी, ऑस्ट्रिया** व **रुमानियाच्या** सरहद्दीवर रहात असत. त्यांना खुद्द रशियांत घरेंदारें करून रहाण्यास परवानगीच नसे. पण १८६५ च्या सुमाराला कांहीं ज्यू राजेसाहेबांच्या अन्य व्यवधानामुळें रशियांत गुपचूपपणें राहूं लागले. तेव्हां त्यांचा रशियांतून नायनाट करणें हें त्यावेळच्या राज-

मन्त्र्यांना अवश्यच वाटलें. हे मंत्री **इग्नाटीफ** होत. त्यांची फूस मिळतांच ज्यू लोकांचीं दुकानें, घरें, लुटलीं जाऊं लागलीं व त्यांच्या पुढाऱ्यांचे खून होऊं लागले. हा वणवा हळूहळू रशियांतील सर्वच गांवांतून पसरला. **इग्नाटीफ** ज्यूंच्या विरुद्ध याच वेळीं जाण्याचें कारण, म्हणजे त्याला एका सवद्यांत त्यांच्याकडून १० लाख रुबल्स मिळाले नाहींत हेंच होय. दंग्याला पहिली सुरुवात जरी रशियनांनीं केली होती तरी **झारसाहेबांनीं** माहितिपत्रक प्रसिद्ध करून या दंग्यांचें खापर सर्वस्वीं **ज्यूंवर** फोडलें. **ज्यूंना** हद्दपार करण्याचा मक्ता लवकरच **पोबीडिनोस्टसेफ** याच्याकडे आला. १८८२ सालीं एक हुकूम काढण्यांत येऊन जे ज्यू रशियांत येऊन राहिले होते त्यांना रशिया खालीं करण्यास सांगितलें. अशा ज्यूंची संख्या दहाहजारा वर होती. यांना घरेंदारें सोडून जाण्यास इतक्या जलदीनें लावलें कीं, त्यांना आपलीं घरेंदारें विकण्यास सवड मिळाली नाहीं, सामानसुमान बरोबर नेता आलें नाहीं किंवा व्यापारधंदा आवरतां आला नाहीं. पोलिसांनीं त्यांचें बरेंच सामान लांबवलें व बाकीचें रस्त्यावर आणून ठेवलें. **किफमधील ज्यूंना** तर हा हुकूमहि कळला नव्हता. तरी दीड दोन हजार **ज्यूंना** हुकूम मोडला म्हणून कैद्यासारखे बांधून प्रत्येकीं १३०० रुबल्स दंड केला व २४ तासाच्या आंत सरहद्दीबाहेर फेंकून दिलें. **रिगामध्यें ब्यूमेंथाल** नांवाचा अत्यंत श्रीमंत ज्यू होता. त्याच्या दोन गिरण्या व दुकान होतें. त्याला चोवीस तासांत निघून जाण्याचा हुकूम सुटला व त्याची सर्व मालमत्त जप्त झाली. पोलिसांनीं बेकायदेशीर लूट मारलीच; पण ज्यू लोकांच्या शाळा, इस्पितळाचे फंडहि लांबविले. सरहद्दीवरील **ज्यूंचा** अतोनात छळ झाला. २८०००० **ज्यूंची** नुसती कुतरओढ करून त्यांना पिटाळून लावण्यांत आलें. हे बिचारे नवे ज्यू जेथे गेले तेथें त्यांचे अतोनात हाल झाले. अन्नवस्त्राविना पुष्कळ मेले व राहिलेल्यांचा समाचार रोगराईनें घेतला. सगळ्या जगानें रशियावर याबद्दल टीका केली पण त्याला त्याचें काय ? ज्यू लोकांना आपल्या धर्मांत घ्यावे असा रशियाचा उद्देश असावा असें म्हणावें तर तेंहि नाहीं. कारण रशिया **ज्यूंना** आपल्यांत घ्यावयास तयार नव्हता. ज्यू लोक व्यापारांत, उद्योगधंद्यांत, बुद्धिमत्तेंत, शाळाकॉलेजांत किंबहुना सर्वच ठिकाणीं रशियापेक्षां श्रेष्ठ होते. हेंच त्यांचें वर्चस्व त्यांच्या अमानुष छळास कारणीभूत झालें. यापुढें **ज्यूंना** रशियांतील शिक्षणसंस्थाच काय पण रुग्णालयेंहि बंद झालीं. त्यांना रेल्वे, ट्रॅम वगैरेमध्यें बसण्यास जागाहि मिळेनाशा झाल्या **किफच्या** गव्हर्नरानें एक **ज्यूचें** इस्पितळ बंद केलें. कारण तें रशियन लोकांच्या चर्चपासून ३०० फुटाच्या आंत होतें म्हणून. दुसऱ्या एका अधिकाऱ्यानें ज्यू मुलें फार गडबत करतात व ही गडबड त्यांच्या आईबापांनीं थांबवली नाहीं तर त्यांना फटके मिळतील असें जाहीर केलें. तिसऱ्या अधिकाऱ्यानें कांहीं रस्ते सोवळे ठरवून त्या रस्त्यांनीं **ज्यूंना** जावयाची बंदी केली. **झारसाहेब** या **ज्यूंना** हलालखोराच्या तोडीचे मानीत. त्यांच्या कानांत कोणी तरी ज्यू हे क्रांतिकारकांना मदत करतात असें भरवून दिलें होतें; त्यामुळेंहि त्यांचा ते अत्यंत द्वेष करीत. याशिवाय या सुमारास रशियांतील

धार्मिक उपपंथाच्या लोकांचाहि अतोनात छळ केला. तो छळ ज्यूंच्या छळाइतकाच व कांहीं प्रसंगीं त्याहिपेक्षां जास्त होता.

उमरावांचें पुनरुज्जीवन.

या **झार**च्या कारकीर्दींत शेतकऱ्यावर अत्यंत असह्य कर बसविण्यांत आले. राशियांत ९/१० शेतकरी असल्यामुळें त्यांचा उत्कर्ष तोच राष्ट्राचा उत्कर्ष अशी वस्तुस्थिति आहे. पण **झारनें** शेतकऱ्यांना अनेक प्रकारें छळलें, या छळामुळें **झारला** पुनः शत्रु उत्पन्न झाले. तेव्हां त्याला आपल्याला कोणाचा तरी पाठिंबा असावा असें वाटूं लागलें व त्याकरितां त्यानें गुलामगिरीमुळें नष्ट झालेल्या **अमीरउमररावांच्या** वर्गाला संघटित करून त्यांचा आपल्याला पाठिंबा मिळवावा असा निश्चय केला. हा पाठिंबा पैशाशिवाय मिळणें शक्य नव्हतें. तेव्हां ज्या जमीनदारांची गुलामगिरीच्या उच्चाटनामुळें दुर्दशा उडाली होती, त्यांना सुस्थिति प्राप्त करून देण्याकरितां त्यांनीं खालील योजना केली. १८८६ सालीं त्यांनीं एक बँक काढली. या बँकेंतून त्यानें जमीनदार वर्गाला मोठमोठ्या रकमा कर्जाऊ देण्याचें ठरविलें. जमीनदारांनीं आपल्या जमिनीची अमुक अमुक किंमत होते असें सांगावयाचें व बँकेनें त्यांच्या शब्दावर विश्वास ठेऊन त्यांना रकमा द्यावयाच्या असा सपाटा सुरू केला. बँकेवर भराभर उड्या पडूं लागल्या. पहिल्या वर्षीं या बँकेंतून ६८० लाख **रूबल्सची** व दुसऱ्या-वर्षीं ७१० लाख **रुबल्सची** उचल करण्यांत आली.

या मूर्खपणाचा परिणाम व्हावयाचा तसाच झाला. पहिल्या वर्षीं एकाहि कर्ज-दारानें व्याज आणून दिलें नाहीं. आणि तिसऱ्यावर्षीं १२० लाख व्याजापैकीं फक्त १५ लाख वसूल झालें. हें व्याज वसूल होत नसल्यामुळें पुढें मूळ रकमेंत जमा करण्यांत आलें. पण यानंतर पुढें आणखीहि शहाणपणा करण्यांत आला. जें व्याज किंवा मुद्दल परत येणार नाहीं तें सोडून देण्यांत यावें असा **झारनें** हुकूम सोडला.

एवढ्यावर बँकेनें कारभार न आटोपतां १८९२ सालीं पुनः ३४०० लाख **रुब-ल्सची** दरिद्री सरदारांना खैरात केली. अशा प्रकारची प्रजेच्या पैशाची उधळ-पट्टी पुढेंहि अनेक वर्षें चालू होती. पण अखेर राजकीय हेतूनें केलेली ही योजना पूर्णपणें फसली.

राजेसाहेब गादीवर आल्यानंतर त्यांनीं शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याकरितां वरील बँकेप्रमाणेंच एक बँक काढली. या बँकेंतून शेतकऱ्यांना कर्ज मिळण्याची सोय झाली. हें कर्ज त्यांनीं आपल्या जमिनी परत मिळविण्याकरितां खर्च करावयाच्या होतें. या बँकेकरितां सरकारनें ५½ टक्क्याचे कर्जरोखे काढले व हे रोखे विकून आलेला पैसा त्यानें बँकेंत ठेवला. याशिवाय बँकेनेंहि ५ लक्ष **रुबल्सचें** कर्ज त्यांत घातलें. ही बँक १८८३ चे अखेर स्थापन झाली. पहिल्या वर्षीं या बँकेनें शेतकऱ्यांना ९५ लाखाचें कर्ज दिलें. शेतकऱ्यांनीं या ९५ लाखांत आपल्या पदरची भर घालून एकंदर ११० लाखाच्या जमिनी विकत घ्यावयाच्या होत्या. पुढील वर्षीं बँकेनें

१४० लक्षांचें कर्ज दिलें. पण पुढें ही रक्कम खालावत जाऊन सहा वर्षांनीं फक्त ५५ लाख कर्ज देण्यांत आलें. हें कर्ज देतांना पहिल्या प्रथम शेतकऱ्यांवर त्यांनीं बाहेरून शेकडा १२ टक्के कर्ज आणलें पाहिजे अशी अट होती. पुढें ही अट वाढवून बारा टक्क्यावरून २५ टक्क्यावर नेली. बाहेरून शेतकरी जे कर्ज काढीत, त्यावर जबर व्याज द्यावें लागे व हें व्याज शेकडा ३५ पर्यंत जाऊन बसलें. पुढें पुढें तर तेथील नोकरशाही त्यांचा अतोनात छळ करूं लागली.

१८७१ मध्येंच जेव्हां शेतकऱ्यांच्या जमाखर्चाची चौकशी केली, तेव्हां प्रत्येक शेतकरी शेकडा ४५ उत्पन्न सरकारला देतो असें कळून चुकलें. ह्या अडचणींत सरकारनें जीविताला अवश्यक असणाऱ्या मीठ, काड्याच्या पेट्या वगैरेसारख्या वस्तूंवर अतोनात कर बसवून शेतकऱ्यांचे प्राण कंठास आणले होते. १८८९–९० च्या सुमाराला प्रत्येक प्रांताची जमाबंदी २०–३० लाखानीं तुंबलेली आहे, असें कळून चुकलें.

या अडचणींतून सुटण्याकरितां सरकारनें जमाबंदीचे नवे नियम करावयास पाहिजे होते. पण या उलट त्यांनीं प्रकार करून शेतकऱ्याचीं गुरेढोरें, घरेदारें, भांडीकुंडीं, विकण्याचा सपाटा लावला. शेतकऱ्यांना कर्ज दिलें व त्यांचें व्याज वसूल झालें नाहीं म्हणून असा प्रकार करण्यांत आला. पण एवढ्यानें सरकारचें समाधान झालें नाहीं. व्याज न देणाऱ्या शेतकऱ्यांच्या पाठीवर निष्ठुरपणें आसूड मारावेत असें झारचें फर्मान सुटलें. या सगळ्या आपत्तींत १८९१ मध्यें **व्होल्गा**मध्यें दुष्काळ पडला. लोक गवताच्या व सालीच्या भाकऱ्या करून खाऊं लागले. ३॥ कोट लोकांवर हा दुर्धर प्रसंग आला.

लोकांच्या प्रतिनिधींनीं **झारला** दुष्काळाची कल्पना आणून दिली. पण त्यानें आपला एक अधिकारी चौकशीकरितां तेथें पाठविला. या अधिकाऱ्यानें तेथें दुष्काळ बिलकूल नाहीं, असा रिपोर्ट केला. यापुढें सरकारनें वृत्तपत्रांना दुष्काळाविषयीं बातमी प्रसिद्ध करण्यास मनाई केली. सरकारच्या बाजूचीं पत्रें, दुष्काळाचा बागुलबुवा क्रांतिकारकांनीं मुद्दाम उभा केला आहे असें म्हणूं लागलीं. सरकारनें लाखों लोकांचे प्राण अन्नपाण्यावांचून अशा प्रकारें सहज हरण केले असते. पण त्या वेळीं साऱ्या जगांत ज्याचें नांव दुमदुमून राहिलें आहे असा **टॉलस्टॉय** पुढें आला व त्यानें वस्तुस्थितीचें चित्र रेखाटलें. **टॉलस्टॉय**च्या विरुद्ध जाण्याची सरकारची छाती नसल्यामुळें **झारनें** प्रथम रशियाच्या बाहेर धान्य पाठविण्याची बंदी केली. पण राष्ट्रांतील धान्य विकत घ्यावयास ४० कोट रुबल्स पाहिजे होते. **झारनें** आपल्या जवळ १२० लाखापेक्षां जास्त पैसेच नाहींत असें जाहीर केलें. पण अखेर ही रक्कम त्यानें १२ कोटींवर नेली. बाकीची रक्कम लोकांनीं धर्मदाय म्हणून दिली असती. पण सरकारला त्याची भीति वाटली म्हणून त्यानें हा धर्मादाय आपल्यामार्फत झाला पाहिजे, असें फर्माविलें. या जुलमी हुकमाला कोणीं दाद दिली नाहीं व **झार**लाहि हा हुकूम मागें घ्यावा लागला.

अखेरीस **झार**ला आपल्या राज्यांत दुष्काळ पडण्यास उद्योगधंदे नाहींत हेंच कारण होय असें वाटलें. तेव्हां देशांतील उद्योगधंद्यांची वाढ व्हावी म्हणून त्यानें बाहेरून येणाऱ्या मालावर जबर जकाती बसविल्या. यामुळें देशांतील उद्योगधंद्यांची वाढ झाली नाहींच पण जे कारखानेवाले होते ते वाटेल त्या दरानें आपला माल विकूं लागले व श्रीमंत होऊं लागले. साबण, मेणबत्त्या, पेट्या वगैरेंच्या किंमती दुपटीनें वाढल्या व विळे, कोयते, नांगर वगैरेंच्या किंमती तिपटीनें वाढल्या. शेतकऱ्यांवरील जुलमाचा अतिरेक झाला. त्यांच्या शरिरांत प्राण नव्हता व खिशांतहि त्राण नव्हता. त्यामुळें ते टेकीस आले व रशियामध्यें त्यामुळें दरवर्षी दुष्काळ पडूं लागले. प्रत्येक गांवाची जमाबंदी लक्षावधी रुपये तुंबली. अशा प्रकारचें या **झार**चें अत्यंत निराशाजनक राज्य झालें. याला कारण व्यापारी ज्यूंचें उच्चाटन, अमीर **उमरा**वांना खैरात, नोकरशाहीची खिसेभरणी व शेतकऱ्यांचा अमानुष छळ हेंच होय. या सर्व छळांचें पर्यवसान असंतोषांत व बंडाळींत व्हावें हें क्रमप्राप्तच होतें. हा असंतोष एकदम उद्भवला असें नाहीं. मधून मधून त्याचें आविष्करण होत होतेंच.

१८८० मध्येंच क्रांतीच्या विचारांनीं सैन्यांत प्रवेश केला होता. **सेंटपिटर्सबर्ग** व **क्रॉन्सटॅडट**मधील सैन्यानें व आरमारांतील मोठमोठ्या अधिकाऱ्यांनीं एक गुप्त मंडळ काढलें होतें. त्यांत सुमारें वीस ऑफिसर्स होते. वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांनीं जसें हें गुप्त मंडळ काढलें होतें, तसेंच सामान्य शिपायांनींहि गुप्त मंडळ स्थापलें होतें. पण परस्परांची माहिती परस्परांना नव्हती. एकदां एक अधिकारी सैनिकांच्या कँपांत आला, तेव्हां त्याला सैनिक एक क्रांतीचें पत्र वाचीत असलेले दिसले. सैनिकांनीं पत्र दडविण्याचा प्रयत्न केला. पण त्या अधिकाऱ्यानें तें पत्र बरोबर नेलें. शिपायांना आपली आतां गच्छन्ती होणार असें वाटलें. पण मागाहून दोघेहि क्रांतीच्या गुप्त कटांतीलच आहेत असें कळून चुकलें. तेव्हां उभयतांच्या आनंदाला सिमा उरली नाहीं. सैनिक व अधिकारी यांची बंड करण्याला या वेळीं तयारी होती; पण बंडाला मुहूर्त असा सांपडेना. कालहरणामुळें सरकारला बंडाचा सुगावा लागला व बंडखोरांना पकडण्यांत येऊन त्यांची चळवळ नष्ट करण्यांत आली. सैन्यांतले सुमारें ३०० अधिकारी गिरफदार केले गेले. यानंतर लहानमोठे खून चालूच होते. मोठा म्हणण्यासारखा प्रयत्न १८८७ मध्यें **झार**ला मारण्याकरितां करण्यांत आला. त्या वेळीं तो आपल्या बापाच्या मृत्युदिनानिमित्त प्रार्थनेला त्याच्या थडग्याकडे चालला होता. त्या वेळीं त्यावर एक बाँब टाकण्यांत आला. पण बाँबची रचनाच चुकल्यामुळें तो प्रयत्न अयशस्वी झाला.

आपल्याजवळ उत्तम बाँब असावेत म्हणून या क्रांतिकारकांनीं **झुरीच**ला बाँबचा कारखाना काढला. तेथें लहान घड्याळाच्या आकाराचें उत्कृष्ट बाँब होऊं लागले. पण या बाँबची कसोटी पहात असतां त्याचा संशोधक **ब्रिन्स्टेन** हाच स्फोटानें मेला. त्याच्या मृत्यूमुळें ह्या कारखान्याचा तेथील सरकारला पत्ता लागून

त्यानीं बरेच लोक पकडले. तथापि हा शोध नष्ट झाला नाहीं. त्यांनीं **झुरीच**हून आपला तळ **पॅरिस**ला नेला व तेथून ते चोरूनमारून रशियांत बाँब पोहोंचवूं लागले. खुद्द रशियांतहि ह्या स्फोटक द्रव्याचे बरेच कारखाने होते व पोलिसांना ते कारखाने अनेक प्रयत्न करूनहि नष्ट करतां आले नाहींत.

१८९५ मध्यें **झार**ला मारण्याचा पूर्वीपेक्षांहि मोठा प्रयत्न करण्यांत आला; पण तोहि फसला. अशा प्रकारें लहानसान प्रयत्न चालूच होते. **स्टॉलिनीकॉफ** नांवाच्या मोठ्या अधिकाऱ्यानें क्रांतिकारकांचा बराच छळ केला, २०० जणांना पकडले, फटके मारले, शाळेंतील विद्यार्थी, अजाण जनता, याचेंहि अनान्वित हाल केले, अखेरीस त्याला प्राणाला मुकावें लागलें. या **झार**च्या कारकीर्दीत पूर्वीच्या **झार**पेक्षांहि अधिक धरपकड, हद्दपारी, फांशी वगैरे झाली. नुसत्या संशयावरून फासांवर किती तरी लोक लटकले. छापखान्यावर तर **झार**नें हत्यारच उगारुन ठेवलें होतें. त्यामुळें बाहेरुन वृत्तपत्रें व हस्तपत्रकें छापून आणावीं लागत.

या छळामुळें क्रांतिकारकहि दमून गेले. त्यांनीं सर्व पक्षांचें एकीकरण करून **झार**पुढें किमान सुधारणा ठेवण्याचा निश्चय केला. यामुळें रशियांतील शेतकरी, रशियांतील मजूर, लिबरल व क्रांतिकारक या सर्वांत सारखीच जागृति होऊन सर्वचजण सारखेच प्रयत्न करूं लागले. पण **झार**नें त्यांच्याकडे लक्ष दिलें नाहीं. या वेळीं एक गोष्ट घडली, तिकडे आम्ही वाचकांचे लक्ष वेधूं इच्छितों. **सेब्रिकॉर** नांवाची एक वृद्ध लेखिका **झारशाही**मधील हा जुलुम पाहून अत्यंत संतप्त झाली. तिनें **झार**ला एक पत्र लिहिलें व तें पत्र त्याला पोहोंचावें म्हणून ती स्वतः बराच लांबचा प्रवास करून राजधानींत गेली. **झार**ला पत्र देण्यापूर्वी त्या पत्राच्या नकला सर्व युरपमधील वृत्तपत्रांना तिनें दिल्या होत्या. पत्रांत **झार**चे पराक्रम वर्णून त्याला लोकांची न्याय्य गाऱ्हाणीं ऐकण्याचा व त्यांना सनदशीर राज्यपद्धति देण्याची विनंती केली होती. पत्र वांचून **झार** म्हणालेः—

" That is very fine, but what business is it of hers. "

(हें ठीक आहे; पण हिला हा नसता उपद्व्याप कोणीं सांगितला ?) पुढें या बाईला हद्दपारीची शिक्षा झाली, हें सांगावयास नकोच.

झारला आपली प्रजा आपल्यावर अत्यंत असंतुष्ट आहे व आपल्याला मारण्यास टपली आहे, हें कळत नव्हतें असें नाहीं. त्याला आपण प्रजेचे मोठे हितकर्ते आहों असें वाटे व आपण प्रजेकरितां जितके श्रम केलें तितके दुसरे कोणी करूं शकणार नाहीं, असेंहि तो म्हणे. पण आपल्या प्रयत्नामुळें लोकांचे हाल कमी न होतां उलट वाढलेच आहेत व लोक अत्यंत असंतुष्ट आहेत, हेंहि तो कबूल करी. इतके असूनहि त्याला लोकाकरितां कांहीं करवलें नाहीं. याचें कारण त्याची स्वतःची नालायकी व नोकरशाहीचा त्याच्या भोंवतालचा गराडा हेंच होय. रशियामध्यें रक्तपात व इतर अनर्थ घडवून आणण्यास **झार**पेक्षां तेथील नोकरशाहीच अधिक कारण झाली.

हा **झार** पूर्वीच्या **झार**पेक्षां आपल्या जिवाला जपत असे. तो होताहोईतों

कधीं बाहेरच पडत नसे. महिनेचे महिने तो स्वतःला राजवाड्यांत कैद करून घेई. हा **वुइंटर** पॅलेसमध्यें न रहातां **गॅट्सचिनाच्या** वाड्यांत राही. तथापि याहि ठिकाणीं कोणी केव्हां आपला खून करील याचा नेम नाहीं, अशी त्याला भीति वाटे. रेल्वेनें प्रवास करतांना तो अशीच काळजी घेई. क्रांतिकारकांना आपल्या प्रवासाची वार्ता कळूं नये म्हणून त्याच्या गाड्या नेहमीं सज्ज असत व त्या गाड्यांचीं एंजिनें नेहमीं पेटलेलीं असत. त्याला **फिनलंडमध्यें** गेल्यावर निर्धास्तपणें रहातां येई व तेथें गेल्यावर त्याच्या तोंडावरील मृत्यूची छाया दूर होई. तथापि ह्या **फिनलंडलाहि** रशियाप्रमाणेंच कैचींत धरण्याचा त्यानें आपल्या सल्लागारांच्या सांगण्यावरून बेत केला होता. तो तसाच राहिला ही गोष्ट वेगळी.

झारच्या मृत्यूपूर्वीं रशियांत कोणत्या प्रकारच्या सुधारणा पाहिजेत याबद्दल बरींच पत्रकें वाटण्यांत आलीं. तीं कोठून आलीं व कशीं आलीं हें कोणाला ठाऊक न्हवतें. पण या पत्रकांचा परिणाम होण्यापूर्वींच तिसऱ्या **अलेक्झांडरचा** अंत झाला.

दुसरा निकोलस.

नवा राजा गादीवर आला म्हणजे लोक अर्थातच उत्सुकतेनें त्याच्याकडे पहात असतात. त्याच्या बोलण्यावरून, त्याच्या चालण्यावरून, त्याच्या हांसण्यावरून व आवडीनिवडीवरून आशाळभूत लोकांना आशा वाटत असते. या **झार**च्या वेळीं लोकांची वृत्ति अशीच झाली होती. आणि हा **झार**हि पूर्वीच्या सर्व **झार**पेक्षां अत्यंत वस्ताद असल्यामुळें आपल्या अंतःकरणांत काय जळत आहे, याची त्यानें लोकांना दादहि लागूं दिली नाहीं. त्यानें आपण नोकरशाहीचे मोठें शत्रू आहोंत असें दाखविण्याकरितां उगाच एका पोलीस ऑफिसरला तीन दिवस कैदेंत ठेवलें. लोकांना वाटलें हा **झार** आपल्या बाजूचा आहे व नोकरशाहीचा खरोखरच वैरी आहे. पूर्वीं रशियन भाषेशिवाय इतर भाषेंत राजनिष्ठेच्या शपथा घेणें म्हणजे गुन्हा समजत. पण या **झारनें पोलंड**मधील धर्माधिकाऱ्यांना असल्या अपराधाबद्दल झालेल्या शिक्षा तारेनें रद्द करवल्या. आतां तर लोक पैजावर पैजा मारून **झार** हा लोकपक्षाकडे वळणार असें ठासून सांगूं लागले. त्यानंतर **पोलंड**मधील **आर्चबिशप**च्या अध्यक्षतेखालीं एक शिष्टमंडळ **झार**ची भेट घ्यावयास आलें. भेटीचा उद्देश गेल्या **झार**बद्दल दुःखप्रदर्शन व नव्या **झार**बद्दल राजनिष्ठा व्यक्त करण्याचा होता. पण ही साधी भेट सुद्धां **झार**च्या अधिकाऱ्यांनीं होऊं दिली नाहीं. उलट त्यांनीं त्यांना एकदम चालते व्हा असा हुकूम सोडला. **झार**ला ही बातमी समजतांच त्यानें शिष्टमंडळाला बोलावून आणून त्याची गांठ घेतली. या सर्व प्रकारावरून **झार** लवकरच कांहीं तरीं देईल, अशी सबळ आशा उत्पन्न झाली. **झारनें** आपण गादीवर आल्यावर शेतकऱ्यांना कराची माफी दिली. पण तो वसूल करण्याकरितां शेतकऱ्यांच्या पाठीवर चाबकांचे जबर तडाखे बसले होते व कर वसूल होण्याची आशा उरली नव्हती. हातांतून

पळालेल्या माशाकडे पाहून कोळ्यानें जसें म्हणावें कीं, हें मीं धर्माकरितांच केलें, तद्वतच हा प्रकार होता. दुसरा उपकार राजानें कैदी सोडण्याचा केला. हे कैदी ३२ वर्षांपूर्वी हद्दपार झाले होते; पण परमेश्वरकृपेनें ते जिवंत होते. त्यांना परत राशियांत येण्याचा हुकूम देण्यांत आला; तथापिं त्यांनीं आपल्या पूर्वींच्या गांवीं रहातां कामा नये, अशी त्यांत अट होती. याचा अर्थ हद्दपारीच्या जागेचें स्थलांतर झालें एवढेंच. तिसरा उपकार राजकीय कैद्यांवर केला. ज्या कैद्यांनीं राजाच्या चित्राचा किंवा पुतळ्याचा उपमर्द केला होता त्याना मोकळें सोडलें. पण बाकीच्या गुन्हेगारांना मात्र दयामाया दाखविण्यांत आली नाहीं. यावरून हळु हळूं **झार**च्या पोटांतील पाय दिसूं लागले आणि अखेरीस त्यानें जें भाषण केलें त्यावरून सर्वच उलगडा झाला. **झार** आपल्या भाषणांत निरनिराळ्या आशाळभूत शिष्टमंडळांना उत्तर देतांना म्हणालाः—

"Let it be understood by all that I devote my whole power to the best service of the people, but that the principle of the autocracy will be maintained by me as firmly and unswervingly as it was by my ever revered father."

माझ्या परमपूज्य वडलांनीं जें अमर्याद राजसत्तेचें तत्त्व अविचलितपणें व भक्कमपणें अंमलांत आणलें तें तत्त्व मींहि तसेंच पुढें चालविणार, असें **झार** म्हणाले व आशावाद्यांच्या मनांतील मनोरे ढासळले.

लवकरच दडपशाहीला सुरवात झाली. पहिला आघात पुस्तकावर झाला. निरुपद्रवी ग्रंथकारांच्याहि ग्रंथांची जप्ती झाली. ७२ कवितांची पुस्तकें आक्षेपार्ह ठरवलीं गेलीं. शिक्षक, प्रोफेसर्स वगैरेंवर क्षुल्लक कारणामुळें पदच्युत होण्याच्या पाळ्या आल्या. **ज्यू** लोकांवरील जुलमानें पुनः उचल खाल्ली. राशियांतील औषधीयुक्त झऱ्यांचें पाणी पिण्याकरितां किंवा तेथील हवा खाण्याकरितां येण्याची त्यांना बंदी करण्यांत आली. यालाच झारशाही म्हणतात. पण या झारशाहीला कंटाळून ज्यू लोकहि क्रांतिकारक बनले व ते इतर क्रांतिकारकाबरोबर काम करू लागले.

१८९६ मध्यें दोन महत्त्वाच्या गोष्टी घडल्या. एक झारचा राज्याभिषेक व दुसरी **सेंटपिटर्सबर्गचा** संप. राज्याभिषेकासंबंधी फक्त एकच गोष्ट नमूद करावयाची आहे. ती म्हणजे ज्या दिवशीं ४००० लोक चोडोनस्कीला पायाखालीं तुडवून ठार मारण्यांत आले, त्याच दिवशीं प्रजाहीतदक्ष झारसाहेब फ्रेंच वकिलायती मार्फत झालेल्या नाचाला हजर राहिले होते. **सेंटपिटर्सबर्गचा** संप ही राशियाच्या इतिहासांत अभूतपूर्व गोष्ट होती. ४२००० कामगार लोक आपला कामधंदा सोडून बाहेर आले. त्यांच्या मागण्या अत्यल्प होत्या. १४ तास काम १२ तासावर आणावें, राज्याभिषेकाचा कापलेला तीन दिवसाचा पगार द्यावा, एवढ्याच त्यांच्या मागण्या होत्या. झारनें त्यांना अनेक प्रकारें छळलें. तथापि संपाचें प्रकरण नवेंच असल्यामुळें सरकारनें संपवाल्यांना कामावर रुजू व्हा, म्हणजे तुमच्या गाऱ्हाऱ्यांचा विचार करूं असा अत्यंत उदार सल्ला दिला. कामगार कामावर रुजू झाले व

संप मोडला. यानंतर संपवाले अधिक संघटित झाले. एवढाच या संपापासून फायदा झाला. त्या मानानें पोलीसांचा जाचहि वाढला.

या संपानंतर लवकरच **सेंटपिटर्सबर्ग** मधील विद्यार्थ्यांवर सरकारची दृष्टी वळली. तेथील विद्यार्थ्यांनीं सरकारच्या धोरणाचा निषेध करण्याकरितां एक मोठी मिरवणूक काढण्याचें ठरविलें. ही बातमी पोलीसला लागली. हे विद्यार्थी चोडोनस्कीला पायाखालीं तुडविलेल्या ४००० लोकांच्या स्मशान भूमीकडे जात होते. त्यांना पोलीसांनीं मज्जाव केला व गडबड करणाऱ्यांना सैन्यांत सैनिक म्हणून पाठवून दिलें व ३६ जणांना तुरुंगांत टाकलें. बाकीच्या विद्यार्थ्यांनीं या कृत्याचा निषेध करण्याकरितां सभा भरवली असतां त्यांच्यापैकीं ४०३ विद्यार्थी पकडण्यांत येऊन



दुसरा निकोलस.

त्यांतील १०५ **सैबिरियांत** पाठविण्यांत आले. याच सालीं **झारनें** ठिकठिकाणीं सरकारी दारुचीं दुकानें काढून लोकांना दारूचें व्यसन लावलें.

१८९७ मध्यें झारनें जगांतील राष्ट्रांनीं आपलीं शस्त्रास्त्रे कमीं करावींत असा खलीता प्रसिद्ध केला. लोक या खलीत्यानें आश्चर्यचकीत झाले. पण या खलीत्याची शाई वाळते न वाळते तोंच झारनें **फिनलंडमध्यें** सैन्य वाढाविल्याचें जाहीर केलें. व स्वतःविषयीचा गैर समज दूर केला. **फिनलंडचें** हक्क अबाधित राखण्याचें वचन याच झारनें पुढें लवकरच मोडलें. त्याबद्दल सगळ्या जगानें झारला शिव्या दिल्या. हा प्रताप पुरा न वाटूनच कीं काय लागलाच **सेंटपिटर्सबर्ग**च्या विद्यार्थ्यांना नांऊटनें [चाबकानें] फटके मारण्यांत आले व या पराक्रमाबद्दल पोलीस अधिकाऱ्यांला

बढती मिळाली. या कृत्याचा निषेध करण्याकरतां १३००० विद्यार्थ्यांनीं संप पुकारला. या संपामुळें रशियांत खळबळ उडाली. या संपांतील विद्यार्थ्यांचे पोलिसांनीं अनन्वित छळ केले. ते एकदां एक व्याख्यान ऐकून परत येत होते. त्यांचा रस्ता नदीवरून होता. पुलापलीकडे पोलीसांची फौज उभी होती. दुसऱ्या पुलानें गांवांत येण्याचा त्यांनीं प्रयत्न करू नये म्हणून तेथेंहि पोलीस होतेच. विद्यार्थ्यांवर हल्ला करून त्यांना चांगला चोप दिला. शेवटीं झारनें संपाची चौकशी करण्याकरितां एक मंडळ नेमलें. पण तत्पूर्वीच पोलीसांनीं ज्या विद्यार्थ्यांना खरीखुरी माहिती होती त्यांना **सैबिरी**याची हवा खाण्याकरितां पाठवून दिलें! अखेरीस चौकशी संपली व मंडळाचें म्हणणें विद्यार्थ्यांच्या बाजूचें पडलें. पण झारनें तो रिपोर्ट दाबून ठेऊन जे विद्यार्थी असले संपासारखे गैरशिस्त वर्तन करतील, त्यांना शिस्त शिकविण्याकरितां सैन्यांत पाठविले जाईल असें जाहीर केलें! या हुकमानें पुढें बराच धुमाकूळ माजविला.

१९०० मध्यें विद्यार्थी व पोलीस याच्यांत पुनः युद्ध जुंपलें. किफमध्यें एक हजार विद्यार्थी त्यांच्यापैकीं दोघांनीं केलेल्या चोरीचा काय निकाल लावावा याकरतां जमले होते. सभेंत विद्यार्थ्यांनीं या चोरीचें खापर अधिकाऱ्यांवर फोडलें. जेथें अधिकारीच लांचलुचपतीचे प्रकार करतात तेथें विद्यार्थ्यांनीं चोऱ्या केल्या, तर नवल कसलें असें कांहींजण म्हणाले. त्याबरोबर ३७ जणांना निरनिराळ्या शिक्षा झाल्या. दुसऱ्या दिवशीं या शिक्षेच्या निषेधाकरितां सभा भरली. त्या सभेंत भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकीं ५०० जणांना कैद केलें. त्यांतील १८३ सैन्यांत टाकले गेले व बाकीच्यांना हाकून देण्यांत आले. पुढें या कृत्याच्या चहूंकडे निषेध झाला. **मास्कोच्या** विद्यार्थ्यांनीं ह्याकरितां मिरवणूक काढली असतां शिपायांनीं त्यांना गराडा घातला व बेदम मारलें. पुष्कळ विद्यार्थी मरण पावले. **सेंटपिटर्सबर्ग**ला तर भयंकर प्रकार झाला. तेथील अधिकाऱ्यानें ६ विद्यार्थ्यांना ठार केले व अनेकांना मरणोन्मुखस्थितींत सोडून दिलें. अशा प्रकारें या झारनें विद्यार्थी व कामगारवर्गांत स्वतःविषयीं अत्यंत अप्रीती उत्पन्न करून त्यांना पुढील चळवळींत भाग घेण्यास ओढलें. **सिपिआजिन** हा झारचा मुख्य मंत्री असतां एकंदर ६०००० लोक तुरुंगांत पडले, अनेक लोकांच्या घराच्या झडत्या झाल्या व शेवटीं त्याचा खून करण्यांत आला.

त्याच्या नंतर आलेले मंत्री **व्हॉनलेव्हे** हे सवाई अरेराव होते. त्यांची कारकीर्द अल्पच होती; पण या अल्प काळांत त्यांनीं मोठा पराक्रम गाजवला. हा निष्ठुर, दुष्ट, लाचखाऊ, व दुर्गुणाचा निव्वळ पुतळा होता. त्यांनीं रशियाची परिस्थिती सुधारण्यास सोटेशाहीचाच उपयोग केला. त्याचा व फडणीस जो डीविटे याचा लवकरच खटका उडाला. डीविटेनें रशियाचें दैन्य निवारण्याकरितां शेतकीमंडळें काढलीं. या मंडळांतील सभासद मोकळेपणानें आपल्या स्थितीबद्दल चर्चा करीत. रशियांत हा उपक्रम म्हणजे एक आश्चर्यकारकच गोष्ट होती. पण हा प्रकार व्हॉनलेव्हेना

आवडला नाहीं. त्यांनीं हीं मंडळें नष्ट केलींच; पण त्यांत भाग घेणाऱ्या लोकांनाहि अमानुष शिक्षा केल्या.

लेव्हेचा दुसरा पराक्रम अत्यंत नीचपणाचा होता. त्यांनीं आपल्या ताब्यांतील गुप्त पोलीस कामगारवर्गांत पसरवून त्या पोलीसांकडून कामगारांना आपले संघ स्थापण्यास लावले. या पोलीसाविषयीं कामकऱ्यांना संशय येऊं नये, म्हणून ते पोलीस गिरण्यांत काम करीत व मालकाकडे जाऊन गाऱ्हाण्याची दाद मागीत. पुढें **व्हॉनलेव्हेनें** हे संघ चांगलें नांवारूपास आल्यावर आपले पोलीस त्यांतून काढून घेतले व जे प्रमुख कामगार होतें त्यांना कैद करून जबर शिक्षा दिल्या. याखेरीज त्यांनें इतर पराक्रम बरेंच गाजविलें. त्यांनीं ज्यू लोकांना गुराप्रमाणें ठार मारविलें, **पोलंड**, **जॉर्जीया**, **फिनलंड**, आर्मिनिया वगैरे प्रांतांवर जुलमाचा कहर केला. हे राजश्री आपल्या दुष्कृत्यांचा डांगोरा इतर देशांत पिटला जाऊं नये, म्हणून त्या परदेशांतील प्रमुख प्रमुख वृत्तपत्रांना जबर लाच देत. या वेळीं राशिया अत्यंत संतप्त झाला आणि या प्रधानांचा त्यांनें २८ जुलै १९०४ रोजीं बॉंबनें खून केला. याचा खून करणाऱ्यांना फाशीचीं शिक्षा न होतां साधी हद्दपारीची शिक्षा झाली ही गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे. कारण **व्हॉनलेव्हेचा** खून होणें सर्वांनाच जरूर वाटत होतें, हेंच होय.

यानंतर प्रिन्स **मिर्स्की** याला प्रधानपद देण्यांत आलें. हा प्रधान फारच चांगला होता. त्यानें वृत्तपत्रांना स्वातंत्र्य दिलें. त्यानें पूर्वींच्या **झेमस्टो** मंडळांना आपल्या परिस्थितीची चर्चा करण्यास परवानगी दिली. पण ही प्रजाहितदक्षता झारला आवडली नाहीं. आपल्या हातांतील सत्ता सोडणें, म्हणजे ईश्वराचा अपमान करणें होय असें खुषमस्कऱ्यांनीं त्याच्या डोक्यांत भरवलें. अर्थातच मिर्स्कीला राजीनामा देणें भाग पडले. यानंतर राशियाचें सारें वातवरण विद्युन्मय झालें. लोक बंड करण्यास अगदीं तयार होते. फक्त ठिणगी पडण्याचाच काय तो अवकाश होता. या उद्वेगाचा स्फोट फारच लवकर झालेला दिसून आला. त्यावेळीं **गेपॉन** नांवाचा एक कामगार वर्गाकरितां तळमळणारा सत्पुरुष होता. या पुरुषाला कामगार वर्ग अत्यंत संतप्त झाला आहे व बंड करण्याची तयारी करीत आहे असें दिसून आलें. बंडावर हें प्रकरण जाऊं नये, म्हणून त्याचा प्राण तळमळू लागला. त्यानें राजाकडून प्रजेकरितां शांततेच्या मार्गानें हक्क मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यानें २२ जानेवारी १९०५ रोजीं राशियांतील सर्व कामगारांना एकत्र करून झारकडे जाण्याचें व लोकांना काय पाहिजे आहे, हें सांगण्याचें ठरविलें. आपल्या अनुयायांना त्यांनें बरोबर हत्यारें आणू नका अशी सक्त ताकीद दिली होती. झारनें या कामगारांना राजवाड्याबाहेर येऊन भेटावें व त्यांचें म्हणणें ऐकावें एवढीच विनंति केली होती. पण झार आपल्या राजवाड्यासमोर प्रेमानें येणाऱ्या लोकांना न भेटतां मध्यरात्रींच कुठें तरी चोरासारखा पळून गेला. जाण्यापूर्वीं त्यांनें आपल्या अधिकाऱ्यांना या जमावावर बंदुका सोडण्याची परवानगी दिली होती. त्या अधिकाऱ्यांनीं तेथें जमलेल्या २००० स्त्री-पुरुष व मुलें यांचे मुडदे

पाडले व तो चौक सारा प्रेतांच्या राशींनीं भरून काढला. झारशाहीनें आपण निशस्त्र प्रजेपेक्षां कितीतरी पटीनें अधिक आहोंत हें दाखवून दिले. यापुढें लोकांनीं मनांत एका गोष्टीचा निश्चय केला. ती गोष्ट म्हणजे बंड करूनच झारकडून राजकीय हक्क संपादन करून घेणें ही होय.

याच सुमाराला **रूसो-जपानी** युद्धाचा वणवा पेटल्यामुळें आपण त्या युद्धाकडे वळूं. १९०० सालीं **चीनमध्यें बॉक्सर बंड** झालें. त्यावेळीं रशियानें **चीनच्या** संकटाचा फायदा घेऊन **मंचुरिया** उपटला व आपला गव्हर्नर **मुकडेनला** बसवला. **जपानला** रशियाच्या या कृत्याची भीति वाटली. इकडे रशियाला वाटलें **जपान कोरियांत** प्रवेश करून आपला त्या मार्गानें छळ करील. या भीतीमुळें त्यानीं **चीनला** विरोध केला व तडजोडीचेंहि प्रयत्न केले; पण ते प्रयत्न फुकट गेले. मध्यंतरीं बऱ्याच भानगडी होऊन अखेरीस रशियानें **चीनबरोबर मांचुरीया** सोडण्यासंबंधीं आपण कांहीं तरी वाटाघाटी करतों असा बहाणा केला. **चीन** हा **जपानचा** सूड उगाविण्याचा मनापासून बेत करीत असल्यामुळें त्याला रशियाबद्दल द्वेष वाटत नव्हता. पण असल्या मुत्सद्देगिरीला भीक घालण्याइतका **जपान** खुळा नव्हता. १९०४ मध्यें **जपाननें मँचुरियांतून** आपलें सैन्य उठविण्याबद्दल रशियाला निर्वाणीचा खलिता पाठविला. रशियानें या खलित्याला उत्तरच दिलें नाहीं. **जपानचा** वकील रशियांतून निघाला तरी **झारसाहेबांना जपान** युद्ध करील, असें वाटलें नाहीं. अर्थातच ते गाफील राहिले. शिवाय **आशियांतील** हें चिमुकलें राष्ट्र आपल्यासारख्या गोऱ्या व बलाढ्य राष्ट्राविरुद्ध शस्त्र काय उचलणार असें रशियाला वाटलें. १९०४ च्या फेब्रुआरींत **जपाननें** रशियाच्या **पोर्टऑर्थर** मधील आरमारावर हल्ला केला. त्यांपैकीं बरींच जहाजें त्यांनीं बुडवलीं, कांहीं छिन्नविच्छिन्न केलीं व बाकीचीं कोंडून ठेवलीं. थोडक्या अवधींत **जपानला** पौर्वात्य समुद्रावर आपलें पूर्णपणें वर्चस्व स्थापतां आलें. रशियाचा जमिनीवरहि असाच पराभव झाला. त्याच वर्षीं ऑक्टोबरांत **लिओयांग** येथें मोठें युद्ध होऊन रशियाचा सेनापती **क्युरोपाटकिन** याचा पूर्ण बीमोड झाला. **पोर्टऑर्थरचा** वेढा उठण्याची सारी आशा नष्ट झाल्यामुळें वेढ्यांत सांपडलेले ४५००० लोक **जपानला** १९०५ च्या जानेवारीला शरण आले. पुढें हीं युद्धें अधिक जोरांत आलीं. **नोगीजवळ** ३,२०,००० सैन्य होतें व **क्युरोपॅटकिनजवळ** ३, ८०,००० सैन्य होतें. पण हें सैन्य अत्यंत अव्यवस्थित व निरुपयोगी होतें. **ओयामानें मुकडेनवर** हल्ला चढवून पुनः रशियाचा पुरा मोड केला. रशियानें आपला सेनापती बदलला. त्यांना **बाल्टिक** समुद्रांतील आरमाराची फक्त आशा उरली होती. पण या **केपऑफ गुडहोपच्या** लांब मार्गानें आलेल्या आरमाराचा **टोगोनें** १९०५ च्या मे महिन्यांत विध्वंस करून टाकला.

रशियाला आतां कोणतीच आशा उरली नव्हती. तेव्हां त्यानें **अमेरिकेचे** प्रेसिडेंट **रूझवेल्ट** यांना मध्यें घालून उभयतांत तह घडवून आणला. हा तह ५ सप्टेंबर १९०५ रोजीं झाला. या तहामुळें रशियाच्या ताब्यांतून **पोर्टऑर्थर**,

डालनी, निम्मी **साखालीन बेटें** गेलीं; व **मँचुरीया चीनला** परत यावा लागला. रशियाचा हा पराभव झालेला ऐकून **जपानला** जितका आनंद झाला त्याच्या शतपट आनंद रशियांतील लोकांना झाला. युद्धाच्या सुरवातीस प्रागतिक विचाराच्या मंडळींनीं **झारला**, लोकांचा विश्वास संपादन करण्याचा सल्ला दिला; पण तो त्यानें ऐकला नाहीं. त्याच्या सैन्यांत लाचलुचपत वगैरे चालूंच असल्यामुळें सैन्य अगदीं कुचकामाचें असलें व त्याचा पराभव झाला तर नवल नाहीं. **पोर्ट-ऑर्थरचा** पराभव व राजवाड्यासमोरील ३००० निरपराधी लोकांची कत्तल ह्या दोन गोष्टी एकाच वेळीं घडून आल्या. त्यामुळें क्रांतिकारकांच्या चळवळींना जोर चढला. **झारलाहि** ३००० लोकांची आपण निष्कारण कत्तल करवली असें वाटलें व त्या लोकांच्या नातलगाकरितां जी वर्गणी उभारण्यांत आली, त्यांत **झारनें** पहिला आंकडा टाकला. **कौंट विटे** हा अनियंत्रित सत्तेचा पक्का पुरस्कर्ता असतांहि त्याला सुद्धां लोकांना कांहीं हक्क दिले पाहिजेत असें वाटूं लागलें. **रूसो-जपानी** युद्ध सुरु असतांच १९०५ मध्यें बंड झालें. ह्या बंडाची " **नरोदनया व्होल्या** या पक्षानें उभारणी केली. त्यांना इतर पक्ष येऊन मिळाले. या बंडांत सैनिकांनीहि थोडा-फार भाग घेतला. **पोट्योमकिन** नांवाच्या लढाऊ जहाजावरहि बंड होऊन बंड-वाल्यांनीं आपले सारे अधिकारी मारून टाकले, **ओडेसावर** तोफा सोडल्या व नंतर **रुमानियाच्या** एका बंदरावर प्रयाण केलें. रेल्वे, पोस्ट, तारखातें येथेंहि विस्तृत प्रमाणावर संप झाले. ही स्थिति अवलोकन करून **विटेनें झारला** एका खलित्यावर सही करावयास लावलें. हा खलिता रशियाच्या सनदशीर राज्यपद्धतीचा कांहीं जणानीं पाया मानला. या खलित्यान्वयें रशियाला **डयूमा** सभेची प्राप्ति झाली. पण या सभेला पुरेसे हक्क नसल्यामुळें कोणाचेंच समाधान झालें नाहीं.

ठिकठिकाणीं **सोविएट्स** (कामगारमंडळें) स्थापन होऊं लागलीं. सरका-रला या मंडळांचा राग येऊन त्यानें त्यांच्यावर सैन्य धाडलें. त्यामुळें पुनः बंड उद्भ-वलें. १९०५ च्या नोव्हेंबर डिसेंबरांत सरकारी दारुगोळ्याची कोठारें लुटण्यांत आलीं, व रस्तोरस्तीं हाणामारी झाली. रेल्वेचा संप चालूच होता. **झारनें** प्रत्येक स्टेशनवर शिपाई पाठविले व त्यांच्याकडून संपवाल्यांना ठार मारविलें. **विटेला** हा दंगा बळजबरीनें थांबवावा असें वाटे; पण त्यानें जमले तर शांततेनेंच या प्रश्नाचा निकाल लावावा असें ठरविलें. त्यानें **डयुमा** सभेसंबंधींचे हक्क थोडेसे सैल सोडले. १७ एप्रिल १९०६ रोजीं **डयूमा** सभा भरली. या सभेंत लोकपक्षाचेंच बहुमत होतें. त्यानें प्रथम दोन मागण्या मागितल्या. पहिली मागणी राजकीय कैद्यांची मुक्तता व दुसरी शेतकऱ्यांना सवलतीनें जमिनी देणें ही होती. या मागण्या **झारनें** फेटा-ळून लावल्या. **डयुमा** सभेंत शेतकऱ्यांच्या हितासंबंधीं वादविवाद चालू असतां, शेतकऱ्यांना स्फुरण चढले व ते जमिनदारांच्या मालकी हक्कावर गदा घालूं लागले, त्यामुळें अस्वस्थतेनें पुनः उचल खाल्ली.

यावेळीं **स्टॉलिपिन** हा नवा मंत्री नेमला गेला. त्यानें **झारला ड्यूमा** सभा मोडण्याचा सल्ला दिला व **झारनें** ९ जुलै १९०६ रोजीं **ड्यूमा** सभेचें विसर्जन केले. **ड्यूमा** सभेचे सभासद तेथून निघून एकदम **फिनलंडला** गेले व लोकांना करबंदीचा उपदेश करूं लागले. साऱ्या रशियांत यावेळीं भयंकर खळबळ उडाली. बँका, पोस्ट वगैरे लुटण्यांत आलीं व पुष्कळ जुलमी जमीनदारांचे खून झाले. **स्टॉलिपिन** हा रुधिरप्रिय अधिकारी असल्यामुळें त्यानें रक्तपात करून चळवळ मोडण्याचा निश्चय केला. त्यानें प्रथम **ड्यूमाच्या** २५० सभासदांना कैद केले व त्यांना प्रत्येकीं ३ महिन्यांच्या शिक्षा सुनावल्या. त्यानें प्रत्येक जिल्ह्यांत अपराध्यांना फांसावर लटकावण्याकरितां फांशीची तजवीज केली आणि पुढील ५ वर्षांत १५००० लोकांना फांशीं दिले. ह्या फासांना " **स्टॉलिपिन नेकटाय** " म्हणत असत.

यावेळीं त्यानें शेतकऱ्यांवर शस्त्र उपसलें नाहीं. त्यानें त्यांच्याकारितां बँका काढल्या व या बँकांतून जमीनदारांचें देणें देऊन टाकण्याकरितां त्यानें पैसे देवविण्याची व्यवस्था करवली. कांहीं शेतकऱ्यांना लागवडी करण्याकरितां **सैबेरियांत** जमिनी दिल्या. त्यांना भाड्याचे पैसे व शेतीकरितां भांडवलहि दिलें. कांहीं शेतकरी त्यामुळें शांत झाले; पण सारा समाज **स्टॉलिपिनवर** नाखूष होताच. असल्या अरेरावाचा खून करणें रशियांतील क्रांतिकारकांना अशक्य नसल्यामुळें त्यांनीं त्याचा १९११ च्या ऑगस्टमध्यें खून केला. या खुनाची हकीगत मोठी गमतीची असल्यामुळें खालीं देत आहे.

बॅगरॉफ नांवाच्या एका **ज्यूनें स्टॉलिपिनच्या** दुष्कृत्याचा सूड उगविण्याकरितां त्याला ठार मारण्याचें ठरविलें. तो श्रीमंत, हुशार व सुशिक्षित होता. तीन वर्षेपर्यंत योग्य संधिची वाट पहात तो राहिला. त्यानें प्रथम गुप्तमंडळांत प्रवेश करून घेतला व त्या सभासदांचा पूर्ण विश्वास संपादन केला. नंतर तो गुप्त पोलिसखात्यांत शिरला व त्यानें सरकारला अचुक माहिती देऊन सरकारचा विश्वास संपादन केला. त्यानें गुप्तमंडळांत जे घातकी लोक होते अशा ४०० लोकांचीं नांवें पोलिसला कळवून त्यांना शिक्षा देवविल्या. या प्रकारामुळें **बॅगरॉफ** हा पोलिसांचा आधारस्तंभ झाला. त्याची भराभर बढती होत गेली आणि अखेरीस **स्टॉलिपिनच्या** जीवाला अपाय होऊं नये म्हणून खुद्द त्याचाच खास गुप्त पोलीस बनला. आतां त्याला आपलें उद्दिष्ट सिद्धीस नेतां येईल अशी खात्री झाली. त्यानें **निना** नांवाची–एक काल्पनिक-स्त्री आहे व ती स्त्री फार भयंकर असून **झारचा** खून करण्याकरितां टपली आहे, असें पोलिसला सांगितलें. तेव्हां त्या स्त्रीविरुद्ध पुरावे मिळविणें व तिला पकडणें अशीं कामें आपल्याला करावयाचीं आहेत असेंहि त्यानें सांगून टाकलें. १९११ च्या ऑगस्टमध्यें **स्टॉलिपिन झारबरोबर किव्हला** गेला होता.

३१ तारखेच्या सायंकाळीं तो व **झार** असे दोघेजण नाटकगृहांत खेळ वगैरे पहाण्यास गेले होते. **बॅगरॉफनें स्टॉलिपिनला** सांगितलें कीं, ती स्त्री आज रात्रीं येऊन **झारचा** खून करणार आहे. **स्टॉलिपननें** लागलेच त्या नाटकगृहांत

पुष्कळ गुप्त व हत्यारबंद पोलीस आणून ठेवले. तो साऱ्या नाटकगृहांत **निनाच्या** शोधाचा फार्स करीत हिंडत होता. इतक्यांत मध्यंतरांची विश्रांतिची वेळ आली असतां **बॅगरॉफ स्टॉलिपिनपासून** चार हातावर उभा राहिला व त्यानें रिव्हॉलवर झाडलें. पहिली गोळी चुकली. ती एका गवयाला लागली. दुसरी गोळी **स्टॉलिपिनच्या** हाताला लागली व तिसरी मानेला लागली. जखमा भयंकर होत्या. **स्टॉलिपिन** सहा दिवसानंतर मरण पावला. त्याच्या मरणाविषयीं पूर्ण निःशंक असावें म्हणून **बॅगरॉफनें** विषारी गोळ्या रिव्हॉलवरमध्यें घातल्या होत्या. तो तेथून पळून गेला नाहीं. त्यानें मृत्युपूर्वी आपल्या सर्व योजनांची इत्थंभूत हकीगत सांगितली. **स्टॉलिपिनला** मुकाट्यानें न मारतां अशा चमत्कारिक प्रकारानें मारावें असा त्याचा पहिल्यापासून बेत होता. म्हणून तो त्या संधीची इतके दिवस वाट पहात होता. फासावर चढलेला **बॅगरॉफ** मानेभोवतालची दोरी आवळेपर्यंत हंसत होता.

अशा प्रकारचे क्रांतिकारकांचे हजारों प्रकार होत होते. त्यापुढील तीन वर्षें अशाच गडबडींत व रक्तपातांत गेले. १९१४ सालीं जेव्हां महायुद्ध सुरू झालें तेव्हां रशियांत मोठी थोरली राज्यक्रांति होणार असें दिसूं लागलें होतें. पण **झारच्या** सुदैवानें महायुद्धाला सुरवात झाल्यामुळें **झारवरील** संकट पुढें ढकललें गेलें. महायुद्धाबद्दल लोकांना प्रेम वाटत नव्हतें. पण **झारनें** युद्धाला लोकांचें सहाय्य मिळावें म्हणून त्यांना आवडतील अशा दोन गोष्टी केल्या. एक म्हणजे दारूची सक्तीनें होणारी विक्री त्यानें अजिबात थांबवली व दुसरी **पोलंडला** स्वातंत्र्याचें वचन दिलें. दारूपासून रशियाला १५० कोटी रुपये सालीना मिळत असत. यावरून **झार** केवढें पुण्य संपादन करीत होता, याची कल्पना येईल.

महायुद्धाला सुरवात झाली. तेव्हां रशियाच्या मुत्सद्यांचा, तिजोरीचा, पोकळपणा बाहेर आला व दिसतें तें खरें नसतें हें कळून चुकलें. महायुद्धाला कां व कशी सुरवात झाली याची हकीगत बहुतेकांना ठाऊक आहेच. १९१४ च्या जूनमध्यें **हर्जगोविना** येथें **ऑस्ट्रियाचा** राजपुत्र **फ्रान्सिस फर्डिनांड** याचा खून **सर्व्हियाच्या** एका माणसानें केला. त्याबरोबर **ऑस्ट्रियनों सर्वियाबरोबर** युद्ध पुकारलें. **जर्मनी ऑस्ट्रियाच्या बाजूनें** युद्धांत पडला. **सर्वियाच्या बाजूनें फ्रान्स इंग्लंड** वगैरे राष्ट्रांनीं युद्ध पुकारलें. **झारची** इच्छा **कैसरनें ऑस्ट्रियाचें** मन वळवून युद्ध टाळावें अशी होती. त्यानें **कैसरला** टेलिफोननें ही इच्छा कळवली. पण **कैसरचाहि** प्रयत्नाअंतीं इलाज न चालल्यामुळें युद्धाला सुरुवात झाली. रशिया दोस्तांच्या बाजूनें युद्धांत सामील झाला. त्यावेळीं रशियन सैन्याचा सेनापती ज. **लोकोमस्की** हा होता व तो फार लायक अधिकारी होता. रशियानें कांहीं काळ **ऑस्ट्रियाला व जर्मनीला** चिमटे घेतले. पुढें सेनापतींतहि बदल होत गेला व रशियाला थोडीफार यशाची प्राप्ति झाली तरी त्याच्या सैन्याचें पुढें वाभाडेच निघाले व एकंदर यशापेक्षां त्याची पिछेहाटच अधिक झाली असें म्हणावयाला हरकत नाहीं. त्याच्या सैन्याची पिछेहाट होण्यास मुख्यतः दोन कारणें झालीं. एक

झारचा कमकुवतपणा व दुसरें **रासपुटीनचें** राजकारणांत प्राबल्य. हीं कारणें बाह्यतः दोन दिसलीं तरी वस्तुतः खरें कारण एकच. तें म्हणजे **झारचा** कमकुवतपणा. हा **झार** खरोखर गादीवर यावयास लायक नव्हता. पहिल्यापासून त्याला शिक्षण मिळालें नव्हतें व राज्य करणें म्हणजे काय हेंहि त्याला कळत नसे. तो उठल्याबसल्या कपाळावर हात मारून घेई व मी दुर्दैवी मला दैव अनुकूल नाहीं असे निराशेचे उद्गार काढी. हा त्याचा कमकुवतपणाच त्याच्या नाशाला कारण झाला. या त्याच्या दुबळे पणाचा फायदा **रासपुटीन** नांवाच्या एका भोंदूनें घेऊन त्याला पुरता घेरून टाकला. या **रासपुटीननें झारच्या** राज्यांत बराच धुमाकूळ माजविला असल्यामुळें आपण त्याचा थोडक्यांत समाचार घेऊं.

१९०६ च्या जानेवारींत रशियाचा **रुसो-जपानी** युद्धांत पुरा धींमोड झाला होता व युद्धांत गुंतलेलें सैन्य परत येऊं लागलें होतें. **झार व झारीना** हीं दोघेंहि युद्धानंतर होणाऱ्या दंग्यामुळें अस्वस्थ झालीं होतीं. त्याचवेळीं ९ जानेवारी १९०६ हा दिवस राजघराण्याला घातुक होणार असें कोणीं भविष्य वर्तविलें. ह्या भविष्यामुळें राणी अस्वस्थ झाली. तिला कोणी तरी आपला खून करावयास येत आहे, अशी दिवसाउजेडीं स्वप्नें पडूं लागलीं. तिची मानसिक स्थिति बिघडली. एकदां ती आपल्या **ॲलेक्सला** पाजीत असतां कोणी तरी बातमी आणली कीं, लोकांचा मोठा जमाव बंड पुकारून **झारला** मारावयास येत आहे. ती तात्काळ आपल्या पोराला टाकून राजवाड्यांत सैरावैरा पळूं लागली व वेड्यासारखी रडूं लागली. दिवसानुदिवस अंगावर मोठा थोरला कोट घालून व डोक्यावर टोपी घालून ती इकडेतिकडे पहात बसे. कपडे काढ म्हणून सांगितलें असतां कपडेहि काढीत नसे. कोणी मारायला आलें तर पळण्याची तयारी असावी म्हणून ती कपडे घालून सज्ज होती. तिच्या उपचाराकरितां **मास्कोहून** दोन प्रसिद्ध मानसरोगचिकित्सक आणविण्यांत आले. त्यांनीं **झारीनाला** दूर पाठवून द्यावें व वैद्यांच्या देखरेखीखालीं ठेवावें असा सल्ला दिला. पण त्यांचा सल्ला झिटकारून लावण्यांत आला व वैद्यांच्या ऐवजीं **रासपुतीनची** त्या जागीं नेमणूक झाली. **रासपुतीन** हा एक सामान्य शेतकरी होता. त्याचें पूर्ववृत्त अत्यंत नीचपणाचें होतें. **रासपुतीनची** एकंदर हकीगत मोठी अद्‌भुत आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हा एक अत्यंत बदमाष, चारित्र्यहीन असा मांत्रिक होता. याच्या सुदैवानें राणीला सहा महिन्याच्या आंत गुण आला. त्यामुळें **रासपुतीनचें** प्रस्थ राजवाड्यांत अतोनात वाढलें. **झारीना** त्याच्याशिवाय पाऊल टाकीनाशी झाली व त्याचा शब्द खालीं पडूं देईनाशी झाली. **झारवरहि** त्यानें आपल्या मोहिनी विद्येनें छाप पाडली आणि थोडक्याच अवकाशांत त्याच्या वाटेंत आलेल्या व येणाऱ्या सर्व लोकांना त्यानें दूर केलें. **रासपुतीन** पहिल्या प्रतीचा व्यभिचारी असल्यामुळें राजवाड्यांत पोळासारखा मोकळा सुटला होता. त्या साधुपुरुषाविरुद्ध ब्र काढणेंहि कोणाला शक्य नव्हतें. **झार राणीचा व रासपुतीनचा** वाईट संबंध होता असें म्हणतात; पण तें

खोटें आहे. तिचें वर्तन अत्यंत शुद्ध होतें. राणीला सतत आपल्या मुलाची काळजी वाटे. त्याच्या तोंडावाटें नेहमीं रक्त पडे, डॉक्टरांचे अनेक प्रयत्न झाले; पण त्याचें रक्त थांबेना. जें रक्त थांबविणें डॉक्टरांना अशक्य असे तें रासपुतीन



रासपुतीन मध्यभागीं बसला आहे.

नुसत्या हस्तस्पर्शानें थांबवूं शके. तेव्हां झारीनाला तो प्रत्यक्ष ईश्वराचा अवता वाटला तर आश्चर्य कसलें ? रासपुतीन हा राजघराण्याचासंरक्षक आहे, अ झारीना उघड उघड म्हणत असे, आणि रासपुतीनहि जोंपर्यंत मी आहें तोंपर्यं तुम्हाला कोणतीहि भीति नाहीं; पण माझ्या मृत्यूनंतर तुमचेंहि घराणें नष्ट होई असें सांगे. हां त्याची भविष्यवाणी पुढें लवकरच खरी ठरली.


रासपुतीनला झार व **झारीना** इतका मान देतात असें पाहून **झारचे** सरदारहि त्याला भिऊन वागत व मोठा मान देत. **रासपुतीनच्या** नादीं लागून त्यांना



झारीना.

आपलीं छोटींमोठीं कामेंहि करून घेतां येत. **रासपुतीन** राणीच्या कानीं लागून कोणाला


नोकरी दे तर कोणाला नोकरीवरून काढ असे प्रकार करी. **झारचे** प्रधान रोजच्यारोज बदलूं लागले. त्याचा परिणाम अखेरीस रशियाच्या घातांत झाला. **रासपुतीनच्या** खुनापर्यंत जें युद्ध झालें त्याचीं सारीं सूत्रें **रासपुतीन**कडून हलवलीं जात होतीं.



झार व मंत्री. डीमिट्री-रासपुतीनच्या वधांत भाग घेणारा-झारच्या डाव्या हाताला आहे.

त्याकाळीं **झारचें** राज्य नसून **रासपुतीनचें** राज्य होतें असें मोठमोठे रशियन अधिकारी म्हणत. **रासपुतीनच्या** या माजलेल्या प्रस्थामुळें सैन्यांतील व्यवस्थेंत सारा गोंधळ माजून राहिला होता. आघाडीवर गेलेल्या सैन्याला तोफाबंदुकांचा मारा करावयास दारूगोळाहि नव्हता. एकदां तर दारूगोळ्याच्या अभावीं रशियन सैन्य **जर्मनीवर** दगडच फेंकूं लागलें. त्यावेळीं **जर्मनीनें** हजारो रशियनांचे मुडदे पाडले.

रासपुतीन हा **जर्मनीचा** हेर होता असें कोणी म्हणतात. पण या म्हण-
ण्याला फारसा आधार सांपडत नाहीं. त्याचा चरित्रलेखक **रॉड्झांझे अॅन्को** हा
रासपुतीनला मुत्सद्दीगिरी कळण्याची अक्कलच नव्हती असें लिहितो. तेव्हां तशा-
प्रकारचा समज करून घेण्याचें कारण नाहीं. **रासपुतीनचें** राजकारणांत माजलेलें
प्रस्थ पाहून खुद्द **ड्यूमा** सभेंतहि त्याच्याविषयीं चर्चा झाली. पण त्या चर्चेचा



ड्यूमा सभा.

काहीं उपयोग झाला नाहीं. अखेरीस सरदारानींच गुप्त कट करून **रासपुतीनला**
उडविण्याचा बेत केला. तत्पूर्वी **सैबिरियांतील** एका स्टेशनवर एका स्त्रीनें रिव्हॉल-
व्हर झाडून त्याच्या खुनाचा प्रयत्न केला होता. **रासपुतीनच्या** पोटाला गोळी
लागली होती, पण पंधरा दिवसानंतर तो खडखडीत बरा झाला. **रासपुतीनचा** जो
शेवटीं खून झाला तो खून करण्यांत राजघराण्यांतील माणसेंच होतीं. **रासपुतीनला**
एक मोठी थोरली मेजवानी देण्याकरितां संध्याकाळचे वेळीं निमंत्रण दिलें. निमंत्रण
देणाऱ्यांत **प्रिन्स युसुपॉफ, कौंट इल्स्टन** व **ग्रँड ड्यूक डिमिट्री** वगैरे मंडळी
होती. मेजवानीचे वेळीं **रासपुतीन** नेहमींच्या उर्मटपणापेक्षां अधिक उर्मटपणें
वागला. तेव्हां त्याच्या मानेंत व पाठींत असे दोन ठिकाणीं रिव्हॉल्व्हरचे बार सोड-
ण्यांत येऊन त्याला ठार केलें व त्याचें प्रेत नदींत फेकून दिलें. ही बातमी ऐकतांच
राणीच्या शोकाला पारावार उरला नाहीं. अखेरीस **डिमिट्रीला** पकडण्यांत येऊन
त्याची चौकशी वगैरे झाली. अशा प्रकारें एका अत्यंत पाजी मनुष्याचा काटा रशि-
यानें आपल्या वाटेंतून काढून टाकला.

रासपुतीनच्या मृत्यूपूर्वी रशियाच्या सैन्यांत किती गोंधळ माजला होता
याचा उल्लेख वर आलाच आहे. सैन्यांतील शिपाई उघडउघड आपल्या अधिकाऱ्यांचा

हुकूम मोडीत असत. रशियांत दंगा झाला तर तो मोडण्याऐवजीं रशियन शिपाई बंडखोरांनाच मदत करीत. इकडे **ड्यूमाची** स्थितीहि तितकीच प्रतिकूळ होती. **ड्यूमा** सभा स्थापन झाल्यापासून **झारचा** सरदारवर्ग तिला दिलेले हक्क परत घेण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होता. पुढें पुढें तर **ड्यूमा** सभेचे क्रांतिकारक लोकच सभासद बनले व **झारला** कोणत्याहि प्रकारचा कारभार करूं देईनासे झाले. साऱ्या रशियांत बंडाचें व क्रांतीचें वारे वाहूं लागले. **झार** राजाला तुझा अंतकाळ जवळ आला अशा उघडउघड सूचना त्याचे सरदार व नातलग देऊं लागले. **झारच्या** बाजूला आतां



प्रिन्स लिव्हॉफ.

कोणीच उरलें नाहीं. **झारचीं** इतक्या वर्षांचीं पापें त्याचा नायनाट करावयास टपलीं होतीं असें जणूं काय वाटूं लागलें. **ड्यूमा** सभेला दिलेले अधिकार परत घेणें, **रासपुतीनसारख्या** नीच मनुष्यांच्या सहाय्यानें रशियन राज्यकारभारांत बेबंदशाही माजविणें, शिपायांना रणक्षेत्रावर सामुग्रीच्या अभावीं बळी देणें इत्यादि गोष्टी इतक्या असह्य होऊं लागल्या कीं, **झारचा** बळी दिल्याशिवाय रशिया स्तब्धच बसणार नाहीं, असें दिसूं लागलें. त्यावेळीं **पेट्रोग्राड** व इतर शहरीं गुप्तमंडळें बरीच अस्तित्वांत होतीं. त्यांच्या अनेक वर्षांच्या चळवळीला आतां यश येणार असें निश्चयपूर्वक वाटूं लागलें. **झारनें** यावेळीं बंडखोरांना चिरडून टाकण्याकरितां जादा पोलीस नेमले व त्यांना वाटेल ती सत्ता दिली. रशियांतील मोठमोठ्या इमारतींवर मशीनगन्स ठेवण्यांत आल्या व बंडखोरांना ह्या मशिनगन्सचें भय दाखविलें गेलें. राजाच्या विश्वासांतील पलटणीनें सुद्धां त्याला दगा दिला. साऱ्या पलटणी बंडखोर बनल्या. **झारला,** लोकांच्या हातीं सत्ता दे असा उपदेश **ड्यूमाच्या** अध्यक्षानें केला. पण तो व्यर्थ गेला. २७ फेब्रुआरी १९१७ रोजीं **झारनें** आपण राज्यकारभारांत बिलकुल बदल करूं इच्छित नाहीं, असें अध्यक्षाला कळविलें. पण त्याच दिवशीं **झारची** पर्वा न करितां **ड्यूमा** सभेनें एक तात्पुरतें मंडळ नेमून त्याच्या हातीं राज्याचीं सूत्रें दिलीं. पण एवढ्यानें बंडखोरांची तृप्ती झाली नाहीं. त्यांना अधिकार संक्रमणाचें महत्त्व वाटलें नाहीं. त्यांना **झारचा** व **झारशाहीचा** संपूर्ण निःपात व्हावयास पाहिजे

होता. इतकी वेळ आली तरी **झार** सावध झाला नाहीं. अखेरीस १ मार्च रोजीं आपली अनियंत्रित सत्ता संपली असें पाहून **झार** म्हणाला, मी आतां लोकांच्या हातीं कारभार देत आहे. पण तत्पूर्वीच प्रोव्हिजनल कमिटीनें कारभार हातीं घेऊन **प्रिन्स लिव्हॉफला** अध्यक्षहि नेमून टाकला होता.


मार्चच्या आठ तारखेला लोकांच्या उद्रेकाला तोंड फुटलें. युद्धामुळें महागाईनें रशियांत कहर करून सोडला होता. भटाऱ्याचे, वाण्याचे, खाटकाचे दुकानीं लोकांच्या रांगाच्या रांगा आपल्या पाळीची वाट पहात उभ्या असत. एकदां तर रात्रीपर्यंत वाट पाहून लोकांना रसद मिळाली नाहीं. रसद मूळांतच संपली होती. लोकांचें या सबबीनें समाधान झालें नाहीं. पोटाच्या आगीला या सबबीचें काय होय ? लोकांनीं " भाकरी द्या " असें सांगण्याकरितां ठिकठिकाणीं **पेट्रोग्राडमध्यें** सभा भरवल्या; लोकांचा जमाव अखेरीस एका विस्तीर्ण चौकांत गोळा झाला. त्यांत विद्यार्थी सामील झाले. **झारच्या** निषेधपर व्याख्यानें झालीं. **झारचें** लाडके कॉसॅ_ कहि जमावाला हाकून न देतां, त्यांच्यांत येऊन मिळाले. त्या दिवशीं **झारनें** आपण राजसंन्यास केला ही गोष्ट विसरून आपला अधिकारी **प्रोटोपोपॉफकडून** घरावर ठेवलेल्या मशिनगन्स सोडल्या. दुसऱ्या दिवशीं सर्व व्यवहार बंद झाला. सरकारनीं हजारो लोक कैद केले व साऱ्या **पेट्रोग्राडभर** फौजफाटा उभा केला. त्या दिवशीं **झारनें** शब्दशः रक्ताच्या नद्या वाहवल्या व मांसाचा चिखल केला; पण त्या बेफाम झालेल्या समुदायाला भानच उरलें नाहीं. त्यांना या रक्तपाताची पर्वा वाटली नाहीं. वृत्तपत्रें बंद करण्यांत आलीं होतीं; तथापि या रक्तपाताची बातमी तारायंत्रद्वारें पसरण्यास वेळ लागला नाहीं. आजुबाजूच्या गांवांतून बंडें उभारण्यात आलीं व बंडखोरांनीं आपल्या वक्तृत्वाचा पाऊस पाडून **झारविरुद्ध** असंतोष पसरविला. आतां ह्या बंडाला पोटाचें स्वरूप न राहतां राजकीय स्वरूप आलें. बंडवाल्यानीं सैन्याचें व **ड्यूमा** सभेंतील अधिकाऱ्याचें पाठबळ मिळविलें. सारें सैनिक हां हां म्हणतां बंडखोर बनले. राष्ट्राचें संरक्षक सैन्य रणभूमीवर होतें व अंतर्गत व्यवस्थेचें सैन्य अशा प्रकारें उलटलें गेलें. जे सैनिक तात्काळ बंडखोर बनले नाहींत त्यांना बंडखोर सैनिकांनीं गोळ्या घातल्या. **झारनें ड्यूमा** सभेचें विसर्जन केलें होतें तरी सभासद त्याची आज्ञा न मानतां सभागृहांतून उठत ना. त्यांनीं आपलें सरकार स्थापलें व त्या सरकारातर्फे बंड शमविण्याचा प्रयत्न केला. इकडे **झारहि** आपल्या मंत्रि मंडळाच्या सभा भरवीत होता व त्यांच्याकडून वरील सरकारविरुद्ध हुकमावर हुकूम सोडत होता. त्या साऱ्या हुकमाचा इत्यर्थ " दडपा " एवढाच होता. पण ही दडपशाही करायला तयार कोण होता ? एखादा मुर्दाड अधिकारी जर सैन्याला गोळीबार करावयास सांगू लागला तर सैनिकच त्याला गोळ्या घालीत. त्यावेळीं अनेक आगा लागल्या, जाळपोळ झाली, मारामाऱ्या झाल्या, मशिनगन्स तर रोजच्यारोज सुटूं लागल्या, पण सर्वांचा परिणाम एकच तो म्हणजे **झारशाहीचा** अंत होय.

ह्या बंडखोरांत सर्व कामगार होते. त्यांचा पुढारी मजूरपक्षाचा सभासद

केरेन्स्की हा होता. त्याचें त्या वेळीं न भूतो न भविष्यति असें स्वागत झालें. मजुरांना नवें युग अवतरलें असें वाटलें. ते आपल्या मागण्यांचा निर्धास्तपणें पाढा वाचीत असत. त्यांनीं कोर्टें जाळलीं; तुरुंग फोडले, **पिटर व पॉलचा** किल्ला ऊध्वस्त केला, दारुचीं कोठारें लुटलीं; आणि पोलीसचौक्या दिवट्याप्रमाणें पेटवल्या. एकंदरींत कामकऱ्यांचें राज्य रशियांत झालें असें लोक म्हणू लागले. त्या वेळच्या खून, अत्याचारांना सुमारच नव्हता. पण झारची गुर्मी उतरली नव्हती. त्याची धरपकड सुरूच होती.

झारला व त्याच्या तोंडपुंजांना हीं बंडें नसून दंगे आहेत असेंच वाटत होतें. हे दंगे आपण सहज मिटवूं अशी धमक त्यांना वाटत होती. **झारनें** प्रिन्स **गालाटस्कीनला** वाटेल तें करावयास यावेळीं कुलमुखत्यारी दिली. **झारीणा**राणी या आगींत तेल ओतीतच होती. हे शिरजोर अधिकारी **झारला** खरा प्रकार कळूं नये म्हणून योग्य ती खबरदारी घेत.

ता० १२मार्च रोजीं **झारच्या** मंडळींनीं त्याला तो राहत असलेलें गांव **मोहिलेफ** बंडखोर बनलें आहे अशी वार्ता आणून दिली. **झार** म्हणाला " मला माझ्या



झार ज्या राजवाड्यांतून अखेर बाहेर पडला त्या राजवाड्यांतील दिवाणखाना.

जिवाची धास्ती वाटते. आतां कसें करूं?" पण त्याला मोहिलेफ सोडणें भागच पडल्यामुळें तो १३ रोजीं राजवाड्यांतून बाहेर पडला. ती वेळ पहाटच्या चार पांच वाजण्याची होती. दोन आगगाड्या सज्ज होत्या. गाड्या टोस्नोच्या रोखानें निघाल्या. **पेट्रोग्राडला** बंडानें विराट स्वरूप धारण केलें होतें. **झारला** यावेळीं कांहीं तरी करणें

भाग होतें; पण तो स्तब्ध राहिला. १४ तारखेला गाडीवरील अधिकाऱ्यांनी
झारला खरा प्रकार कळवा म्हणून त्याच्या मंत्र्यांना काकुळतीनें विनवणी केली. त्यांनीं
झार निजला आहे व त्याची झोप मोडतां कामा नये असें खडसून सांगितलें. आगगाडी
चालू झाली असतां **लिखोस्लाव्हल** स्टेशनवर **ग्रेगॉफची** तार आली कीं, गाड्या
पेट्रोग्राडला आणाव्या दुसरीकडे नेऊ नये. पण हीं तार **झारला** दाखविली गेली नाहीं.
त्यामुळें मध्यरात्रीला **झारच्या** गाड्या **बोलोगोयेला** गेल्या तेथून या गाड्या **मलाया**
विशेरा स्टेशनला गेल्या. त्या स्टेशनवर पाहिली गाडी बंडखोरांच्या ताब्यांत गेली असें
समजलें. **झारला** ही बातमी सांगण्यांत आली, तेव्हां तो म्हणाला मला बंडखोरांच्या
ताब्यांत पुढील स्टेशनें गेलीं आहेत हें अगोदर कां कळवले नाहीं ? नंतर थोडा वेळ
थांबून तो म्हणाला " लोकांची इच्छा असेल तर मी राज्यावरील हक्क सोडतों व
लिव्हाडियाला जातों" असें म्हणून तो जोरजोरानें रडू लागला." माझी बायको व मुलें
सुरक्षीत राहतील, तर मी लिव्हाडीयाला जाईन, व शांततेंत काळ कंठीन. " असें
त्यानें रडत रडत उद्गार काढलें.
झारची गाडी मागें गेलीं. १४ मार्चच्या संध्याकाळीं ८ वाजतां गाडी **प्साय-**
कॉफला पोहोचली. तेथें जनरल **रर्सी** होता. त्याला **झारनें** लोकांना जबाबदारीचें
राज्य देण्याची कबूली दाखवली. पण **रर्सी** म्हणाला " आतां उशीर झाला महाराज.
आतां एवढ्यावर लोक खूष होणार नाहींत. तुमचा निर्णय उशीरा लागला. "
झारनें राज्यत्यागाच्या मसुद्यावर सही केली व माझ्या **ॲलेक्सला** गादीवर बसवावें,
अशी इच्छा प्रदर्शीत केलीं. पण हा मसुदा तसाच ठेवला, कारण **ड्युमाचे** प्रतिनिधी
झारला भेटावयास येत आहेत अशी बातमी आली. ते १५ मार्चला १० वाजतां
रात्रीं आले. **झारची** गाडी बाजूला बर्फाच्या वर्षावांत उभी होती. **ड्युमाचे** प्रतिनिधी
झारचे शत्रू होते. त्यांचें व **झारचें** भाषण झालें. **झार** अगदीं शरण झाल्यासारखा
दिसत होता. तो रडकुंडीला आला होता. तो देखावा मोठा हृदयद्रावक होता.
जगांतलि एक बलाढ्य राजा दातीं तृण धरून बसला होता. त्याची सत्ता धुळीस
मिळाली होती. हजारो लोकांचें अमानुषपणें प्राण घेणारा झार आपल्या व आपल्या
कुटुंबांतील माणसांच्या प्राणांची भिक्षा मागत होता. झार म्हणाला, " मी गादीचा
त्याग करतो. मला आज तीन वाजेपर्यंत **ॲलेक्सला** गादीवर बसवावें असें वाटत
होतें; पण आतां त्याची व माझी ताटातूट होऊं नये, असें वाटत आहे. म्हणून मी
माझ्या भावाकरितां राज्यत्याग करतों ! " झारनें एवढ्या गोष्टीनें तरी शांतता होईल
कां म्हणून विचारलें. त्यानें रात्रीं ११ वाजतां राज्यत्यागाचा खलीता या प्रतिनिधी
जवळ लिहून दिला. प्रतिनिधीला तो खलीता आवडला व त्यांनीं त्यांत जरूर तो
फेरफार करवून घेतला. नंतर प्रतिनिधी निघून गेलें. राज्यत्यागाचें हें प्रमाणपत्र घेऊन
जातांना त्यांनाहि गहींवर आल्याशिवाय राहिला नाहीं; त्यानंतर **झार** आनंदानें खाऊं
पिऊं लागला व सुखानें झोपला. **झारची** गाडी तेथून परत **मोहिलेफला** आली.
तेथें जाण्यास त्याला परवानगी देण्यांत आली.

झारनें ज्या दिवशीं राज्यत्याग केला त्याच दिवशीं त्याला पकडण्याचा हुकूम प्रोव्हिजनल गव्हर्मेंटनें सोडला. त्याकरितां ५।६ जण **झारला** पकडावयास मोहिलेफला गेले. २१ तारखेला दुपारीं ते तेथें पोहोचले. **झार निकोलस** त्या वेळीं आपल्या आईजवळ होता. तो अलीकडे आईला बिलकूल सोडीत नसे. पकडण्याचा हुकूम येतांच **झार** मुकाट्यानें निघाला. गाडी चालू झाली. वाटेंत **झार** कमी अधिक चवकशी न करतां मुकाट्यानें बसला होता. हवा काय चांगली सुटली आहे, गाडी किती जोरांत चालली आहे, इत्यादि मामुली गोष्टी तो बोलत होता. त्याचे मंत्री मात्र आपल्याला पकडतात काय अशी आपसांत चवकशी करीत होते. झारची गाडी २२ मार्चला ११-३० वाजतां **सारकोय सेलो** या स्टेशनवर आली. तो मुकाट्यानें एक शब्द न बोलतां मोटारींत बसला. दहा मिनिटांत त्याची मोटार **अॅलेक्झांडर** राज-



झारचा भाऊ ग्रँड ड्यूक मायकेल.

वाड्यांतील तुरुंगाजवळ आली. झार तुरुंगांत पडला व तुरुंगाचीं दारें लावण्यांत आलीं. **झारिनालाहि कॉर्निलाफनें** पकडून त्याच ठिकाणीं ठेवलें. नंतर सैबेरियांत अडकलेले सर्व कैदी मोकळे सुटले व हजारों कैद्यांच्या गाड्या भरभरून परत येऊं लागल्या. **झारच्या** भावानेंहि आपल्याला राज्य नको, असें सांगून टाकलें. नंतर **झारशाहींत** ज्यांनीं अरेरावी गाजविली होती अशा सर्व अधिकाऱ्यांना पकडून **पिटरअँडपॉलच्या** तुरुंगांत टाकण्यांत येऊन **झारशाहीला** कांहीं काळ अर्धविराम मिळाला.

झार राजाच्या राजीनाम्यानंतर **बोल्शेविकांची** सत्ता प्रस्थापित होईपर्यंत मध्यंतरी जवळजवळ आठ महिन्यांचा काळ केला. ज्या वेळीं झारनें राज्यत्याग केला

तेव्हां रशियांत मुख्य पांच पक्ष होते. ते पक्ष म्हणजे (१) मॉनर्किस्ट अथवा राजसत्तावादी (२) कॅडेट्स (३) पॉप्युलर सोशिआलिस्ट्स (४) सोशल डेमोक्रॅटिक लेबर पक्ष (५) सोशल रेव्होल्युशनरी पक्ष. या पक्षांची थोडक्यांत माहिती मिळाल्याखेरीज पुढील इतिहास समजणें कठीण तेव्हां आपण तिकडेच वळूं.

पहिला राजसत्तावाद्यांचा पक्ष पण तो जवळजवळ नामशेष होत चाललेला होता, तेव्हां त्या पक्षाबद्दल विशेष चर्चा नको. दुसरा पक्ष कॅडेट्सचा. हा प्रागतिक मताचा होता, यांत श्रीमंत माणसें होतीं, व त्यांना **झारपासून** सुधारणा पाहिजे होत्या. मार्चमध्यें जेव्हां पहिली राज्यक्रांती झाली तेव्हां याच पक्षानें पहिलें Provisional Government(हंगामीसरकार)स्थापन केलें.पण एप्रीलमहिन्यांतच हें हंगामी सरकार उलथून पाडण्यांत आलें. याला कारण त्यांचा साम्राज्यशाहीकडे असणारा ओढा हेंच होय. हा कॅडेट पक्ष लोकांच्या मर्जीतून उतरल्यावर त्यांतून एक नव. पक्ष निर्माण झाला व या पक्षाला पुढील केरेन्स्कीच्या अमदानींत अधिकाराच्या जागा मिळाल्या. हा वर्ग भांडवलवाल्यांचा पक्षपाती असल्यामुळें **बोल्शेविकांच्या** विरुद्धच होता, यानंतर **तिसरा पक्ष** पॉप्युलर सोशिआलिस्टांचा. हा पक्ष मजूर पक्ष म्हणून समजला जाई. हा पक्ष संख्येनें थोडाच होता. ह्या पक्षाला मजूरांचे हित व्हावें असें वाटत असलें तरी कारकून, दुकानदार वगैरे छोट्या भांडवलवाल्यांच्या कल्याणाकारितां हा पक्ष झटेच. **केरेन्स्की** हा या पक्षाचा क्रांतीचे वेळीं पुढारी होता. **चवथा पक्ष** प्रथम **कार्लमार्क्सच्या** तत्त्वांचा होता. या पक्षाचे १९०३ मध्यें दोन विभाग होऊन एकाला **बोल्शेविक** (बहुमतवाला) व दुसऱ्याला **मेन्शेविक** (अल्पमतवाला) असें म्हणून लागले. १९०५ पासून **बोल्शेविक** पक्ष अल्पमतवाला होता. तो १९१७ मध्यें बहुमतवाला झाला. **बोल्शेविक** पक्ष म्हणजे हल्लींचा **कम्युनिस्टपक्ष** होय. **बोल्शेविकांचीं** तत्त्वें प्रासिद्धच आहेत. या पक्षाचे पुढारी **लेनिन-ट्रॉटस्की** वगैरे होत. या चवथ्या पक्षाचे एकंदर पांच उपपक्ष आहेत. उपपक्षांना **बोल्शेविका**इतकी तीव्र राज्यक्रांती नको होती. **पांचवा पक्ष** प्रथम क्रांतिकारक शेतकऱ्यांचा होता. यांना खून करून राज्य घ्यावें असें वाटे; पण या पक्षांत पुढें वाटेल ते लोक येऊन मिळाले व त्यांचें मूळ ध्येय बाजूलाच गेलें. हा पक्ष पुढें श्रीमंत, शेतकरी, बुद्धीमान लोक, वगैरेंचा पाठीराखा झाला. या पक्षाचा पुढें राज्यक्रांतीनंतर **केरेन्सी** हा पुढारी बनला.

वरील पक्षांची जी त्रोटक माहिती दिली आहे, त्यावरून पुढील लढा **बोल्शेविक** पक्ष एका बाजूला व इतर सर्व पक्ष दुसऱ्या बाजूला यांच्यांत लागला. **बोल्शेविक** पक्षाला युद्ध नको होतें व भांडवलवाल्यांचा अल्प प्रमाणांत का होईना पण पुरस्कार करावयास नको होता. हा पुरस्कार **केरेन्स्की** प्रभृती करीत म्हणूनच **बोल्शेविकांना** त्यांच्या हातून सत्ता काढून घेऊन कामकऱ्यांचें व शेतकऱ्यांचें राज्य स्थापन करणें भाग पडले. तें राज्य त्यांनीं कसें स्थापलें तें आपण पाहूं.

१९१७ साल हें जगांत अत्यंत घडामोडीचें साल होय. या सालचें स्थूल-मानानें तीन विभाग पडतात. **पहिला विभाग** मार्च ते जून पर्यंतचा. या तीन महिन्यांत क्रांतिकारकांनीं प्राप्त परिस्थितीचा शक्य तितका फायदा घेऊन राज्याची घडी नीट बसविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. सर्व लोक पक्षभेद विसरले व कार्याला लागले. पण लवकरच युद्धाची चिंता सर्वांना लागल्यामुळें अनेक पक्षांचें ऐक्य फार वेळ टिकलें नाहीं. त्यामुळें जे जहाल होते ते अधिक जहाल झाले व जे मवाळ होते ते अधिक मवाळ बनून कोनाकोपऱ्यांत तोंड दडवून बसलें. **दुसरा विभाग** जुलैपासून ऑक्टोबर पर्यंतचा. या तीन महिन्यांत **केरेन्स्की** व इतर जहाल पक्ष यांच्यामध्यें झटापटींना सुरवात झाली. दोघेहि पक्ष सत्ताधीश होण्याचा प्रयत्न करूं लागले. **केरेन्स्कीनें** या सर्व पक्षांना चीत केलें. पण पुढें जे काय थोडेफार लोक **केरेन्स्कीच्या** बाजूला होते तेहि या त्याच्या सामर्थ्यामुळें त्याचे शत्रू बनले व बिचारा **केरेन्स्की** एकटा पडला. त्याला पुढें सर्व सामर्थ्यवान् **बोल्शेव्हिकांबरोबर** भांडण्याचा प्रसंग आल्यामुळें तर त्याचीं गाळणच उडाली. **तिसरा विभाग** ऑक्टोबर ते नोव्हेंबरचा. या काळांत **बोल्शेव्हिकांचा** पूर्ण विजय होऊन सर्व सत्ता त्यांच्या ताब्यांत आली. काव्यांत नाटक चांगलें, नाटकांत **कालिदासाचें** शाकुंतल नाटक जसें चांगलें, त्यांत चवथा अंक व त्या चवथ्या अंकांत चार श्लोक जसे हृदयंगम, तीच स्थिति **बोल्शेविझमची** होय. रशियन राज्यक्रांतींत १७ साल गडबडीचें, त्यांत नोव्हेंबर महिना, त्या नोव्हेंबर महिन्यांत १० दिवस व त्या १० दिवसांत ७ वी तारीख फारच महत्त्वाची होय. असो.

झारकडून जेव्हां प्रथम सत्ता हिसकावून घेण्यांत आली, तेव्हां जें प्रधानमंडळ स्थापण्यांत आलें त्यांत सर्व पक्षाचे लोक होते. या मंडळाचा अध्यक्ष **प्रिन्स लिव्हॉफ** हा होता व न्यायाचें खातें **केरेन्स्कीकडे** होतें. या मंडळानें आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला, त्यांत राजबंद्यांची मुक्तता, भाषण, मुद्रण, लेखनस्वातंत्र्य, समता, रशियाची-संघटना करण्याकरितां निवडणूक, पोलिसांचें उच्चाटन, प्रांतिक सरकारची लोकमतानें स्थापना, सैनिकांना राजकीय व नागरिकत्वाचे हक्क, इत्यादि गोष्टी दिल्याचें जाहीर केलें गेलें. यांत महायुद्धाचा बिलकूल उल्लेख नव्हता. नव्या राज्यस्थापनेपूर्वीं या मंत्रीमंडळांतील सभासदांचीं भाषणें झालीं. व्याख्यानाला अतोनात गर्दी जमली होती. टाळ्यांचा कडकडाट होत होता. **केरेन्स्कीच्या** नांवाचा उच्चार होतांच जो टाळ्यांचा गजर झाला तो अवर्णनीय होता. पण या भाषणांत राज्यपदावर **ॲलेक्सला** (**झारच्या** मुलाला) स्थापावें असें **मिलिकॉफ** (परदेश मंत्रि) म्हणाले. लोक कांवरे बावरे झाले व त्यांचें भाषण बंद पडलें. यावरून राजसत्तेविषयीं त्यांना किती तिटकारा आला होता, हें दिसते. **मिलिकॉफनें** अखेरीस हें माझें वैयक्तिक मत आहे असें सांगितलें. लोक पांगलें; पण पुढें या मंत्रिमंडळानें राजाचें नांवहि काढलें नाहीं. या मंत्रिमंडळापुढें मुख्य प्रश्न युद्धाविषयक होता. **कॅडेट्स** किंवा मवाळ युद्ध



मिलिकॉफ.

चालविलें पाहिजे असें म्हणत व बंडखोर उलथून पडतील असेंहि सांगत. पण **बोल्शेव्हिक** लोक युद्धाच्या अगदीं विरुद्ध असल्यामुळें त्यांची बाजू दिवसेंदिवस भक्कम होत चालली.

सैनिकांना रशियन राज्यक्रांतीची वार्ता प्रथम **जर्मनी**कडून कळली. सैन्याच्या अधिकाऱ्यांनीं नव्या सरकारचें वर्चस्व कबूल करून युद्ध तसेंच चालविण्याचें ठरविलें. त्यांना फक्त अधिकारक्रांति झाली एवढेंच वाटलें. पण या वेळीं **बोल्शेव्हिक** स्वस्थ नव्हते. त्यांनीं आपले लोक युद्धभूमीवर पाठवून सैनिकांना तुम्ही कोणाकरितां लढतां असें विचारलें? तुम्ही आपलें रक्त सांडून रशियांतील भांडवलशाहीला सामर्थ्यवान् बनण्यास व तुमच्यावर जुलूम करण्यास कां मदत करतां असा प्रश्न विचारला. या चिथवणीमुळें सैनिक, अधिकाऱ्यांचे हुकुम मानीतनासे झाले. कांहीं सैनिकांनीं आपल्या अधिकाऱ्यांना तर ठार मारले. ठिकठिकाणीं असे दंगे होऊन युद्धसेनापति अकिंचित्कर ठरला. **पेट्रोगाड**मध्यें **सोव्हिएट** व नवे सरकार यांच्यांत रणधुमाळी माजून मे महिन्यांत **मिलिकॉफ** व इतर मंत्रि यांना राजीनामे देणें भाग पडलें. पुढें संयुक्त सरकार निवडलें जाऊन **केरेन्स्की** हा मुख्य प्रधान व युद्धमंत्रि झाला. याच वेळीं **लेनिन ट्रॉट्स्की** हे **जर्मनी**तून परत आले व **सोव्हिएट**संस्था बळकावूं लागले. प्रथम **केरेन्स्की**चा आघाडीवरील सैनिकांनीं चांगला सत्कार केला. तो तिकडे एकदां फेरी टाकून व व्याख्यानें देऊनहि आला. तो एक अत्यंत उत्तम वक्ता होता व भावना उद्दीप्त करण्याची कला त्याला चांगली अवगत होती. तो म्हणे " युद्धांत जय मिळेपर्यंत युद्ध चालवा " या त्याच्या उपदेशामुळें अधिकारी मोठे खूष झाले. पण इकडे

फनें कॉर्निलॉफचें म्हणणें केरेन्स्कीला कळविलें. कॉर्निलॉफ म्हणे "बोल्शे-व्हिकाविरुद्ध टिकाव धरणें आतां अशक्य होऊं लागलें आहे; प्रोव्हिजनल गव्हर्मेंटची बारा वर्षे आतां भरत आलीं आहेत. तेव्हां मला कुलमुख्यत्यारी या व रशियांत लष्करी कायदा पुकारा तरच घडगत आहे." त्याकरितां कॉर्निलॉफनें (१) पेट्रोग्राडला वेढा द्यावा (२) सर्व मुलकी व लष्करी सत्ता कॉर्निलॉफला द्यावी (३) मंत्रीमंडळानें राजीनामा देऊन तूर्त आपल्या सेक्रेटरीकडे अधिकार द्यावेत, अशा मागण्या घातल्या. यावर केरेन्स्कीचें व कॉर्निलॉफचें तारायंत्रद्वारें बोलणेंहि झालें; पण केरेन्स्कीनें याबद्दल निर्णय देण्यापूर्वीच लिव्हॉफला कैद केलें. यानंतर केरेन्स्की कॉर्निलॉफनें परस्परांना बरेंच गालिप्रदान केलें. नंतर केरेन्स्कीनें आपल्या मंत्र्यांची एक सभा भरवली. या सभेंत दोघांनीं राजिनामे दिले; पण इतर सभासदांनीं कॉर्निलॉफ विरुद्ध उपाययोजना करण्यास केरेन्स्कीला सत्ता दिली. २७ ऑगस्टला कॉर्निलॉफला अधिकारत्यागाचा हुकूम सुटला. कॉर्निलॉफला वाटलें कीं आपण प्रत्येक गोष्ट केरेन्स्कीला विचारून करीत असतां त्यानें आपल्यावर शस्त्र कां उगारावें ? त्यावेळीं कॉर्निलॉफजवळ जें सैन्य होतें तें पेट्रोग्राडवर हल्ला चढविण्यास पुरेसें आहे, असें वाटून तो केरेन्स्कीचा हुकूम न मानतां पेट्रोग्राडच्या रोखानें निघाला. बोल्शेव्हिक या भांडणाचा फायदा घेऊन दोघांचाहि स्वाहा करतील, अशी खात्री वाटल्यामुळें कांहीं जणांनीं उभयतांत तडजोडीचे प्रयत्न केले, पण ते फुकट गेले. केरेन्स्कीनें कॉर्निलॉफला देशद्रोही ठरविलें व बोल्शेव्हिकाकडे मदतीची याचना केली. कॉर्निलॉफचा दुय्यम अधिकारी क्रिमॉफ हा फार प्रामाणिक होता. त्याला आपण पेट्रोग्राडवर चाल करून राष्ट्राचें हितच करीत आहों असें वाटलें. पेट्रोग्राडच्या अलीकडे वीस मैलांवर तो उभा असतां त्याला रेल्वे उध्वस्त झाल्याचें समजलें. तें कृत्य अर्थात बोल्शिव्हिकांचें होतें. पण तो मोटारीनें केरेन्स्कीला भेटावयास गेला. त्यांचें भाषण बराच वेळ झालें. पण परत आल्यावर त्यानें आत्महत्या केली. अशा प्रकारें हा दुसरा अध्याय समाप्त होऊन बोल्शेव्हिकांच्या उदयकाळाला सुरवात झाली. वरील हकीगत देण्याचें कारण बोल्शेव्हिझमपूर्वी रशियाच्या सैन्याची, हंगामी सरकारची, मोठमोठ्या मंत्र्यांची, काय स्थिति होती ही लक्षांत यावी, एवढेंच आहे बोल्शेव्हिकांना ह्या दुफळीमुळें आपली सत्ता स्थापन करणें कसें सुलभ झालें हें यावरून लक्षांत येईल.

कॉर्निलॉफची पेट्रोग्राडवर चढाई म्हणजे रशियाच्या इतिहासांत एक बंडच समजतात. पण तें बंडहि मोडलें व पुढें कॉर्निलॉफला बोल्शेविकांनीं ठारहि मारलें. या बंडामुळें अत्यंत अशांतता माजली. रेल्वे, पोस्ट, तारखातें वगैरे खातीं बंद पडलीं अगर विस्कळीत झालीं. कॉर्निलॉफचे जागीं वेरोव्हास्की हा सरसेनापती झाला. आतां केरेन्स्कीला जगांत मित्र उरला नाहीं. लोकांना शांतता पाहिजे होती व बोल्शेविक शांततेची धवल पताका घेऊन ती फडकविण्याचें अभि-

वचन देत होतें. **केरेन्स्कीला** फक्त इंग्लंड, फ्रान्स, या दोस्तांची आशा उरली होती पण त्यांनाहि पुढील **बोल्शेविकांच्या** पराक्रमाचीं चिन्हें दिसू लागल्यामुळें ते तरी **केरेन्स्की**ला पाठीशीं कसा घालणार ? या वेळीं नव्या सरसेनापतीनें आपल्याला एक



कॉर्निलॉफ.

कोट सैन्य पोसून काय करावयाचें आहे असा विचार केला व त्यानें कांहीं सैनिकांना रजा देण्याचें ठरविलें. त्यानें ४० वर्षांवरील सैनिकांना सुट्टी दिली. लोकांनीं हा हुकूम ऐकला व वरिष्ठाकडून नक्की हुकमाची वाट न पहातां सांपडेल तें रेल्वे स्टेशन गाठलें.

वयाची चौकशी कोण करतो या विचारानें सारेच सैनिक पळत सुटले. रेल्वेची त्रेध वर्णन करवत नाहीं. सैनिकांना कोणी अडवू लागले तर ते गोळ्या घालून ठार मारीत. त्यांनीं रेल्वेच्या ड्रायव्हरला आपल्याला जिकडे जायचें असेल तिकडे गाडी हाकण्याचा हुकूम सोडला. अशा प्रकारें रशियन सैन्याची विल्हेवाट लागली.

दरम्यानच्या काळांत **बोल्शेविकां**नीं आपली सत्ता स्थापन करण्याचे काय काय प्रयत्न केले हें समजणें जरूर आहे. तेव्हां **बोल्शेविकांच्या** प्रयत्नाकडे आपण वळूं. **बोल्शेविकांनीं** ज्या मागण्यावर राज्यक्रांती घडून आणली व ज्या मागण्या लोकांच्या अंतःकरणांत जाऊन भिडल्या त्या मागण्या अशाः–**आम्हांला ताबडतोब शांतता हवी. साऱ्या जमिनी कामगारांना** मिळाल्या पाहिजेत. **कारखाने व बँका कामकऱ्यांच्या ताब्यांत आल्या पाहिजेत. श्रीमंतांना त्यांच्या ऐश्वर्यशाली घरांतून हुसकून तीं घरें गरीबांना रहावयास द्या. सारी सत्ता सोव्हिएटांना मिळाली पाहिजे. बोल्शेविकांच्या** या मागण्यामुळें रशियांत खरोखर नवजविन संचरलें. केरेन्स्कीनें कांहीं दिवस रशियांत राज्य केलें, याचें कारण **बोल्शेविकांनीं** त्याला राज्य करू दिलें एवढेंच. वास्तविक त्याच्या पुढें कोणतेंहि नवें तत्त्व नव्हतें अगर नवचैतन्य उत्पन्न होईल, असा कार्यक्रमही नव्हता. झारशाहीच्या जुलमाला कंटाळलेल्या, हजारों एकर जमिनींचे मालक बनलेल्या व लाखो कामकऱ्यावर आधिकार गाजविणाऱ्या भांडवलवाल्यांच्या शत्रुस्थानीं असणाऱ्या कामकऱ्यांना व शेतकऱ्यांना केरेन्स्कीनें नवें अमृत कोणतेंच पाजलें नाहीं. लोक युद्धाला, भांडवलशाहीला, अरेरावी सत्तेला व अमानुषपणाला कंटाळले होते. या सर्व गाऱ्हाण्यांचा निरास करण्याची जबाबदारी **बोल्शेविकांनीं** आपल्या शिरावर घेतल्यामुळें त्यांच्या बाजूला सर्व रशिया वळला, तर नवल कसलें ? एप्रीलअखेर जवळ जवळ एक लाख लोक **बोल्शेविकाकरितां** लढण्यास तयार होते.त्यांनीं सैनिकांना सांगितलें कसल्या लढाया लढतां ? नाहक स्वतःचे बळी कां देता ? घरीं चला, तुम्ही ज्या जामिनीवर मजूर म्हणून राबत होता, त्या जामिनी तुमच्या मालकीच्या करतो. कारखान्यांतील मजुरांनाहि त्यांनीं हाच उपदेश केला. त्यांनीं आपल्या पाठीमागें **रेडगार्डसचा** अजस्र तट उभा केला. त्यांनीं मुलांना दूध नाहीं, मोठ्यांना अन्न नाहीं, युद्ध संपत नाहीं व **कॉन्स्टीटयुअंट** ॲसेंब्ली बोलावली जात नाहीं, या गोष्टीचा अत्यंत गाजावाजा करून सारा रशिया नव्या विचारानें भारून टाकला. **कॉर्निलॉफ** अगर **केरेन्स्कीचा** पराभव म्हणजे **बोल्शेविकांनीं** लावलेल्या सुरुंगाचा जयच होय. सैन्यांतील सारे शिपाई फितूर होण्यास **बोल्शेविझमचा** प्रसार हेंच कारण होतें. **कॉर्निलॉफच्या** बंडामुळें **बोल्शेविकांचें** बंड यशस्वी झालें हें म्हणणेंच चुकीचें आहे.

बोल्शेविकांनीं शांतता, समता, भांडवलशाहीचा नाश, वगैरे कार्यक्रमाचा जो जाहीरनामा फडकावला तो ढोंगीपणाचा अगर स्वार्थसाधूपणाचा नसून त्याच्या मागें

अनेक वर्षांच्या पूर्ण विचारांचें पाठबळ होतें. **कार्ल मार्क्सचीं** तत्त्वें त्यांच्या हाडीं मुरलीं होतीं व त्या तत्त्वांच्या पुढें त्यांनीं उडी मारून सारी योजना करून ठेवली होती. **बुझ्वा** [भांडवलवाले] वर्गाचा नायनाट झाला, म्हणजे सारा रशिया सुखी होईल, व जगभर हीं तत्त्वें फैलावलीं गेलीं म्हणजे सारें जगहि सुखी होईल, असा त्यांना आत्म-विश्वास वाटत होता. रशियाच्या अधिराज्याखालीं पारतंत्र्यांत खितपत पडलेल्या साऱ्या राष्ट्रांना दास्यमुक्त करण्याच्या त्यांचा निश्चय जाहीर होतांच तीं राष्ट्रेंहि **बोल्शेविझमला** अनुकूल झालीं.

केरेन्स्कीच्या अमदानींत लोकांच्या खाण्याचे हाल कमी न होतां वाढतच होते. त्याच्या मागें काय अगर **कॉर्निलॉफच्या** मागें काय **बुझ्वांचें** पिशाच्च डोकावत आहे व यांची सत्ता जर आपण अशीच चालू ठेवली तर झारशाही पुनः अवतरेल ह्याची लोकांना भीती वाटत होती. याच वेळीं जगांतील अत्यंत थोर सत्पुरुष लेनीन हा रशियांत येऊन क्रांतीचा उपदेश करू लागला. **लेनीनचें** चरित्र, त्याची शिकवणूक, त्याची लोकांविषयींची कळकळ, त्याची कर्तृत्वशक्ती या सर्वांनीं लोक मोहीत झाले व **लेनीन** सांगेल तें करावयास सज्ज झाले. या वेळचे रशियन लोकांनीं स्वातंत्र्यप्राप्तीकरतां केलेले प्रयत्न जगाच्या इतिहासांत कायम राहतील. मार्चमध्यें **झारनें** राज्यत्याग केल्याबरोबर **बोल्शेविकांनीं** आपल्या हातीं सत्ता घेण्याचा प्रयत्न केला. जुलै महिन्यांत कामकरी व शेतकऱ्यानीं पाहिलें बंड केलें. पण या वेळीं त्यांचें बळ तितकें संघटीत नव्हतें. सैन्याचाहि पाठिंबा त्यांना नव्हता. या बंडामुळें लोकमत त्यांच्याविरुद्ध गेले व नव्या हंगामी सरकारनें साऱ्या **बोल्शेविकांना** पकडून त्यांना जबर शिक्षा केल्या. **ट्रॉट्स्की, कामानिव्ह** हे कैदेंत पडले व **लेनीन** आणि **झिनोव्हिफ** हे दडून राहिले. त्यांचीं पत्रें बंद केलीं गेलीं व ते जर्मन हेर आहेत, असा पुकारा करण्यांत आला. पण त्यांच्याविरुद्ध खरा पुरावा न मिळाल्यामुळें पुष्कळ **बोल्शेविक** कैदेंतून सुटले. यानंतर **केरेन्स्की** प्रभृतींना **बुझ्वा** वर्गाचें साहाय्य मिळाल्याशिवाय ह्या नव्या संकटाला तोंड देणें शक्य नाहीं, असें वाटून ते तिकडे वळले व **बोल्शेविकांचे** सामर्थ्य वृद्धीस लागलें. अशा प्रकारें हें सामर्थ्य वाढतां वाढतां **बोल्शेविकांना** आपण खात्रीनें राज्यक्रांती करूं व सत्ता हातीं घेऊं, असा विश्वास वाटला. त्यांनीं रशियांतील सर्व सोव्हिएटांची नोव्हेंबर २ तारखेला **पेट्रोग्राड** शहरीं परिषद बोलावली व त्याच वेळीं ते राज्यकारभारहि हातीं घेणार होतें. त्या वेळीं शिपायांच्या बराकींतून, कारखान्यांतून व रस्त्याच्या प्रत्येक चौकांतून युद्ध थांबण्याविषयीं आक्रोश होत होता. **बोल्शेविकांचे** पुढारी चोवीस तासांत एक मिनीटाची फुरसत न घेतां स्मोल्नीमध्यें बसत, व्याख्यानें देत व पुढील योजना करीत. या राज्यक्रांतीचीं सूत्रें **पेट्रोग्राड**मधील सैन्यानें–मिलिटरी रेव्होल्यूशनरी कमिटीनें–आपल्या ताब्यांत घेतलीं होतीं. नोव्हेंबरचे पहीले दहा दिवस रशियांत अत्यंत संस्मरणीय होत. या दहा दिवसांनीं सारें जग हालवून सोडलें. प्रत्येक

दिवशीं मोठमोठ्या मिरवणूकी निघत, सतत व्याख्यानें होत, पैसा गोळा केला जाई व नव्या नव्या बातम्या हरघडी ऐकू येत. **लेनीननें** ७ नोव्हेंबर रोजीं बंड पुकारून सारी सत्ता हातीं घ्यावयाचा हुकूम सोडला. ६ नोव्हेंबरला संध्याकाळीं **रेड-गार्डसूनीं बुझ्वींचे** छापखाने आपल्या ताब्यांत घेतले. हे छापखाने **बोल्शेविका** विरुद्ध विष फैलावित होते. **बोल्शेविकांनीं** पहाटेच्या एक वाजतां बंडाचें निशाण उभारलें व प्रथम मध्यवर्ती तार ऑफीस काबीज केलें. हल्लींच्या काळीं बंडखोरांना प्रथम तार ऑफीसेंच पादाक्रांत करावीं लागतात ! पहाटें १ वाजतां शिपायांनीं तार ऑफीस घेतलें.१–३५ला पोस्ट ऑफीस सर केलें.आणि पहाटे पांच वाजतां टेलि-फोनचें एक्सचेंज स्टेशन पादाक्रांत केलें. सूर्योदयाला सरकारी तिजोरी त्यांनीं वेढली, व १० वाजतां **वुंइटर पॅलेसला** गराडा घातला. सात तारीख उजाडतांच **बोल्शे-विकांना** विलक्षण स्फुरण चढलें. त्यांनीं ठिकाठिकाणीं तोफा आणि बंदुका डागल्या. अनेक जुने अधिकारी पकडले गेले. रस्तोरस्तीं झटापटीं होऊं लागल्या. मोठ्या युद्धाची प्रत्येक जण मार्गप्रतीक्षा करीत होता. **वुइंटर पॅलेसचें** संरक्षण करणाऱ्या स्त्रिया जुन्या सरकारला चिकटून राहिल्या व बंदुका घेऊन त्या राजवाड्याबाहेर उभ्या राहिल्या. **केरेन्स्कीचें** सैन्य **पेट्रोग्रॅडवर** हल्ला करण्यास येत आहे, अशा सारख्या बातम्या येत होत्या.

दरम्यान **सोव्हिएटांची** परिषद भरली. त्या परिषदेंत **बोल्शेव्हिकांचा** विजय होऊन त्यांनीं राजसत्ता हातांत घेतल्याचें जाहीर केलें. तशा प्रकारचा जाहीर-नामा तात्काळ निघाला व कामगार, शेतकरी व शिपाई यांचें राज्य चिरायु होवो अशी शुभेच्छाहि प्रगट केली गेली.

केरेन्स्की ह्या वेळीं **पेट्रोग्राड** हेडक्वार्टर्समध्यें होता. त्यांनीं आपल्या शिपा-यांना **बोल्शेव्हिकाविरुद्ध** शस्त्र चालविण्याचा हुकुम सोडला. पण त्याचें कोणी ऐकेना. त्याच्या सैन्यानें त्याला अगोदर बंडखोरावर हल्ला करण्याचा सल्ला दिला होता; पण तो हातपाय हालवीत स्वस्थ बसला. तो **पेट्रोग्राडहून** ७ रोजीं सकाळीं **गाट-चिनाला** व तेथून तो **प्सायकॉफमधील ऑस्ट्रॉव्हला** गेला.त्याठिकाणीं ६००० **कॉसॅक्स** शिपाई जमले होते. त्यांच्या मदतीची त्यानें याचना केली. तो म्हणाला " मी **कॉर्नीलॉफचें** बंड मोडलें; आतां **बोल्शेव्हिकांचें** बंड मोडीन. " पण त्याचें म्हणणें कोणीं ऐकून न घेतल्यामुळें त्याला निघून जावें लागलें. त्याला पकड-ण्याचे कांहीं **कॉसॅक** शिपायांनीं प्रयत्न केले; पण ते व्यर्थ गेले. तो तेथून निसटला. पण पुढील रेल्वे रस्ता **बोल्शेव्हिकांनीं** उध्वस्त केल्यामुळें त्याला **प्सायकॉफला** जातां आलें नाहीं. **पेट्रोग्राडला** जाणारे सारे रेल्वे रस्ते बंड यशस्वी व्हावें म्हणून अगाऊच उध्वस्त करण्यांत आले. तो मोटारीनें आघाडीवर गेला. पण तेथील शिपायांनीं त्याला दाद दिली नाहीं. नंतर तो **स्टाव्हकाला** गेला व त्यानें दहा तुकड्यांना **पेट्रो-ग्राडवर** हल्ला करण्याचा हुकूम सोडला, शिपायांनीं तो हुकूम लाथेखालीं तुडवला.

सुमारें ५००० **कॉसॅक** शिपाई कसेबसे त्याच्या मागें येण्यास तयार झाले. ह्या **कोसॅकना केरेन्स्कीनें पेट्रोग्राड** पेटलें, **जर्मनहेर पेट्रोग्राडमध्यें** धुमाकूळ माजवीत आहेत, स्त्रियांच्या अब्रूवर घाला पडला, पोरांची अमानुषपणें कत्तल चालली आहे, अशा थापा मारून आपल्या बाजूला वळविलें. पण हे शिपाई जेव्हां **पेट्रोग्राडच्या** जवळ आले तेव्हां त्यांना खरा प्रकार समजला व तेहि **केरेन्स्कीवर** उलटले.

नोव्हेंबरच्या १२ तारखेला **केरेन्स्की** व त्याचे थोडेफार शिपाई यांनीं क्रांतिकारक सैन्यावर गोळ्या सोडल्या. पण **केरेन्स्कीला** या प्रयत्नांत यश आलें नाहीं. **केरेन्स्कीचे** शिपाई क्रांतिकारक सैन्याच्या भडिमारामुळें धूम ठोकीत चालले. **केरेन्स्कीला** पकडण्याचा हुकूमहि सुटला. **केरेन्स्कीच्या** सैन्यानें पुढें शस्त्रें खालीं ठेवलीं व **केरेन्स्की** पळून गेला आणि अशा प्रकारें कामकरी व शेतकरी यांचें राज्य रशियांत झालें. याचवेळीं रशियांत इतर ठिकाणींहि बंडें झालीं. **बोल्शेव्हिकांच्या** शत्रूंनीं, या **बोल्शेव्हिकांनीं वुइंटर पॅलेसमधील** स्त्रियांवर बलात्कार केले, **क्रेमलिनचा** विध्वंस केला, राजाचें जडजवाहीर, व इतर दुसरे मौल्यावान पदार्थ चोरले, इत्यादि आरोप केले, पण ते सारें खोटे होते. थोडीफार लुटालूट झाली; पण **बोल्शेव्हिकांनीं** चोरांना देहदंडाची शिक्षा होईल, असा हुकूम सोडल्यामुळें बऱ्याच जिनसा परत आल्या.

बोल्शेव्हिकांनीं राज्यकारभार हातीं घेतल्यावर आपल्या पूर्वीच्या वचनाला अनुसरून त्यांनीं जाहीरनामा काढला. त्यांत त्यांनीं शेतकऱ्याना जमिनी वाटून दिल्या, मजुरांना कारखाने दिले, सर्व बँका बंद करून एकच बँक चालू ठेवली, दारूचें पूर्ण उच्चाटन केलें, सैन्यांतील उच्चनीच भाव काढून टाकला, देशांतलि सर्व उद्योगधंदे व संपत्ती राष्ट्राच्या मालकीची केली, श्रीमंत व गरीब हा भेद नष्ट केला, शिक्षणाकरितां नवी योजना प्रसिद्ध केली, मोठ्या लोकांचें वाडे गरिबांना रहावयास दिले, **झारच्या** राजवाड्यांत सरकारी कचेऱ्या नेल्या, भाषणलेखन व मुद्रणस्वातंत्र्य लोकांना दिले, कायदेकानू नवे केले, सर्व भांडवलवाल्यावर नियंत्रण घातलें, नवी कामगारांची व शेतकऱ्यांची कांग्रेस भरविण्याचें जाहीर केलें आणि ताबडतोब युद्ध थांबविलें. यानंतर लवकरच म्हणजे ३ मार्चला **ब्रेस्ट लिटोव्हास्कला जर्मनी** व इतर राष्ट्राबरोबर तहहि करून टाकला. या तहामुळें रशियाचें बरेंच नुकसान झालें; पण युद्ध चालविल्यामुळें होणाऱ्या नुकसानीपुढें हें नुकसान फारच अल्प होतें.

रशियन राज्यक्रांतीचा इतिहास आतां संपला. पण हा इतिहास संपविण्यापूर्वी **झारचें** काय झालें हें आपणास समजलें पाहिजे. शोकपर्यवसायी नाटकांतील नायकाचें रक्त शिंपडलेलें पाहिल्याखेरीज प्रेक्षकांचें जसें समाधान होत नाहीं, तसेंच महापातकी व क्रूर **झारचें** रक्त या इतिहासावर सांडल्याखेरीज या इतिहासालाहि समाधान वाटणार नाहीं.

दुसऱ्या **निकोलसचें** काय झालें, याविषयीं इतके दिवस बऱ्याच जणांना संशय होता. कोणी म्हणत तो अद्याप जिवंत आहे, तर कोणी सांगत तो मरून किती

तेरों वर्षे लोटलीं. पण हा आपला संशय **अटलांटिक मंथली** नांवाच्या मासिकांतील ताज्या लेखावरून दूर होत आहे. तेव्हां त्याच लेखाच्या आधारें या लांबलेल्या लेखाची आरती करूं.

झारच्या हत्येची साधार माहिती देणारा लेखक **वॉल्श** हा असून तो रशियांत बरींच वर्षे होता.

एप्रील २२, १९१८ रोजीं **टोबोलास्क** शहरीं **व्हॅसिली व्हीच जकोलिव्ह** नांवाचा एक विचित्र अधिकारी आला. त्याच्याबरोबर १५० घोडेस्वार होते. **टोबोलास्क सैबेरियांत, पेट्रोग्राडपासून** २००० मैलांवर आहे. या ठिकाणीं **झार** राजाची १९१७ च्या मार्चमध्यें रवानगी करण्यांत आली होती. **जॅकोलिव्हनें झार, झारीना** व एक मुलगी यांना कांहीं न सांगतां बरोबर येण्याचा हुकूम सोडला. त्यानें वाटेंत **इकाटेरिंगबर्ग** गांवीं एक घर **झार**करतां घेतलें. हें गांव उरल **सोव्हिएटांचें** मुख्य ठिकाण होतें. येथें **झारच्या** कुटुंबांतील उरलेली मंडळी आणण्यांत आली. तेथून **जॅकोलिव्ह** निसटला व कोठें गेला हें समजलें नाहीं.



झारचा मुलगा ॲलेक्स.

वॉल्श म्हणतो कीं, ह्या ठिकाणीं **झारच्या** मुलांवर शिपायांनीं अनन्वित अत्याचार व बलात्कार केले, पण हें म्हणणें खोटें आहे. **बोल्शेविझमचीं** तत्त्वें फार उच्च दर्जाचीं असल्यामुळें व तीं तत्त्वें प्रसृत होऊन फार दिवस लोटले नव्हते तोंच **बोल्शेव्हिक** शिपाई इतके नीतिभ्रष्ट होतील असें वाटत नाहीं.

१९१८ च्या जुलै महिन्यांत या कैद्यांवर **ज्युरोव्हास्की** हा अंमलदार नेमण्यांत आला. जुलैच्या १५ तारखेच्या सुमारास त्यांची योजना पुरी झाली. २५ जुलैला मध्यरात्रीं दोन वाजतां **जुरोव्हास्की** आला, त्यानें **झारच्या** खोलीवर थाप मारली व त्याला कपडे घाल म्हणून सांगितलें. बाकीच्या मंडळींना असाच हुकूम सोडून त्यानें त्या सर्वांना तळघरांत नेलें. बाहेर युद्ध चालू आहे, तुमच्या जिवाला अपाय होईल म्हणून ही योजना आहे, असें सांगण्यांत आलें. त्या खोलींत एकंदर ११ प्राणी कोंडले. त्यांत **झार, झारीना,** त्यांचा १३ वर्षांचा अजारी मुलगा, ४ मुली, त्यांचा डॉक्टर, एक दासी, आचारी व एक नोकर इतके जण होते.

या अकरा जणांच्या मागें ज्युरोव्हास्की व इतर लोक गेले, त्यांनीं या अकरा जणांच्या दोन तुकडया केल्या व त्यांना समोरासमोर उभे केले. राजाराणी, राजपुत्र व राजकन्या यांच्याकरतां खुर्च्या आणविल्या. ही वार्ता कशी बाहेर फुटली कोण जाणे; पण खिडक्यांतून पहारेकरी भयभीत मुद्रेनें हा शेवटचा प्रवेश पहाण्यास उभे राहिले. **ज्युरोव्हास्कीनें** इतर शिष्टाचार न पाळतां आपला **ऑटोमॅटिक** पिस्तूल बाहेर काढला व **झारवर** पिस्तूल रोखून त्याला एका क्षणांत ठार केलें. लागलेच बारा रिव्हॉल्व्हर्स पुढें सरसावले व त्यांतून अग्निज्वाला निघून इतरांनाहि त्यांनीं स्वर्गाचा मार्ग दाखविला. खोलींत पिस्तुलांच्या आवाजांचा गडगडाट झाला, खोलीं धुरानें



झार झारीना व त्यांचीं मुलें.

भरून गेली. तो देखावा हृदयद्रावक तसाच भयप्रद होता. दगडासारखे उभे असलेले पहारेकरी, स्त्रियांच्या, पुरुषांच्या व मुलांच्या मरणकालीन किंचाळ्यांनीं भयभीत झाले. **ॲलेक्स-झारचा** मुलगा-आपल्या बापाच्या व आईच्या शवावर पडून ओक्साबोक्सी रडूं लागला. त्या पोराला **ज्युरोव्हास्कीनें** दूर लोटलें व आपल्या पिस्तुलानें त्याचाहि मुडदा पाडून त्याला चिरविरहांत ठेवलें नाहीं. ज्यांच्या जीवांत अजून जीव होता, त्यांना संगिनी खुपसून दुःखमुक्त करण्यांत आलें. **झारच्या** मुलीचा लाडका कुत्रा तिनें आपल्याबरोबर हातांत आणला होता. तो हा प्रकार पाहून सैरावैरा खोलींत फिरूं लागला व वेडयासारखा भुंकूं लागला. त्या खोलीची जमीन व भिंती रक्ता-

मांसानें भरून गेल्या. पहांटेच्या सुमारास हें बलिदान समाप्त झालें. सकाळच्या प्रहरीं चादरी आणण्यांत आल्या. त्यांत हीं प्रेतें गुंडाळलीं गेलीं आणि बाहेर उभ्या असलेल्या मोटार लॉरींत टाकण्यांत आलीं. हीं प्रेतें दाट जंगलांत नेण्यांत आलीं. तेथें यांचीं प्रेतें जाळलीं व त्या प्रेतांचा अवशेषहि कोणाला सांपडूं नये म्हणून त्या ऐश्वर्यशाली व अरेराव **झार झारीना** इत्यादींना पुरून टाकण्यांत आलें. अशा प्रकारें अनेक शतकें जुलूम गाजविणारे राजे काळाची वक्रदृष्टि होतांच व लोकांच्या अंतःकरणांतील अस्फुट भावना मनगटावर सत्ता गाजवूं लागतांच मातीला कशा मिळतात हें **रशियनांनीं** दाखवून दिलें. **झारचा** खून हा खून नसून लोकांच्या कल्याणसाधनार्थ केलेल्या पवित्र यज्ञांतील आहुति होय.

आधारभूत ग्रंथ.

Russian Revolution Movement by Konni Zillacus.
Russia in Rule and Misrule by Brig. General. C. R. Ballard C. B
Underground Russia by Stepnaik.
The last of the Romanoffs by Charles Rivet.
Russia by Makeev and O' Hara.
The Russian Soviet Republic by E. A. Ross.
Atlantic Monthly—an article by Father walsh.
Encyclopedia Britanica
Reign of Rasputin by Rodzianko.
Decline and fall of the Russian Empire; By S. R. Mintzloff
(an article in current History.)

चीन व चिनी लोक.

चीनमधील लोकांच्या धार्मिक, सामाजिक, राजकीय, जीवन-क्रमाची यथायोग्य माहिती मिळावी म्हणून चित्रमयजगत्मध्यें ही लेखमाला प्रसिद्ध झाली होती. या लेखांतील माहिती फारच मनोरंजक, चटकदार व मननीय असल्यामुळें त्या लेखांचें एक स्वतंत्र पुस्तक आम्हीं काढलें आहे. चीनाविषयीं खोट्यानाट्या कल्पना या पुस्तकांतील माहितीमुळें नष्ट होतील. हिंदुस्थान व चीन यांच्या चालीरीतींत किती हुबेहुब साम्य आहे, हें पाहावयाचें असेल तर हें पुस्तक वाचणें जरूर आहे. किंमत ८।१२ आणे. ट. ह. शिवाय.

चित्रमयजगत्मधील निवडक गोष्टी.

भाग १ ला.

चित्रमयजगत्मध्यें अगदीं आरंभापासून प्रसिद्ध झालेल्या गोष्टींचें स्वतंत्र पुस्तक करावें अशाबद्दल अनेकांकडून सूचना आल्यामुळें आम्ही त्यांतील निवडक गोष्टींचा हा पहिला भाग प्रसिद्ध करीत आहों. या गोष्टी त्या त्या वेळींच लोकांना अत्यंत आवडल्या असल्यामुळें त्यांची जास्त प्रशंसा नको. या गोष्टी प्रसिद्ध होऊन जरी वरींच वर्षें लोटलीं असलीं तरी त्यांचा नवीनपणा आजहि कायम आहे. या पहिल्या भागांत सामाजिक व ऐतिहासिक गोष्टी असून त्या बोधप्रद व मनोरंजक आहेत. त्यांतील विनोदी गोष्टींमुळें तर वाचकांची चांगलीच करमणूक होणार आहे. भाग १ ला किंमत १ रु.